म. ग्रं. सं. ठाणें
विषय - चारित्र
सं. क्र. १२४९
१९६५

# आठवणींचा बटवा

लेखक
कै. शंकर कृष्ण देवभक्त

REFBK-0014443
REFBK-0014443

रु. २·००

नीलकंठ प्रकाशन
टिळक रोड, पुणे ९.

# आठवणींचा बटवा





मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. प. १००४३

# आठवणींचा बटवा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 3८०८ वि: चरित्र
[illegible] २२६९ [illegible]

लेखक

कै. शंकर कृष्ण देवभक्त

REFBK-0014443

किंमत
रु. २·००

नीलकंठ प्रकाशन
टिळक रोड, पुणें ९.

## आठवणींचा अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. थोर मनाचा थोर पुरुष | ... | १ |
| २. न्यायमूर्ति रानडे | ... | ४ |
| ३. विद्वान् पण तऱ्हेवाईक | ... | ९ |
| ४. मराठी भाषेचे शिवाजी | ... | १४ |
| ५. स्वराज्याचे मंत्रद्रष्टे | ... | २० |
| ६. दोन कलावंत | ... | २५ |
| ७. शरीर धिप्पाड पण मन उदार | ... | ३१ |
| ८. धन्वंतरी | ... | ३८ |
| ९. बाणभट्टांची समस्या | ... | ४३ |
| १०. भोळा ब्राह्मण | ... | ५० |
| ११. शेरास सव्वाशेर | ... | ५६ |
| १२. कर्णाची दंतकथा | ... | ६५ |
| १३. विदुराघरच्या कण्या | ... | ६९ |
| १४. गुरुदक्षिणा | ... | ७४ |
| १५. प्राणाचार्य | ... | ८२ |
| १६. घड्याळ | ... | ८८ |
| १७. राजाची निवड | ... | ९३ |



आवृत्ति पहिली : १९६५ रामनवमी शके १८८७

प्रकाशक :
**प्रकाश दामोदर रानडे**
नीलकंठ प्रकाशन
१६४३ (नवा) सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणे ९.

मुद्रक :
**रा. ना. सरनाईक**
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार पेठ,
पुणे २.

ग्रंथालय, ... क्रमांक ३६०८८ दि: ...

## बटवा उघडतांना

कै. शंकर कृष्ण ऊर्फ बाबूराव देवभक्त यांचा आठवणींचा हा बटवा त्यांच्या प्रथम श्राद्धदिनीं प्रसिद्ध होत आहे यांत आनंद मानावा कीं दुःख हेंच समजेनासें झालें आहे. आनंद याचा कीं, त्यांच्या आठवणी पुस्तक-रूपानें इतक्या उशीरा का होईना प्रसिद्ध होत आहेत. दुःख याचें कीं, ज्या उभारीनें आठवणींच्या बटव्याची कल्पना प्रथम कै. बाबूराव देवभक्त यांनीं मनांत आणली आणि त्याच उभारीच्या वातावरणांत त्यांतील पहिल्या कांहीं आठवणी लिहून काढल्या ती उभारी मूळ कल्पनेप्रमाणें पुढें टिकूं शकली नाहीं. वास्तविक अशा तऱ्हेच्या दोनअडीचशें आठवणी लिहावयाचें त्यांनीं योजून ठेविलें होतें. पण त्याच वेळीं ते वयाच्या पन्नासाव्या वर्षीं शाळेंतून निवृत्त होऊन मिरज येथील मेडिकल कोर्ससाठीं गेले आणि या बटव्याची कल्पना मागें पडली. पुढें मेडिकल कोर्स पुरा करून ते पुण्याला प्रॅक्टिस करू लागले. यानंतर ते आजारी पडले. त्यामुळें या दहा–बारा वर्षांत त्यांच्या हातून हें काम पुरेंच होऊं शकलें नाहीं. आठवणींच्या बटव्याचे संकल्प केवळ संकल्पच राहिले.

कै. बाबूराव देवभक्त हे संभाषण-चतुर व मोठे हजरजबाबी असत. आपल्या गप्पांच्या रंगांत श्रोत्यांना ते वाहवून नेत असत. गाणाऱ्या गवयाच्या मैफलीप्रमाणेंच गप्पा मारणाऱ्यांच्या मैफली किती रंगतात याचा अनुभव अनेकांना असेलच. वास्तविक कै. बाबूराव यांचा पिंड लेखकाचा नव्हता. त्यांचीं कांहीं पुस्तकें प्रकाशित झालेली आहेत. पण त्यांच्या गप्पाष्टकांच्या बैठकींत रंगून गेलेल्या त्यांच्या मित्रांना लेखक बाबूरावांपेक्षां संभाषण-चतुर बाबूराव निश्चितपणें अनेक वर्षें आठवणींत राहतील.

अशा या गप्पांच्या ओघांत अनेक लोकांबद्दल ते अनेक आठवणी इतक्या गमतीनें व परिमाणकारक रीतीनें सांगत कीं, विचारूंच नये. त्यांपैकीं कांहीं आठवणी त्यांच्या स्वतःच्या अनुभवाच्या असत, कांहीं त्यांनीं ऐकलेल्या असत व कांहीं काल्पनिक असत. त्यांच्या निवेदनशैलीनें

त्यांच्या या आठवणींना असा कांहीं रंग चढे कीं; विचारावयाची सोय नसे. या त्यांच्या गप्पाष्टकांत रंगून गेलेल्या कांहीं मित्रांनीं त्यांना या आठवणी लिहून काढण्याबद्दल सांगितलें आणि कै. बाबूराव यांनाहि ती कल्पना फार आवडली. लगेच त्यांनीं कांहीं आठवणी लिहून काढल्या आणि दोन अडीचशे आठवणींची एक योजनाहि तयार करण्यांत आली. पण...त्या-मधील या पुस्तकांत येत असलेल्या पंधरा-वीस आठवणी लिहून झाल्या आणि बाकीचें काम तसेंच अपुरें पडून राहिलें...आणि आतां बाबूरावहि गेले आणि तें काम तसेंच अपुरें पडून राहणार आहे.

या आठवणी मुख्यतः विद्यार्थ्यांचेसाठीं लिहिल्या गेल्या. या आठवणींची भाषा, शैली सर्व कांहीं एखाद्या कसबी लेखकाला साजेसें आहे. कै. बाबूराव यांचे कल्पनेप्रमाणें आठवणींचा वटवा पूर्णपणें भरून निघाला असतां तर फार मोठें कार्य होऊन बालवाङ्मयांत मोलाची भर पडली असती. पण तें होणारें नव्हतें, दुसरें काय ?

— प्रकाशक

ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८५९९ वि. चरित्र
क्रमांक १२७९ नों. दि.
मराठी ग्रंथसंग्रहालय
ग्र. क्र. १४८९३

# थोर मनाचा थोर पुरुष

१

थोरले शास्त्रीबुवा म्हणजे एक कुशाग्र बुद्धिमत्तेची व्यक्ति होती. त्यांचे गुरुजी, वे. शा. सं. मोरशास्त्री साठे त्यांना उगीच नव्हते बृहस्पति म्हणत. 'शिष्यादिच्छेत्पराजयम्' असा प्रसंग मोरशास्त्र्यांवर आला एकदां. मोरशास्त्री जितके विद्वान् तितकेच दुसऱ्यांच्या गुणांची योग्य पारख करून त्यांची मुक्तकंठानें वाहवा करण्यांतहि पटाईत. शिष्यानें वादविवादांत पराभव केला म्हणून फुरंगटून बसले नाहींत मोरशास्त्री. उलट स्वतःच्या अंगावरची जरीकांठी शाल शिष्याच्या अंगावर घालून त्यांनीं शिष्याचा गौरव केला. असे होते मोरशास्त्री साठे आणि त्यांचे शिष्य कृष्णशास्त्री चिपळूणकर! त्यांना लोक बहुधा 'थोरले शास्त्रीबुवा' असें म्हणत आणि विष्णुशास्त्र्यांना 'धाकटे शास्त्रीबुवा' असें म्हणत. दोघेहि जाडे विद्वान्. थोरल्या शास्त्रीबुवांचें कौतुक करावें तेवढें थोडेंच. लहानपणीं संस्कृत अध्ययन केलें आणि वाढत्या वयांत इंग्रजी शिकले. इंग्रजी भाषेवरहि त्यांचें प्रभुत्व असें तसें नव्हतें. 'अरबी भाषेंतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी' आणि डॉ. जॉन्सन्च्या रासेलस्चें मराठींत भाषांतर हीं दोन पुस्तकें त्यांच्या इंग्रजी भाषाप्रभुत्वाची चांगलीच साक्ष देतील. इतक्या उतारवयांत इंग्रजी भाषेचें अध्ययन करून 'थोरले शास्त्रीबुवा' 'असिस्टंट ओरिएन्टल ट्रान्सलेटर' च्या जागेवर होते ही तर फारच आश्चर्याची गोष्ट समजली पाहिजे. सामान्य बुद्धीला हें काम पेलण्यासारखें खासच नव्हतें.

या बुद्धिवान् पिता-पुत्रांची जोडी संस्कृत कादंबरी रचणारा बाणभट्ट आणि त्याचा मुलगा भूषणभट्ट यांच्याच तोडीची होती म्हणाना. थोरल्या शास्त्रीबुवांचें स्वत:चें घर नारायण पेठेंत डोलकर आळींत होतें. प्रसिद्ध गणिती, प्रा. केरूनाना छत्रे यांचा आणि थोरल्या शास्त्रीबुवांचा फारच घरोबा. रोज केरूनानांची आणि शास्त्रीबुवांची बैठक डोलकर आळींत व्हायचीच.

शास्त्रीबुवाचें त्या वेळीं एक खिशांतलें ' रास्कोप 'चें घड्याळ होतें. शास्त्रीबुवा त्या घड्याळाला फार जपत असत. किल्ली देऊन झाली कीं, रेशमी गोफाला टांगून घड्याळ उंचावर असलेल्या एका खिळ्याला ते ठेवीत. मुलांच्या हातीं तें लागूं नये म्हणून ही सारी खटपट. मुलें म्हणजे कोण तर लक्ष्मणराव आणि विष्णुपंत—हेच पुढें " धाकटे शास्त्रीबुवा " म्हणून मान्यता पावले. वडील आपल्यापासून घड्याळ मुद्दाम दूर ठेवतात हें लक्षांत येतांच मुलांचेंहि औत्सुक्य वाढीला लागलें त्या घड्याळाबद्दल. त्याची सतत चाललेली ' टिक्-टिक् ' जवळ कान नेऊन केव्हां एकदां ऐकायला सांपडेल असें त्या मुलांना झालें होतें. ज्या संधीची हीं मुलें इतक्या आतुरतेनें वाट पाहात होतीं ती अनायासें आली एकदांची. खिळा आणि खिसा यांशिवाय तिसरी जागा माहीत नसलेलें तें घड्याळ थोरले शास्त्रीबुवा आपल्या मेजावर विसरून बाहेर पडले. मुलांना हेंच नेमकें पाहिजे होतें. दोघांनींहि झडप घालून तें घड्याळ आपल्या ताब्यांत घेतलें आणि त्याच्याशीं खेळायला सुरुवात केली. दोघांनींहि त्या घड्याळाशीं नुसता धुडगूस घातला. एकदां कानांजवळ न्यावें तर एकदां लांबून पाहावें असा चाळा चालला होता त्या घड्याळाशीं. या मुलांची थोड्या वेळानें हिसका-हिसकी सुरू झाली. या हिसकाहिसकींत अखेर तें घड्याळ खालीं पडलें आणि त्याची कांच फुटली आणि स्प्रिंग तुटल्यामुळें तें बंद पडलें. मग

मात्र हीं मुलें चांगलींच घाबरलीं. दोघेंहि अगदीं गप्प. नेहमीं अवखळपणा करणारीं हीं मुलें आज अशीं स्वस्थ कां हें कोडें घरांतल्या इतर वडील माणसांना कांहीं केल्या उलगडेना. थोरले शास्त्रीबुवा बाहेरून घरीं आले आणि त्यांनीं जेव्हां त्या घड्याळाची ती दशा पाहिली तेव्हां स्वतःची चूक त्यांच्या लक्षांत आली. झाल्या गोष्टीचा यत्किंचितहि गाजावाजा न करतां मुकाट्यानें त्यांनीं तें घड्याळ उचललें आणि एका खात्रीच्या घड्याळजीकडे दुरुस्तीकरितां शांतपणानें पाठवून दिलें. रात्रीचें जेवण-खाण आटोपून नेहमींप्रमाणें केरूनाना शास्त्रीबुवांच्या घरीं गप्पा मारण्या-करितां म्हणून आले. नेहमींच्या जागीं दिसणारें घड्याळ आज त्यांना दिसलें नाहीं म्हणून शास्त्रीबुवांजवळ त्यासंबंधीं त्यांनीं चौकशी केली. घड्याळ दुरुस्तीला टाकल्याबद्दल शास्त्रीबुवांनीं शांतपणें सांगितलें. ‘ कांच फुटली म्हणून दुरुस्तीला टाकलें. ’ इतकेंच त्रोटक उत्तर ऐकून केरूनानांचें कुतूहल जास्तच वाढलें. ‘ कोणीं फोडलें आणि कसें फोडलें याची कांहीं चौकशी तरी केलीत का ? ’ या प्रश्नाला शास्त्रीबुवांकडून जें उत्तर आलें तें मासलेवाईकच म्हटलें पाहिजे. ‘ हें मुलांचंच काम असलं पाहिजे. त्यांच्याशिवाय घरांत लहान कोण आहे ? माझ्या हातून आधीं चूक झाली. मुलांनीं त्या माझ्या गाफीलपणाचा फायदा घेतला इतकंच. त्यांनी तसं नको होतं करायला, हें मान्य आहे मला. मी चौकशी करीन तर माराच्या भीतीनं कुणी खरं सांगणार नाहीं. थोरांनींच जरा प्रौढ विचार केला पाहिजे. त्यांना पेंचांत पकडून खोटं बोलायची संधि द्याच कशाला ? नादुरुस्त झालेलं घड्याळ दुरुस्त हें केलंच पाहिजे. ’

मुलें जवळपास होतींच. वडिलांचे हे उद्गार ऐकून त्यांना आपले वडील किती थोर मनाचे आहेत याची तंतोतंत खात्री पटली.

२

# कै० न्यायमूर्ति रानडे

माधवराव ना ? गोष्टच कशाला पाहिजे त्यांची ! केवढा भव्य पुरुष होता तो—उंच नि धिप्पाड ! त्यांच्या त्या रुंद आणि उंच कपाळाकडे पाहिलं कीं, माणूस मोठा विद्वान् आणि भाग्यशाली असावा, असं चटकन् एकाद्याला वाटत असे. त्यांच्याशीं थोडा वेळ भाषण झालं तर त्यांच्या विद्वत्तेबद्दल त्याची खात्रीच होत असे.

त्यांना ' रावबहादुर ' ही पदवी मिळाली होती तरी त्यांचे स्नेही-सोबती त्यांना ' रावसाहेब ' या नांवानंच हांक मारायचे. नेपोलियन-संबंधीं असंच सांगतात. तो सेनापतीच्या हुद्द्यापर्यंत चढला होता, तरी त्याच्यावर प्रेम करणारे म्हातारे—कोतारे शिपायी ' लिट्ल कॉरपोरल् ' असाच त्याच्यासंबंधीं उल्लेख करीत, तशांतलंच हें.

त्यांच्या घरीं लोकांची इतकी ये-जा असायची तरी लोकांच्या कामांबरोबरच रावसाहेबांचीं स्वतःचीं कामें चाललेलींच असायचीं. वेळ वायां दवडायला सुद्धां फुरसत नसे त्यांना ! रावसाहेब उगीच चकाट्या पिटीत बसले आहेत असं कधींच कुणाला आढळून यायचं नाहीं. वाचन, लेखन आणि चर्चा यांतच त्यांचा रिकामा वेळ निघून जायचा. त्यांच्या घरीं लोकांची इतकी वर्दळ होती म्हणून रावसाहेब एकादे वेळीं चिडून कुणाशीं तुसडेपणानं वागले आहेत, असं झालंच नाहीं कधीं. घरच्या गडी-माणसांशीं सुद्धां ते मोठ्या गोडीगुलाबीनं वागायचे. राग तर त्यांच्या स्वभावाला माहीतच नव्हता जसा कांहीं. डोक्यावर सदोदित

बर्फ ठेवल्यासारखी शांत वृत्ति. त्यांच्यासंबंधीं कुणी कांहींहि वेडंवाकडं बोलो, त्यांच्या तोंडून त्या माणसासंबंधीं निंदा-नालस्ती कधींच ऐकूं यायची नाहीं. उलट त्या माणसाच्या गुणांचं कौतुक त्यांच्या तोंडून ऐकूं यायचं.

पुष्कळ वर्षं झालीं त्या गोष्टीला. ‘ रखमाबाईचा खटला ’ नांवाचं एक खटलं उपस्थित झालं होतं त्या वेळीं. लोकांत दोन तट पडले होते या खटल्यामुळें. एका पक्षाचे रावसाहेब म्होरके होते. दुसऱ्या पक्षाचे टिळक पुढारी होते. दोन्ही माणसं मोठीं. दोघंहि विद्वान्. टिळक म्हणजे तडफ होती नुसती. तो केसरी एकदां गरजला कीं, विरुद्ध बाजूची दाणादाण होऊन जायची अगदीं; पण सिंहाची गर्जना होवो, नाहीं तर वीज कडाडो. हिमालयाचीं शिखरं कोसळल्याचं ऐकलंय् कधीं कुणीं ? रावसाहेब अगदीं शांत असायचे. त्यांच्या पक्षांतली मंडळी मंगळवारीं रात्रीं त्यांच्या घरीं जमून टिळकांच्या नांवानं किलबिलाट करायचीं. टिळकांना खरमरीत उत्तर देऊन गप्प बसवण्याबद्दल राव-साहेबांना तीं नाना तऱ्हांनीं गळ घालायचीं. रावसाहेब सगळं शांतपणानं ऐकून घ्यायचे. सगळ्यांचं तें तावातावाचं बोलणं संपलं म्हणजे सरते-शेवटीं रावसाहेब तोंड उघडायचे. ‘ तुमचं म्हणणं ऐकलं मीं. तुम्ही सगळे टिळकांच्यावर संतापतां; पण टिळकांच्या अंगांतल्या गुणांकडे तुम्ही सगळेच दुर्लक्ष करतां. टिळकांच्या लिहिण्याची पद्धत तर पहा एकदां. ते जसं मुद्देसूद, मार्मिक आणि प्रमाणबद्ध लिहितात तसं लिहायला शिका अगोदर, मग त्यांना नांवं ठेवा. ’ यावर कुणालाच कांहीं बोलतां येत नसे.

या रखमाबाई-प्रकरणांत वामनराव आपट्यांची आणि रावसाहेबांची तर भरसभेंत खडाजंगी उडाली होती. पण अमुक एक मनुष्य एखाद्या बाबतींत आपल्या विरुद्ध आहे म्हणून त्याच्याशीं शेवटपर्यंत हाडवैर

बांधायचं, असली क्षुद्र वृत्ति रावसाहेबांच्या गांवींहि नव्हती. वामनराव वारले त्या वेळची गोष्ट. आपटे वारल्याची बातमी समजतांच रावसाहेब स्मशानयात्रेकरितां हजर. आपट्यांना मुलगा नसल्यामुळें जुन्या रिवाजाप्रमाणें आपट्यांचें तोंड झांकून त्यांची स्मशानयात्रा काढायचा बेत जमलेल्या मंडळींनी चालवला होता. हे लोक जेव्हां त्यांचं तोंड झाकूं लागले तेव्हां रावसाहेब एकदम पुढें आले, आणि म्हणाले, ' वामनरावांचं तोंड कां झांकतां ? ' कुणीं तरी सांगितलं कीं, त्यांना मुलगा नाहीं म्हणून ! त्या वेळचं रावसाहेबांचं बोलणं मोठं मार्मिक होतं. त्यांची मुद्रा गंभीर झाली होती. आवाजहि दाटून आला होता. ते म्हणाले, ' एक सोडून तीन मुलं आहेत त्यांना. मी सांगतों त्यांचीं नांव. ' संस्कृत-इंग्रजी-कोश', 'इंग्रजी-संस्कृत कोश ', आणि ' गाईड '; तुमचीं आमचीं मुलं एक वेळ आमचं नांवहि शिल्लक ठेवणार नाहींत मागें. पण वामनरावांचीं हीं मुलं पहा. शाळा-कॉलेजांतून जोंपर्यंत संस्कृत शिकवलं जाईल, तोंपर्यंत पिढ्यान् पिढ्या हीं मुलं त्यांचं नांव अखंडपणें चालूं ठेवतील. असल्या पराक्रमी मुलांनीं उजळ केलेलं त्यांचं हें तोंड झांकूं नका कुणी ? ' वामनराव गेल्याबद्दल प्रत्येकजण हळहळतच होता. पण रावसाहेबांचे हे शब्द ऐकून सगळ्यांच्याच डोळ्यांत अश्रू उभे राहिले. अखेर वानरावांचं तोंड न झाकतांच स्मशानयात्रा निघाली.

कुठलंहि सार्वजनिक हिताचं काम असो, स्वतः झीज सोसून पडेल तें काम रावसाहेब करायचे. आपल्याला मानाच्या पानावर बसवलं तरच त्या कामांत लक्ष घालायचं, कुणी मंदिर बांधायला काढलं तर दगड दुसऱ्यांनीं वाहून आणावेत आणि आपण कळस बसवण्यापुरतं पुढें यावं, अशी पुष्कळांची वृत्ति असते. पण मानापानाच्या भलत्या कल्पनांनीं त्यांचं मन कधींच भारावलेलं नव्हतं. तें मंदिर बांधून लोकांचं कल्याण होत असेल तर स्वतःची पाठ हुळहुळी होईपर्यंत पाठविरून दगड वाहून

आणायची सुद्धां त्यांची तयारी असायची. त्यांत कसलाहि कमीपणा म्हणून त्यांना वाटायचा नाहीं.

१८८५ सालचीच गोष्ट. म्युनिसिपालिट्यांचा कारभार लोकांच्या हातांत द्यायचं सरकारनं ठरवलं होतं; म्हणून त्या वर्षी पुण्यांत निवडणुकीची मारे दंगल उडून गेली होती. लोकांनीं या गोष्टीचा फायदा घ्यावा म्हणून रावसाहेब लोकांच्या कानींकपाळीं ओरडत होते. पण माधवराव कुंट्यांना काय लहर आली कुणास ठाऊक! दोघंहि एका वेळचे चांगले स्नेही. पण केव्हां तरी एकदां कांहीं कारणावरून बिनसलं. तेव्हांपासून रानड्यांनीं एक बाजू घेतली कीं, कुंटे नेमके विरुद्ध बाजूला असायचे, असंच होऊन बसलं. ‘ हे आमचे रावबहादुर्ररर्र ! ‘ अशी हेटाळणी करून ते रावसाहेबांचा अधूनमधून उल्लेख करायचे. या वेळीं सुद्धां असंच झालं. ‘ आम्हांला नको हे स्थानिक स्वराज्य, असं म्हणून पेठां-पेठांतून व्याख्यानांची झोड उठवायला कुंट्यांनीं सुरुवात केली. घरांत जिकडे तिकडे मंगलवाद्यांची झुंबड सुरू व्हावी आणि त्याच वेळीं बाहेरून कुणी तरी ‘ महावाद्य ’ फुंकावं तशांतली स्थिति झाली. त्यांतून कुंटे म्हणजे कांहीं लहानसान व्यक्ति नव्हती. त्यांच्या मुलुखमैदान वक्तृत्वाचा लोकांच्या मनावर भलताच परिणाम होऊन सरकारलाहि आयतंच फावायचं. मोठ्या प्रयासांनीं मिळवलेला आणि आशेंतून हळूहळू वर येणारा हा सोन्याचा रथ कुंट्यांच्या या कोलाहलामुळें एकदम नाहींसा व्हायचा— असं रावसाहेबांना वाटायला लागलं. कुंट्यांना स्तब्ध केल्याशिवाय कांहींच जमण्यासारखं नव्हतं. पण या तोफेंत खिळा ठोकायचा कुणी ? अखेर रावसाहेबांनीं हें काम अंगावर घेतलं. रास्ता पेठेंत कुंट्यांनीं एक सभा बोलावली होती. सभेला खूप गर्दी होती. कुंट्यांचं भाषण सुरू झाल्यावर गोपाळराव गोखल्यांना घेऊन रावसाहेब तिथें आले आणि दाराजवळ थोडी जागा होती तिथें

दोघेहि जमिनीवर बसले. पण कुंटे कसले चमत्कारिक ! रावसाहेब आलेले पाहतांच बोलतां बोलतां त्यांनीं भिंतीकडे तोंड फिरवलं आणि आपलं राहिलेलं भाषण संपवलं. कुंट्यांचं हें वागणं लोकांनाहि जरा तऱ्हेवाईकपणाचं वाटलं. सभा संपल्यावर रावसाहेब उठून कुंट्यांच्या जवळ गेले, आणि फिरायला चलण्याबद्दल कुंटयांना आग्रह करूं लागले. पण कुंटे होते घुश्श्यांत. फिरायला येण्याचं त्यांनीं साफ नाकारलं. एक अक्षरहि न बोलतां ते आपल्या गाडींत जाऊन बसले. पण रावासाहेबांनीं त्या दिवशीं त्यांचा अंतच पाहायचा ठरवला होता. स्वतःची गाडी होती, तरी रावसाहेब कुंटयांच्याच गाडींत त्यांच्या शेजारीं जाऊन बसले आणि कुंटयांना म्हणाले, ‘ मी तुम्हांला माझ्या गाडींतून फिरायला नेणार होतों, पण तुम्ही माझ्याशीं बोलायला सुद्धां तयार नव्हता. म्हणून आतां मीच बसतों तुमच्या गाडींत. तुम्ही जिकडे फिरायला जाल तिकडे मलाहि घेऊन चला आपल्याबरोबर ! ’

असा प्रकार होईल, अशी कुंटयांना कल्पनाहि नव्हती. निमूटपणें कुंटे रावसाहेबांना बरोबर घेऊन फिरायला गेले. पण या गोष्टीचा परिणाम मात्र असा झाला कीं, निवडणुकीविरुद्ध तोंडांतून इतःपर ‘ ब्र ’ काढायचा नाहीं, असं रावसाहेबांनीं त्यांच्याकडून कबूल करून घेतलं.

रावसाहेबांच्या संबंधीं बोलतांना कांहीं लोक त्यांची स्तुति करतात, कांहीं लोक त्यांना नांवं ठेवतात. चालायचंच असं. कोठल्याहि माणसा-बद्दल लोकांत एकमत नसतंच कधीं. मोठ्या माणसांचं मोठेपण लहान माणसांच्या दृष्टीच्या टप्प्यांत येण्यासारखं नसतं म्हणूनच असं होतं. लहान माणसं दोषांकडे बघतात. मोठीं माणसं गुणांकडे बघतात.

शंकराच्या गळ्यांतल्या रुंडमाळांवर नजर खिळविण्याऐवजीं त्याच्या डोक्यावरच्या चंद्रकोरीचं कौतुक करण्यांत कमीपणा तरी कां वाटावा आपल्याला ?

## ३ विद्वान् पण तऱ्हेवाईक

**मा**धवराव कुंटे म्हणजे एक वल्ली होती. गृहस्थ फार विद्वान्, पण अति तापसी अन् तऱ्हेवाईक. सभेंत एकदां बोलायला उभे राहिले म्हणजे तासन्तास अस्खलित भाषण करायचे; पण गाडं कुठं भडकेल याचा मात्र नेम नसे. इंग्रजींत देखील असं भाषण करायचे कीं सभा अगदीं तटस्थ असे.

कोल्हापूरच्या हायस्कूलचे ते हेडमास्तर होते त्या वेळची गोष्ट. इंग्रजी पांचवींत एक विद्यार्थी होता. मोठा हुषार आणि चुणचुणीत मुलगा होता तो. घरची गरिबी म्हणून वार लावून जेवायचा. कुंट्यांचं या मुलावर फार प्रेम. कारण घरची गरिबी असूनहि त्या मुलाचा वर्गांत नेहमीं पहिला नंबर असायचा. हा मुलगा पुढं चांगला नांवारूपाला येईल, अशी कुंट्यांची खात्री होती; म्हणून त्या मुलावर त्यांचें बारका·ईनं लक्ष असे. पण कुंट्यांचं प्रेम म्हणजे फल्गु नदीचा प्रवाह ! आंत पाणी असलं तरी बाहेर रखरखीत वाळवंट. मनांतलं प्रेम ओठांवाटें बाहेर पडायचं नाहीं, कीं चेहऱ्यावर कधीं दिसून यायचं नाहीं.

कोल्हापुरांत कुठली तरी एक नाटक कंपनी आली होती. कांहीं दिवसांनीं ती कंपनी गेली दुसऱ्या एका गांवाला. ज्या दिवशीं ती कंपनी कोल्हापुरांतून गेली त्याच दिवशीं तो मुलगा वर्गांत गैरहजर ! तेव्हां कुंट्यांना संशय आला. कंपनी ज्या गांवाला गेली होती तें गांव कुंट्यांना

माहीत होतं. शनिवारीं रात्रीं कुंटे त्या कंपनीच्या खेळाला हजर. त्यांचा संशय तंतोतंत खरा ठरला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं कंपनीच्या बिऱ्हाडीं जाऊन त्यांनीं कंपनीच्या मालकाला यथेच्छ दम भरला आणि शाळेंतला मुलगा फूस लावून पळवून आणल्याबद्दल फौजदारी करण्याची त्याला धमकी दिली. कुंट्यांचा रुद्रावतार पाहतांच मालकाची पांचावर धारण बसली. मुकाट्यानं त्यानं तो मुलगा कुंट्यांच्या हवालीं केला. त्या मुलाला कुंट्यांनीं वेताच्या छडीनं बेदम झोडपून काढलें आणि पुन्हां शाळेंत आणून घातलं "पुन्हां शाळा सोडून जा तर खरा पळून, कीं पायच मोडतों तुझा" असा वर त्याला दम भरला.

या गोष्टीला चांगलीं एक-दोन वर्षं झालीं असतील. कुंट्यांची कोल्हापुराहून बदली झाली. काय त्यांच्या मनांत आलं कोणास ठाउक ? ज्या वर्गांत तो पळून गेलेला मुलगा होता त्या वर्गातल्या मुलांना त्यांनीं एक प्रश्न विचारला, "माझ्यासंबंधीं ह्या कोल्हापुरांतले लोक काय म्हणतात. हें अगदीं खरं खरं कोण सांगेल तुमच्यापैकीं ?" प्रश्न मोठा चमत्कारिक पडला. कुणीं सांगितलं, "लोक तुमच्या इंग्रजीवर खूष आहेत." कुणी म्हणालं, "लोक तुमच्या विद्वत्तेची खूप वाखाणणी करतात." एक ना दोन. ज्याला जो गुण चांगला वाटला त्याबद्दल कुंट्यांची प्रत्येकानं तोंडभर स्तुति केली. तो विद्यार्थी गप्प बसला होता एका कोपऱ्यांत. कुंट्यांनीं त्याला दरडावून विचारलं, "काय रे, तूं कां बोलत नाहींस? काय म्हणतात इथले लोक माझ्याबद्दल ?" तो विद्यार्थी उठून उभा राहिला आणि हलक्या आवाजांत म्हणाला, "खरं सांगूं सर ?"

"हो. हो, अगदीं खरं सांग !"

"सर, इथले लोक जेव्हां अंबाबाईच्या कट्ट्यावर जमतात त्या वेळीं ते म्हणतात कीं बरं झालं; एक ब्याद निघून जाईल आपल्या गांवांतून आतां. हा महाद्या कुंटे म्हणजे महा नतद्रष्ट माणूस आहे." आणि असं म्हणून

कोल्हापूरचे लोक कुंट्यांबद्दल जें कांहीं वाईटसाईट बोलत तें सगळं आडपडदा न ठेवतां त्यानं सांगून टाकलं. त्याच्या मनांत ती दोन वर्षांपूर्वींची खुमखूम होतीच. कुंट्यांची मुद्रा एकदम पालटली. तो विद्यार्थी खालीं बसल्यावर वर्गातल्या दुसऱ्या एका मुलाकडून कुंट्यांनीं एक वेताची छडी आणवली आणि त्या विद्यार्थ्याला जवळ बोलावलं. हा सत्यवचनी हरिश्चंद्र या विश्वामित्राचा आतां आंगभर मार खाणार, अशी सगळ्या विद्यार्थ्यांना धास्ती बसली. तो विद्यार्थीहि घाबरत घाबरत कुंट्यांच्या समोर येऊन उभा राहिला. कुंट्यांनीं काय केलं असं वाटतं तुम्हांला? तीच छडी त्या विद्यार्थ्याच्या हातांत देऊन ते म्हणाले, "दोन दोन पाचुंदे ओढ एकेकाच्या पाठीवर. हीं सगळीं पोरटीं स्तुतिपाठक नुसतीं. मी गंमत पाहात होतों नुसती एकेकाची. तुझ्याशिवाय खरं बोलणारा एकसुद्धां मुलगा नाहीं या वर्गांत. मला माहीत आहे कीं, या कोल्हापुरांत एकसुद्धां माझ्या पाठीमागें माझ्यासंबंधीं चांगलं बोलत नाहीं." हें ऐकल्यावर वर्गातल्या बाकीच्या विद्यार्थ्यांची गाळणच उडाली. त्या विद्यार्थ्याचीहि चमत्कारिक स्थिति झाली. तितक्यावरच तें निभावलें. पण कुंट्यांनीं तोंडपुजेपणाबद्दल झाडून साऱ्यांची हजेरी घेतली.

या गोष्टीला थोडे दिवस लोटले. कुंटे कोल्हापूर सोडून जाणार म्हणून शाळेंतल्या सर्व विद्यार्थ्यांनीं त्यांना पानसुपारी करण्याचा बेत योजला. नाटक कंपनींत पळून गेलेला जो विद्यार्थी होता त्याच्या डोक्यांत एक कल्पना आली. पानसुपारीच्या वेळीं जे लहान-सहान कार्यक्रम ठरवले होते, त्यांत कुंट्यांची हुबेहूब नक्कल करयाचा कार्यक्रम त्या विद्यार्थ्यानें ठरविला. बाकीच्या विद्यार्थ्यांनाहि तो त्याचा बेत पसंत पडला. झाली तर कुंट्यांची गंमतच होईल थोडीशी, असं त्यांना वाटलं. कुंटे रागावलेच तर त्यांची बदली झाल्यामुळं त्यांच्या हातून मार मिळण्याची आतां कुणालाच धास्ती नव्हती.

कुंट्यांची हुबेहूब नक्कल करायची म्हणजे चक्रीदार पागोटं, काळा अंगरखा, उपरणं आणि जोडा ही सजावट पाहिजे ना? चार घरचे चार कपडे गोळा करून त्यानं पोषाखाचं बस्तान तर बसवलं. फक्त न घाबरतां सगळ्या मंडळींसमोर— विशेषतः कुंट्यांच्या समोर त्यांच्या आवाजासारखा आवाज काढून आणि त्यांच्यासारखे हातवारे करून अस्खलित बोलायचं हेंच काम मोठं कठीण होतं.

समारंभाला सुरुवात झाली. इतर सटरफटर कार्यक्रम होऊन गेले. कुंट्यांसारखा पोपाख करून तो मुलगा 'स्टेज' वर आला. त्याचा तो पोपाख, ती चालण्याची नि उभं राहण्याची लकब पाहून सर्वांच्या हंसतां हंसतां मुरकुंड्या वळल्या. त्यानं बोलायला सुरुवात केली. थेट कुंट्यांसारखा आवाज काढून कुंट्यांच्या गुणांचं वर्णन त्यानं जवळ जवळ पंधरा मिनिटं केलं. सगळ्यांचं लक्ष कुंट्यांच्या चेहऱ्याकडे खिळून राहिलं होतं. पाहतात तों कुंटे अगदीं शांत ! व्हेसुव्हिअस पर्वताचा हिमालय व्हावा तसाच हा चमत्कार ! सगळ्यांना मौज वाटली. नक्कल संपल्यावर सगळ्यांनीं टाळ्या वाजवून त्या विद्यार्थ्याचा गौरव केला.

इतक्यांत कुंट्यांनीं खालून 'स्टेज' वर उडी मारली आणि त्या विद्यार्थ्याला घट्ट मिठी मारून ते म्हणाले, "ह्यानं माझी जी नक्कल केली ती पाहून ह्याचं कौतुक करावंसं वाटतं. त्यानं हें सगळं माझी थट्टा करण्याच्या हेतूनंच केलं आहे. त्या हेतूनं का होईना, पण पंधरा मिनिटं इंग्रजींत अस्खलित भाषण करणं सोपी गोष्ट नाहीं. तुमच्यापैकीं एकाची तरी ताकद आहे का असं अस्खलित इंग्रजींत भाषण करायची ? त्यानं थट्टेऐवजीं माझा गौरवच केला, असं मी तरी समजतों. कोल्हापुरांत राहून इंग्रजी भाषेंत असं माझ्यासारखं वक्तृत्व करणारा एक तरी विद्यार्थी मी माझ्यामागं तयार करून ठेवून कोल्हापूर सोडून जात आहें. मला अभिमान वाटण्यासारखी गोष्ट ह्या विद्यार्थ्यानं करून दाखवली,

याबद्दल मी याला शाबासकी देतों. ” असें म्हणून त्यांनीं त्यांची पाठ थोपटली आणि ते त्याला म्हणाले, “ हें पाहा, नीट अभ्यास करून चांगला लौकिक मिळव, वाईट संगत धरूं नकोस. तुझं कल्याण होईल. हा माझा तुला आशीर्वाद आहे. ”

हें ऐकल्यावर त्या विद्यार्थ्यानं कुंट्यांच्या पायावर डोकं ठेवलं. त्याचा गळा दाटून आला. कुंट्यांविषयीं त्याच्या मनांत तुंबून राहिलेलं किल्मिष डोळ्यांतल्या अश्रूंवाटें त्यानं कायमचं बाहेर काढून टाकलं.

# ४

## मराठी भाषेचे शिवाजी

धाकट्या शास्त्रीबुवांची गोष्ट कांहीं औरच! एखादा तेजस्वी तारा थोडा वेळ चमकावा आणि एकदम निखळून पडावा तशांतलीच गत. अवघं बत्तीस वर्षांचं आयुष्य लाभलं गृहस्थाला, पण तेवढ्यांत केवढी कामगिरी केली! एखादा खेळाडू हातांत बॅट घेऊन यावा आणि कसलेल्या गोलंदाजांच्या गोलंदाजीवर त्यानं चौफेर फटके मारून तासा-दीड-तासांत शें-दोनशें धांवांचा आंकडा फळ्यावर लावावा—प्रेक्षकांची अपेक्षा वाढीला लागावी आणि तेवढ्यांत बाद होऊन टाळ्यांच्या कडकडाटांत तो तंबूंत परतावा—खेळ ऐन रंगांत आला असतांना तो बाद झाल्याबद्दल प्रत्येकाला हळहळ वाटावी तशांतला सारा प्रकार. मोठा कर्तबगार माणूस होता तो! त्यांतून नशीबहि शिकंदर.

आपण आरंभिलेलें काम आपल्या हयातींत वाढीला लागून आपल्या पश्चात्सुद्धां ऐन भरभराटींत राहण्याचं भाग्य फारच थोड्या माणसांना लाभतं. चित्रशाला, किताबखाना, न्यू इंग्लिश स्कूल, केसरी या संस्था पाहिल्या कीं शास्त्रीबुवांची कर्तबगारी एकदम डोळ्यापुढं उभी राहते अन् मोठा अभिमान वाटतो त्यांच्याबद्दल. हात लावतील त्याचं सोनंच व्हायचं, असा तर त्यांचा हातगुण. शालापत्रकाचीच गोष्ट पहा. अडुसष्ट सालापासून पांच-सात वर्षंच शास्त्रीबुवांचा आणि या मासिकाचा काय तो संबंध आला. पण तेवढ्या सहवासानंसुद्धां शाला-

प्रत्रकाची पुण्याई फळाला आली. निबंधमालेची गोष्ट तर या सगळ्याहून निराळी. मोठं कौतुक वाटतं त्यांच्या धिटाईचं. एकीकडे सरकारी नोकरी करायची आणि वेळ प्रसंगीं निबंधमालेंतून साहेबलोकांवर सडेतोडपणानें सणसणीत टीका करायची भीति म्हणून नाहींच कशाची.दुसरा कुणी असता तर मनांत म्हणाला असता कीं, सरकारच्या भाकरीला जागूनच चाकरी करूं आपण. पाहिजेत कशाला आपल्याला या नसत्या उठाठेवी ? पण यांचा खाक्याच निराळा. सरकारी नोकरीची नसती दगदग मनापासून नकोच होती त्यांना. पण वडिलांचा शब्द मोडायचा नाहीं म्हणूनच यांनीं पूना हायस्कूलमध्यें एकाहत्तर सालीं शिक्षकाची नोकरी पत्करली. अगोदरच स्वभाव अबोल आणि एकलकोंडा. ऐकायचं, पाहायचं, भरपूर वाचायचं आणि मनमुराद लिहायचं; पण उगीच अचावचा बोलायचं नाहीं. त्यांतून वडिलांच्या समोर तर नाहींच नाहीं. इतका वडिलांच्या-बद्दल निस्सीम आदर.

एकाहत्तर सालापासून एकूणऐंशी सालापर्यंत काय तो सरकारी नोकरीचा विटाळ. पण तेवढ्या पांच-सहा वर्षांत ज्या कांहीं घडामोडी झाल्या त्या घडामोडींमुळंच न्यू इंग्लिश स्कूल, चित्रशाळा आणि किताब-खाना या संस्था अस्तित्वांत आल्या असं म्हणायला हरकत नाहीं. त्यांतल्या त्यांत माधवराव कुंटे आणि निबंधमालेचा तिसावा अंक हीं जास्त कारणीभूत झालीं. माधवराव कुंटे विद्वान् खरे; पण अति तऱ्हेवाईक. एकदां दोनदां खाजगी बैठकींत धाकट्या शास्त्रीबुवांदेखत त्यांनीं थोरल्या शास्त्रीबुवांबद्दल कांहीं अनुदार उद्गार काढले. या एकाच कारणावरून विष्णुशास्त्र्यांच्या मनांत माधवरावांबद्दल कायमची अढी बसली. त्यामुळं शास्त्रीबुवांचे आणि माधवरावांचे अधूनमधून खटके उडायचे. शाळेंतल्या वक्तशीर वागणुकीवरूनच बहुतेक हे खटके उडत असत.

शास्त्रीबुवा तसे छांदिष्ट असत. एखादं पुस्तक हातांत घेऊन बसले कीं, त्यांना वेळेचं भानच राहात नसे. त्यामुळं त्यांना जेवून शाळेंत जायला उशीर व्हायचा. शाळेंत एखादा तास रिकामा असला तर शाळेच्या लायब्ररींत कुठलं तरी पुस्तक काढून हे वाचीत बसायचे त्यामुळं वर्गावर जायला पंधरा पंधरा मिनिटं उशीर व्हायचा. असं कांहीं झालं कीं कुंटे टपलेले असायचे. पण कुंट्यांची बाजू सुद्धां लंगडीच असायची. कारण शाळेंत यायला किंवा वर्गावर जायला कुंट्यांनाहि उशीर व्हायचा. पण कुंटे जायचे हेडमास्तरकी गाजवायला. तीं बोलणीं शास्त्रीबुवा थोडींच ऐकून घेणार? एकदां-दोनदां शास्त्रीबुवा कांहींच बोलले नाहींत. पण पुढं एका खेपेला दोघांची चांगलीच जुंपली. शास्त्रीबुवा म्हणाले, "मला उशीर होतो, हें मान्य आहे मला; पण तुम्हांलाहि उशीर होतो याबद्दल तुमचे कान कुणी उपटायचे? तुम्ही हेडमास्तर आहांत; तुम्ही वेळेवर येत जा अगोदर, म्हणजे आम्हीहि येत जाऊं वेळेवर." या सगळ्या संभाषणाची पद्धतहि मोठी मासलेवाईक होती! कुंट्यांनीं इंग्रजींत प्रश्न विचारला कीं, शास्त्रीबुवांनीं त्या प्रश्नाला मराठींत उत्तर द्यावं; मराठींत प्रश्न विचारला कीं, इंग्रजींत उत्तर द्यावं. त्यामुळं कुंटे चिडून चिडून बोलत. पण त्या दिवसापासून शास्त्रीबुवांशीं उघड उघड सामना द्यायला कुंटे जरी कचरत असत तरी मनांतल्या मनांत मात्र धुसफुसत असत. साधारण याच सुमारास निबंधमालेचा तिसावा अंक बाहेर पडला. संस्कृत आणि इतिहास हे तर शास्त्रीबुवांचे आवडते विषय. त्यांतून इतिहास या विषयावर लिहिलेला तो निबंध! मग काय विचारतां? इथून तिथून सगळ्या इंग्रज इतिहासकारांची त्या अंकांत त्यांनीं हजेरी घेतली. शास्त्रीबुवांचीच लेखणी ती! त्या लेखणीच्या तडाख्यांत ओघाओघानं जे सांपडतील त्यांची कंबक्तीच ओढवायची! 'इन्द्राय स्वाहा, तक्षकाय स्वाहा' असला तो प्रकार. इंग्रज इतिहास-

कारांबरोबर इतर इंग्रज अधिकारी आणि मिशनरी यांच्यावरहि त्यांनीं झोड उठवून दिली. आपण सरकारी नोकरींत आहों— साहेबलोकांवर लिहितांना लेखणी जरा बोथट करावी असला पुळचट विचार त्यांच्या मनाला कधींसुद्धां शिवला नाहीं.

या गोष्टीचा परिणाम अखेर व्हायचा तोच झाला. कुंट्यांच्या आधीं जेकबसाहेब नांवाचे पूना हायस्कूलचे एक हेडमास्तर होते. त्यांचे बंधु कर्नल जेकब हे एक लष्करी अंमलदार होते. या गृहस्थांनीं 'एलिफॅस' या सहीनें मुंबई गॅझेटांत एक पत्र प्रसिद्ध केलें. निबंधमालेच्या तिसाव्या अंकांतल्या शेलक्या शेलक्या उताऱ्यांचं इंग्रजींत भाषांतर करून त्यावर एक मल्लिनाथीच या साहेबानं लिहिली होती. शिवाय सबंध अंकाचं इंग्रजींत भाषांतर करून त्या वेळच्या गव्हर्नराकडेहि त्यानं तें पाठवून दिलं. पुण्यांतल्या कांहीं शिकलेल्या ब्राह्मण तरुणांनीं सरकारी नोकरींत राहून सरकारविरुद्ध बंडखोरपणा चालवला आहे असा सूर या कर्नल जेकबनं त्या पत्रांत काढला होता. शास्त्रीबुवांनीं ज्ञानप्रकाशांत 'एलिफॅस' च्या या पत्राला इंग्रजींतच एक खरमरीत उत्तर दिलं. आणि कृष्णाजीपंत गाडगीळांनीं 'ब्राह्मण' या सहीनं 'टाइम्स'मधें एक पत्र प्रसिद्ध करून 'एलिफॅस'चे कान उपटले. त्यामुळं हें तिसाव्या अंकाचं प्रकरण चांगलंच रंगलं. चॅटफील्ड साहेबहि गरम झाले. सरकारी गोटांत जेव्हां आदळ-आपट सुरू झाली तेव्हां कुठं कृष्णशास्त्र्यांना या गोष्टीचा पत्ता लागला. चिरंजीव निबंधमालेंत काय लिहितात याबद्दल वडील कधीं चौकशी करीत नसत. मागें एकदां पांचव्या, आठव्या आणि तेविसाव्या अंकांबद्दल थोडीशी वावटळ उठली होती. त्या वेळपुरते त्यांनीं तेवढेच अंक वाचले होते. तसाच हा तिसावा अंक त्यांनीं एकदां वाचून पाहिला. हा अंक वाचल्यावर तेहि जरा नाराज झाले.

चिरंजिवांना हांक मारून शहाजीराजांनीं शिवबांना जरा जपून

वागण्याबद्दल उपदेशहि केला ! पण नेहमींप्रमाणें चिरंजीवांचं एक नाहीं दोन नाहीं. तिसाव्या अंकानं एवढं काहूर उठवलं तरी एकतिसावा अंक बाहेर पडलाच ! चॅटफील्डसाहेबांना वाटलें कीं, मराठी भाषेचा हा शिवाजी पुण्यांतून हद्दपार केला कीं त्याची पुंडाई आपोआपच आटोक्यांत येईल. एवीतेवीं शास्त्रीबुवांचं आणि कुटयांचं पटत नव्हतंच; म्हणून सत्याहत्तर सालच्या डिसेंबरांत चॅटफील्डसाहेबांनीं रत्नागिरी हायस्कुलांत शास्त्रीबुवांची बदली करून टाकली. निबंधमालेवर सूड घेण्याचा हा सरकारी डाव त्यांनीं ओळखला, मनांतल्या मनांत ते खूप जळफळले. एकदम नोकरीचा राजीनामा देऊन मोकळं व्हावं, असंहि त्यांना क्षणभर वाटलं. पण तसं केलेलं वडिलांना आवडणार नाही, म्हणून मनांतल्या मनांत राग गिळून ते रत्नागिरीला निघून गेले. इतके दिवस पुण्यांत काढल्यावर रत्नागिरीसारख्या ठिकाणीं त्यांना थोडंच करमणार ? कसेबसे दिवस चालले होते. इतक्यांत त्याच वर्षीं थोरले शास्त्रीबुवा काळजाच्या दुखण्यानं वारले ! घरांत देखरेख करायला आतां कुणी तरी हवं होतं. म्हणून एकूणऐंशीच्या मे महिन्याला जोडून सहा महिन्यांची रजा घेऊन ते पुण्याला आले. परशुरामनगरी सोडतांना पुन्हां म्हणून तिकडे फिरकायचं नाहीं, असा मात्र त्यांनीं निश्चय केला होता. पुण्याला आल्यावर पुढें काय करणार, याबद्दल एक अक्षरहि ते कुणाशीं बोलत नसत. बायकोला मात्र पुढचे बेत सांगून ठेवले होते. रजेचे पांच महिने झाल्यावर एक दिवस दिला नोकरीचा राजीनामा पाठवून. भोंवतालच्या मित्रमंडळींना सुद्धां या गोष्टीचा थांगपत्ता नव्हता. न जाणो, या विचाराला मित्रमंडळीमार्फत हजार फांटे फुटून विनाकारण मन द्विधा व्हायचं. अगदीं खाजगी बैठकींतल्या चार दोन लोकांजवळ राजीनाम्यासंबंधीं बोलत; पण चर्चा करीत नसत. कुणी चर्चा केलीच तर ऐकून घेत; पण वादविवाद करून स्वतःचं डोकं कधींच तापवीत

नसत. मनांत आलेलं केल्याशिवाय मात्र कधींच सोडायचं नाहीं, हा तर त्यांचा बाणा. ज्या दिवशीं राजीनामा मंजूर झाला आणि पायांतली रुपेरी बेडी बाजूला झाली त्या दिवशीं नवीन शाळा काढायचा मनांतला बेत चारचौघांना सांगून टाकला. एकुणऐंशी सालच्या डिसेंबरांत हा बेत त्यांनीं हँडबिलांमार्फत जाहीरहि करून टाकला. शास्त्रीबुवा नवीन शाळा काढताहेत हें ऐकतांच पूना हायस्कूलच्या कांहीं हुषार विद्यार्थ्यांनीं शाळेला रामरामहि ठोकला ! शास्त्रीबुवांची नवीन शाळा निघते केव्हां आणि आपण त्या शाळेंत नांव घालतों केव्हां असं त्यांना होऊन गेलं होतं. तेवढ्यांत टिळकहि शास्त्रीबुवांच्या मदतीला आले.

१८८० मध्यें जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेला न्यू इंग्लिश स्कूल या नांवानं नवीन शाळा सुद्धां सुरू झाली. पहिल्याच महिन्याचे शेवटीं अडीचशें विद्यार्थी या नव्या शाळेंत आले. त्यामुळं पूना हायस्कूलला त्या वेळीं जरा धक्काच बसला. ‘ चार उडाणटप्पू लोकांनीं काढलेली शाळा ’ असा या नव्या शाळेसंबंधीं सरकारी रिपोर्टांत उल्लेख आला ! यावरून सरकारी अधिकाऱ्यांच्या नाकाला कशा मिरच्या झोंबल्या असतील तें पहा. कांहीं लब्धप्रतिष्ठित लोकांनाहि वाटलं कीं, हीं पोरं चार दिवस टुरटूर करतील आणि शाळा बंद करून बसतील स्वस्थ. पण त्यांचा कयास सपशेल चुकला.

शास्त्रीबुवांनीं स्वतःच्या पुण्याईचं पाणी ओतून वाढीस लावलेल्या त्या रोपाचं एका भव्य वृक्षांत रूपांतर झालं आहे. धन्य आहे त्या पुरुषाची !

## स्वराज्याचे मंत्रद्रष्टे

५

पंचेचाळीस वर्षं झालीं टिळकांना जाऊन ! केवढा थोर पुरुष आमच्या देशाला लाभला होता, हा एकच विचार त्यांची आठवण झाली कीं मनांत येतो. मोठीं माणसं थोडींथोडकीं नाहीं झालीं आपल्या देशांत. पण लोकमान्यांची गोष्टच वेगळी. अथांग विद्वत्ता, अलोट बुद्धिमत्ता, अचाट स्मरणशक्ति, असामान्य धैर्य, अव्याहत उद्योगप्रियता आणि अलौकिक चारित्र्य या सगळ्या गुणांचा मिलाफ त्यांच्या ठिकाणीं झाल्यामुळं त्यांच्यासारखा तडफदार पुढारी झालाच नाहीं आपल्या देशांत असं म्हटलं तर वावगं नाहीं होणार. 'तेल्यातांबोळ्यांचे पुढारी' असं त्यांच्यासंबंधीं बोलून कांहीं लोक त्यांच्यासंबंधीं अनादर दाखवीत. पण खालच्या लोकांपर्यंत राजकारणाच्या कल्पना पोंचवायला टिळकांनींच सुरुवात केली होती, ही गोष्ट ते नांवं ठेवणारे लोक विसरतात. "मी अमुक गोष्ट करूं का ?" असं कुणीं टिळकांना विचारलं तर त्यांचं एक ठराविक उत्तर असे, "आपल्या मनाला जें योग्य आणि न्याय्य वाटेल तें खुशाल करावं. तें कायद्याच्या चौकटींत कसं बसेल याचा विचार मागाहून करतां येतो; पण पहिल्यापासूनच कायद्याचा विचार करीत बसलं तर हातून कांहींच होणार नाहीं." या त्यांच्या शिकवणुकीमुळं आपण कांहीं केलं तर टिळक आपली बाजू घ्यायला आपल्या पाठीशीं उभे आहेत, असा आत्मविश्वास रस्त्यांतल्याहि माणसाच्या मनांत उत्पन्न होत असे त्या वेळीं.

अनुक्रम ३८७८८ वि: चरित्र
क्रमांक २८७ नों: दि:



पुण्यात प्लेग सुरू झाल्यापासून सोजीर लोकांचं मोठं प्रस्थ माजलं होतं. ' ९९ सालच्या प्लेगांतली गोष्ट. दिवसाकाठीं पोटाला चार दोन आणे मिळावेत म्हणून गवताचे भारे डोक्यावर घेऊन चार चार मैल रस्ते तुडवीत, गरीब बिचाऱ्या भारेवाल्या सदाशिव पेठेच्या हौदावरून मंडईपर्यंत जात असत. या गरीब बाया-बापड्यांच्या मागें सुद्धां सोजरांचा ससेमिरा असायाचा. अशीच एक भारेवाली डोक्यावर खूप मोठं गवताचं ओझं घेऊन सदाशिव पेठेच्या हौदावरून चालली होती. ती कुणाच्या आध्यांत ना मध्यांत. डोक्यावरच्या ओझ्याखालीं आधींच बिचारी वांकून गेली होती. दमल्यामुळं सावकाश पावलं टाकीत चालली होती. इतक्यांत घोड्यावर बसून एक सोजीर आला. प्लेगमुळं रस्त्यांत शुकशुकाट होता. या संधीचा फायदा घेऊन त्या सोजरानं आपलं घोडं घातलं बाईच्या अंगावर. भीतीनं तिची गाळणच उडाली. तिच्या डोक्यावरचा भारा खालीं पडला. तो सोजीर फिदीफिदी हंसत होता. सदाशिव पेठेच्या हौदासमोर एका घिसाड्याचं दुकान होतं. संभू घिसाडी त्याचं नांव. हा सगळा प्रकार त्याच्या दृष्टीस पडला. धांवत धांवत तो त्या सोजराजवळ गेला आणि त्यानं त्याला जरा दटावलं. पण सोजीरच तो. त्यानं आपलं घोडं त्याच्याहि अंगावर घालण्याचा घाट घातला. पण तो घिसाडी कांहीं लेचापेचा नव्हता. तसल्या चार सोजरांना पाणी पाजलं असतं त्यानं, इतका मजबूत होता तो. सोजीर आपल्या अंगावर घोडं घालणार असं दिसून येतांच असा एक दणका त्यानं घोडाच्या मानेवर ठेवून दिली की, त्या दणक्यासरशीं तें घोडं आणि वरचा सोजीर दोघंहि रस्त्यांत कोलमडून पडले. तो सोजीर संतापानं त्याच्या अंगावर धांवून गेला. त्याबरोबर त्यानं त्या सोजराच्या गालफडांत इतकी जोराची चपराक मारली कीं, गाल चोळीत तो सोजीर तिथून घोडं दामटीत पळून गेला. संभू घिसाड्याला या

प्रकाराबद्दल कुणी कांहीं विचारीत असे, तेव्हां तो सांगत असे कीं, ' आपले टिळकदादा पुण्यांत आहेत तोपर्यंत असला फाजीलपणा आपण नाहीं चालूं देणार.'

कांहीं गोष्टी अगदीं सोप्या शब्दांत स्पष्ट करून सांगण्याची टिळकांची हातोटी विलक्षणच होती. सदाशिव पेठेच्या हौदावरूनच आठवण झाली. आम्ही लहान होतों त्या वेळीं. सदाशिव पेठेच्या हौदाकडे नागनाथाच्या पारावरून एक रस्ता येतो आणि दुसरा रस्ता चित्रशाळेकडून येऊन त्या रस्त्याला मिळतो. आम्ही दोन-तीन मुलं नागनाथाच्या पारावरून सदाशिव पेठेच्या हौदाकडे येणाऱ्या रस्त्यानं येत होतों. चित्रशाळेकडून येणाऱ्या रस्त्यानं टिळक येत होते. आम्हांला पाहिल्याबरोबर त्यांनीं आम्हांला हटकलं. येवढ्या मोठ्या माणसाशीं काय बोलावं, या विचारानं मनांतल्या मनांत आमचा खूप गोंधळ उडाला होता. कांहीं तरी विचारायचं म्हणून आम्हीं त्यांना म्हटलं, " दादा, हल्लीं तुमच्या केसरींत मधून मधून ' चळवळ ' असा जो शब्द येतो, त्या शब्दाचा अर्थ नाहीं आम्हांला समजला." हें ऐकून टिळक हंसले. हौदाजवळ त्या वेळीं एक पोलीस चौकी होती. त्या चौकींत बसलेल्या शिपायाकडे बोट दाखवून ते म्हणाले, चौकींत स्वस्थ बसलेल्या त्या शिपायाला तुमच्या मागं एकसारखं हिंडत राहावं असं वाटण्याजोगं जें देशोपयोगी काम तुमच्यासारखी तरुण मंडळी करतात त्याला म्हणतात चळवळ. समजलें ? " असं म्हणून ते हंसले आणि चालूं लागले.

त्यांच्यामागें इतके व्याप असत, तरी कुणी कांहीं विचारायला आला तर वेळांत वेळ काढून त्या माणसाशीं चार शब्द बोलल्याशिवाय ते सहसा राहात नसत. ताई महाराज प्रकरण ऐन रंगांत आलं होतं त्या वेळची गोष्ट. टिळकांना त्या वेळीं धड जेवायलाहि फुरसद मिळत नसे. पुण्यांतल्या एका जैन मंदिरांतल्या विश्वस्तांत मतभेद होऊन तें

प्रकरण कोर्टांत जाण्यापर्यंत पाळी आली होती. विश्वस्तांतल्या एका पक्षाचे लोक टिळकांच्या एका स्नेह्याच्या मध्यस्थीनं टिळकांचा सल्ला घेण्याकरितां आले होते. दुपारीं दोन-अडचाचा सुमार. एका आराम-खुर्चीत बसून टिळक तीन निरनिराळ्या लोकांना एकाच वेळीं कांहीं तरी लिहून घ्यायला सांगत होते. इतक्यांत हे लोक तिथें आले आणि आपण कोणत्या कामासाठीं आलों हें त्यांनीं सांगितलं. दुसरा एखादा माणूस असता तर त्यानं त्या माणसांना पिटाळूनच दिलं असतं. पण असं कांहीं झालं असतं तर ते टिळक कसले ! लिहायला सांगायचं काम थोडा वेळ बंद ठेवून त्यांनीं त्या माणसांची विचारपूस केली. त्यांच्या-बरोबरच्या मध्यस्थानं सगळी हकीगत थोडक्यांत सांगितल्यावर टिळकांनीं त्यांच्या जवळचे कागदपत्र पाहायला मागितले. दहा-वीस मिनिटं कागदांची उलथापालथ केल्यानंतर त्यांतला एक कागद लक्षपूर्वक त्यांनीं वाचला आणि त्या लोकांना थोडक्यांत सल्ला देऊन त्यांनीं सांगितलं, " मी सांगतों याप्रमाणं करा. खालच्या दोन्ही कोर्टांत तुमच्या विरुद्ध निकाल लागेल; हायकोर्टांत मात्र तुमच्यासारखा निकाल होईल." असं म्हणून ते स्वतःच्या उद्योगास लागले. चार-पांच वर्षं झालीं असतील या गोष्टीला. तिन्ही कार्टांच्या निकालांबाबत टिळकांनीं वर्तविलेलं हें भविष्य तंतोतंत खरं ठरलं. निकालासंबंधींचं हें भविष्य वर्तवण्याबद्दल त्यांना जेव्हा त्या मध्यस्थ म्हणून आलेल्या गृहस्थानं विचारलं तेव्हां ते म्हणाले, " मीं कागदपत्र पाहून हें भविष्य वर्तवलं होतं; कुंडली पाहून नव्हे. यांत आश्चर्य वाटण्यासारखं असं कांहींच नाहीं. आमचं सरकार, जरी खालच्या कोर्टांत नाहीं तरी हायकोर्टाच्या खुर्चीवर शहाणी माणसं बसवतं, हें मला पक्कं माहीत असल्यामुळें मीं तसं सांगितलं."

' स्व रा ज्य ' हा शब्द तोंडांतून बाहेर काढणं म्हणजे राजद्रोहाचं पातक अंगावर ओढवून घेणं असा एक काळ होता. त्या वेळीं " स्वराज्य

हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" असं निर्भयपणानं सागणं आणि 'अप्रीति म्हणजे द्वेष नव्हे' ( want of affection is no hatred ) हें अबाधित तत्त्व ब्रिटिश सरकारलासुद्धां मान्य करायला लावावं टिळकांनींच.

"ज्यूरींनें कसाहि निकाल दिला तरी मी पूर्ण निर्दोषी आहें. असं माझी मनोदेवता मला सांगत आहे.........देशांत राहून देश-सेवा करण्याऐवजीं देशाबाहेर राहून मीं देशसेवा करावी, अशीच जगन्नियंत्याची इच्छा असेल." हें १९०८ सालीं राजद्रोहाच्या खटल्यांत सहा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा होण्याआधीं त्यांनीं उच्चारलेलें वाक्य त्याच हायकोर्टाच्या भिंतीवर वज्रलेप होऊन बसावें, हा कालमहिमा कशाचा द्योतक असावा?

टिळकांच्या मोठेपणाविषयीं अनेक लहान-मोठ्या गोष्टी सांगतां येतील. लोक म्हणतात टिळक ही फार मोठी व्यक्ति होती. खरं आहे लोकांचं म्हणणं. पण मला असं वाटतं कीं, टिळक ही आपल्या देशाच्या राजकारणांत एक प्रचंड शक्ति होती.

# ६

## दोन कलावंत

पाऊणशें-ऐंशी वर्षं तरी सहज झालीं असतील त्या गोष्टीला. दर नवरात्रांत रावजीबुवा वाठारकरांची फेरी कोल्हापुरांत व्हायचीच. भाद्रपद संपून आश्विन केव्हां सुरू होतो असं कोल्हापूरच्या लोकांना दरसाल होऊन जायचं. रावजीबुवांच्या वाणींत तशीच जादू होती. शिवाय आवाजहि पहाडी. अंबाबाईचं पटांगण लोकांनीं नुसतं फुलून जायचं. इतकी गर्दी असायची, पण बुवा एकदां कीर्तनाला उभे राहिले म्हणजे मधें कुणी हूं कीं चूं करीत नसे. त्यांतून ‘ हरिश्चंद्राचं ’ नाहीं तर ‘ चिलया ’ चं आख्यान लागलेलं असावं, मग तर विचारूंच नका. फत्तराला पाझर फोडायचं सामर्थ्य होतं बुवांच्या वाणींत; मग माणसांचे डोळे डबडबतील, यांत नवल नाहीं मोठं. पुष्कळ कथेकरी पाहतों आपण; पण रावजीबुवांची सर फारच थोड्या लोकांना येईल. त्यामुळें एक उत्तम कीर्तनकार म्हणून बुवांची कीर्ति फार दूरवर पसरली होती.

आश्विन शुद्ध प्रतिपदा होती. दरसालच्या शिरस्त्याप्रमाणें बुवा सकाळीं अंबाबाईच्या दर्शनाकरितां आले होते. बुवा दर्शनाला येणार हें कोल्हापुरांतल्या लोकांना माहीतच. म्हणून त्याच वेळीं गांवांतले प्रतिष्ठित लोकहि तिथें हजर होतेच. पण सगळ्यांचीं तोंडं मात्र उतरून गेलेलीं. बुवा देवळांत आले कीं, लोकांना नुसता आनंद व्हायचा दरवर्षी. पण या खेपेला पहावं तर सगळाच प्रकार निराळा. बुवांना या गोष्टीचा कांहीं उलगडाच होईना. शेवटीं एका गृहस्थानं तोंड उघडलं

" बुवासाहेब, या वर्षीं आईच्या मनांतून आपली सेवा रुजू करून घ्यायची नाहीं, असं दिसतंय. नाहीं तर आपले शाळिग्रामबुवा याच वेळेला तापानं कां पडावेत? पखवाज वाजवायला शाळिग्रामबुवा नाहींत, दुसरा पखवाजी आपल्याला चालायचा नाहीं. मारूनमुटकून एखादा पखवाजी उभा केलाच तर गाण्याला रंग भरायचा नाहीं. गाण्याला रंग भरला नाहीं म्हणजे आपला विरस होऊन कीर्तन संपुष्टांत येणार, याच विवंचनेंत होतों आम्हीं. " शाळिग्रामबुवांच्या आजाराची वातमी कानांवर पडतांच रावजीबुवाहि खट्टू झाले. शाळिग्रामबुवा म्हणजे त्यांचा उजवा हातच. हाताचा गोड आणि तालांत पक्का. त्यामुळें बुवांनाहि गायला जरा हुरूप यायचा. अंबाबाईचं दर्शन घेऊन बुवा म्हणाले, " ठीक आहे. आईची मर्जीच नसेल आमच्या हातून या वर्षीं सेवा घ्यायची, तर आम्ही तरी काय करणार? आलोंच आहोंत गांवांत; तर आजच्या रात्रीं कीर्तन उरकून परत जाऊं आम्ही आपल्या गांवाला! " असं म्हणून बुवा देवळाबाहेर पडणार तोंच एक गृहस्थ बुवांच्याजवळ आला आणि मोठ्या आदबीने त्यांना म्हणाला, " आपलीं दहा दिवसांचीं कीर्तनं कां थांबवतां आपण? आलांच आहांत इथं अनायासें, कीर्तनं करून जा. मीं ऐकलं लोकांचं बोलणं. पखवाजी नाहीं म्हणून कीर्तनं कां थांबवतां? वेळ मारून नेमण्यापुरतां मी वाजवीन पखवाज. "

दिसायला अगदीं साधा असा एक नवखा इसम बुवांशीं इतकी लगट करतो, या गोष्टीचें सगळ्यांनाच आश्चर्य वाटलें. कुठें शाळिग्रामबुवा अन् कुठें हें सोंग! हें ध्यान का रावजीबुवांच्या कीर्तनांत पखवाज वाजवणार? असंच प्रत्येकाला वाटत होतं. " कथेंतला पखवाज म्हणजे तमाशांतला डफ नव्हे " असें म्हणून एका टवाळानें विनोद केला. इतर कुणी हंसेना म्हणून तो स्वतःच आपल्या विनोदावर फिदीफिदी

हंसला. पण रावजीबुवा अगदीं गंभीर होते. त्यांनीं त्या नवख्या गृहस्थांना विचारलें, "आपण कधीं कीर्तन वाजवलं आहे का ?" त्या गृहस्थानें उत्तर दिलं, "मीं अद्याप कीर्तन वाजवलं नाहीं; पण कशीबशी वेळ मारून नेईन. आपलं अडून देणार नाहीं. पहा आजच्या रात्रीं एक वेळ. पसंत पडलं तर उद्यां बोलवा, नाहीं तर नको." पुढचा प्रश्न बिदागीचा. पण त्या नवख्या माणसानं स्पष्ट सांगितलं, "मी हौस म्हणून वाजवणार." अशारीतीनं बिदागीचा प्रश्न आपोआपच सुटला. रात्रीं नऊ वाजतां पखवाज घेऊन देवळांत हजर रहायला सांगून बुवा आपल्या बिऱ्हाडीं निघून गेले. कांहीं का होईना, बुवांचं कीर्तन रात्रीं ऐकायला मिळणार म्हणून लोकहि थोडेसे खूष होते.

रात्रीं आठ वाजल्यापासूनच देवळांतला सभामंडप आणि भोंवतालचं पटांगण लोकांनीं नुसतं फुलून गेलं होतं. बुवा साडेआठ वाजतां हजर झाले. आपला पखवाज घेऊन तो इसम सभामंडपांत स्वस्थ बसला होता. कुणाशीं एक नाहीं दोन नाहीं. दहा वाजतां कथा उभी राहिली. पण कथा सुरू होण्यापूर्वीं लोकांना उद्देशून रावजीबुवा म्हणाले, "आपण सर्वजण ज्या अपेक्षेनं इथं जमलां आहांत ती आपली अपेक्षा दर वर्षीं प्रमाणं पुरी होईलच, असा मला विश्वास वाटत नाहीं; कारण आपले नेहमींचे शाळिग्रामबुवा आहेत आजारी. त्यामुळें आमचा उजवा हातच मोडला. आयत्या वेळीं हे गृहस्थ 'मी वाजवतों' म्हणून पुढं आले. त्यांचा तरी विरस कां करा, असा विचार करून आम्हीं अनुमोदन दिलं. त्यांनीं आजपर्यंत कीर्तन वाजवलेलं नाहीं. शाळिग्राम-बुवांची उणीव भासून आपणांसर्वांचा विरस होईल, हें जाणून आहें मी. कृपा करून आपण त्यांना सांभाळून घ्यावं अन् आजची आमची सेवा गोड करून घ्यावी." असं म्हणून बुवांनीं कीर्तनाला सुरुवात केली.

एखादा साधासुधा पखवाजी वाजवील तसे, बेताल न होतां,

पखवाजीबुवांनीं नमन वाजवलं. बुवा मनांत म्हणाले ‘ वाईट नाहीं अगदीं; नेईल कशीबशी वेळ मारून. ’ पूर्वरंगाला सुरुवात झाली. पुढं होऊन बुवांनीं गोड गळ्यावर एक आर्या म्हटली. बुवांची आर्या संपायच्या आंत पखवाजाच्या चामड्यांतून ती आर्या जशीच्या तशी उमटली ! लोक कान टवकारून पखवाजीबुवांकडे बघूं लागले. बुवांनींहि मागं वळून एकदां पाहिलं, पण पखवाजीबुवांच्या मुद्रेवर थोडासुद्धां बदल नाहीं. जसें कांहीं आपण त्या गांवचेच नव्हत, अशापैकीं प्रकार.

पखवाजांतून निघणारे ते बोल ऐकतांच बुवांनाहि गायला जरासा हुरूप आला. बुवांच्या गाण्याचं कसब बघून पखवाजीबुवांनाहि अवसान चढलं. दहा वाजतां सुरू झालेल्या कथेचा पूर्वरंग संपायलाच दोन वाजले ! कीर्तनाचं अनुसंधान म्हणजे गाण्याबजावण्याच्या चढाओढीचाच कार्यक्रम. गाता गळा आणि बोलका पखवाज यांची जी झक्कडपक्कड सुरू झाली ती कांहीं औरच. येवढा मोठा समाज जमलेला; पण सगळे चित्रासारखे स्तब्ध. पहांटेचे पांच वाजले अन् काकडआरतीची घंटा कानांवर आली तेव्हां कुठे बुवा आणि श्रोते भानावर आले. कसं तरी आख्यान उरकून बुवांनीं “ हेंचि दान देगा देवा.... ” केलं. तोंपर्यंत फटफटीत उजाडलं सुद्धां. रावजीबुवांचं कीर्तन इतकं रंगलेलं कुणाच्याच स्मरणांत नव्हतं. “ कथेकरीबुवापेक्षां पखवाजीबुवांनींच जास्त मजा उडवली ” असं म्हणत प्रत्येकजण देवळाबाहेर पडत होता. देवळांतील गर्दी ओसरली. पखवाजीबुवाबद्दल रावजीबुवांना सारखी चुटपुट लागली होती. निर्जीव चामड्याचा हा ‘ बोलवीता धनी ’ कोण असावा हा एकच विचार त्यांच्या मनांत घोळत होता. “ बुवा, मजा उडवलीत आज. मला कल्पना नव्हती. ” असं म्हणून रावजीबुवांनीं त्या नवख्या गृहस्थाला धन्यवाद दिले. “ आपण माझं वाजवणं गोड मानून घेतलंत—

मला सांभाळून घेतलं— अंबाबाईची कृपा. ” असं म्हणून त्या गृहस्थानं दोन हात जोडून कपाळाला लावले.

“ पण बुवासाहेब, आपली जरा चौकशी करतों म्हणून माफ करा मला. आपण राहणार कुठल्या गांवचे ? ”

“ उत्तर हिंदुस्थानांत राहत असतों मी. सहज अंबाबाईच्या दर्शनाकरितां आलों होतों इकडे. आईचं दर्शन झालं. आपलंहि कीर्तन ऐकण्याचा आईनं योग आणला. फार दिवसांची इच्छा आईनं तृप्त केली. ”

उत्तर हिंदुस्थानचं नांव ऐकतांच रावजीबुवांच्या मनाची जरा चलविचल झाली. मनांत आलेला संशय दूर करावा म्हणून त्यांनीं विचारलें,

“ गांवाचें नांव ? ”

“ इंदूर ! ” हें त्या प्रश्नाला उत्तर मिळालें. बुवा मोठ्या आदबीनें जरा पुढं सरकले.

“ आपलं नांव ? ” असा एक मोघम प्रश्न विचारला त्यांनीं.

“ नाना म्हणतात मला. ” हें त्या प्रश्नाचें उत्तर आलें.

एखादं कोडं जवळ जवळ सुटत यावं— फक्त शेवटचाच धागादोरा जमायचं शिल्लक राहावं तशी अवस्था झाली बुवांची.

“ आपलं उपनांव ? ”

“ पानसे. ”

नाना पानसे !

त्या नांवांत अशी कांहीं जादू होती कीं, रावजीबुवांनीं भरसभामंडपांत नानांना साष्टांग नमस्कार घातला ! गळा दाटून आला त्यांचा. मोठ्या काकुळतीनं ते म्हणाले, “ महाराज, चुकलों मी. माझ्या अभाग्याच्या दारीं कामधेनु आपण होऊन आली अन् मीं तिचा अपमान केला. आपल्यासारख्याच्या घरीं खेटे घालूनहि माझ्यासारख्या पामराचे

कान पुनीत व्हायचे नाहींत. भलत्या माणसाबरोबर मीं आपली तुलना केली. कुठला घेऊन बसलांत शाळिग्रामबुवा ! क्षमा करा मला ! ”

सौजन्यांत रावजीबुवांना नाना थोडेच हार जाणार होते ! ते म्हणाले, “ बुवासाहेब, फिटंफाट झाली. मला आपलं कीर्तन ऐकण्याचा हा जो लाभ मिळाला तो कांहीं लहानसहान लाभ नाहीं. आई अंबाबाईच्या मनांतूनच आमच्यावर अनुग्रह करायचा होता म्हणूनच आज ही संधी आली ना ? ”

नवरात्रच काय, पण सबंध आश्विन महिना रावजीबुवांचं कीर्तन आणि नानांचा पखवाज यांशिवाय कोल्हापूरच्या रसिक लोकांना दुसरा उद्योगच नव्हता.

७

# शरीर धिप्पाड पण मन उदार

खंडेराव महाराजांकडे नुसतं पाहिलं तरी भीति वाटावी, असा धिप्पाड पुरुष होता तो. मूळचं हाडपेर बळकट, त्यांतून तालमीचा नाद. बडोद्याच्या गादीवर आले तरी तालमीच्या मातींत अंग मळवितांना कमीपणा वाटला नाहीं त्यांच्या मनाला. खास स्वत:करितां तयार केलेल्या तालमीच्या हौद्यांत भाऊ शिंद्यांबरोबर रोज तास दोन तास कुस्तीचा व्यायाम हा व्हायचाच. अंगांत ताकदहि तशीच. वाटेल तेवढं नाठाळ घोडं असेना— उपलाणी स्वारी चढवून घोड्याच्या तोंडाला फेस फुटेपर्यंत घोडं दामटून ते ठाणावर आणायचे.

व्यायाम करून शरीरसंपत्ति कमावणाऱ्या माणसांबद्दल महाराजांना मनापासून मोठं कौतुक वाटायचं; पण ताकदीच्या भलत्या अभिमानानं चढून जाणाऱ्या लुंग्यासुंग्या लोकांबद्दल मात्र त्यांना मनांतून चीड यायची. स्वत:च्या ताकदीची महाराजांना जरा चुणूक दाखवावी ह्या इराद्यानं महाराजांशीं हस्तांदोलन करतांना साउटर साहेबानं एकदां महाराजांचीं बोटं खूप जोरानं दाबलीं. साहेबाला स्वत:च्या शक्तीची भलतीच घमेंड आहे, हें महाराजांना समजलं. पुन्हा केव्हां वेळ आली तर साहेबाची थोडीशी गंमत करायची, असं महाराजांनीं भाऊ शिंद्यांना बोलूनसुद्धां दाखवलं. महाराज करायला गेले एक आणि झालं भलतंच. पुढच्या खेपेस साउटर साहेबांशीं हस्तांदोलन करतांना महाराजांनीं साहेबांच्या हाताला सहज एक झटका दिला. त्यासरशीं साहेब मजकूर मटकन्

खालीं बसले आणि विवळूं लागले. महाराजांनीं दिलेल्या झटक्यानं साहेबांच्या खांद्याचा सांधा एकदम निखळून निघाला ! स्वत:च्या खर्चानं साहेबाचा हात बरा केल्यावर साहेबांना महाराज म्हणाले, " माफ करा साहेब, आपल्या अंगांत थोडी तरी शक्ति असेल असा माझा समज होता; चुकलों मी. आपण इतके नाजुक असाल असं मला आधीं माहीत असतं तर मीं जरा बेतानं ' शेक हँड ' केला असता." हें ऐकून तर साउटर साहेबाला मेल्यापेक्षां मेल्यासारखं झालं !

अंगांत इतकी ताकद आणि हातांत इतकी सत्ता होती; पण त्या ताकदीचा ताठा किंवा सत्तेचा उन्माद मात्र त्यांच्या अंगांत कधींच दिसून आला नाहीं. त्यांचं मनसुद्धां त्यांच्या शरीराइतकंच धिप्पाड होतं. शिकारीला जाण्याचा नाद असल्यामुळं अधूनमधून ते शिकारीला जायचे.

बडोद्यापासून दहा-वीस मैलांच्या टापूंत असेच एकदां ते शिकारीला गेले होते. बरोबर भाऊ शिंदेहि होते. एका रानडुकराचा पाठलाग करतां करतां बरोबरच्या लोकांची आणि महाराजांची चुकामूक झाली. पळतां पळतां तो डुक्कर शिरला एका उभ्या शेतांत. डुक्कर शेतांत शिरल्यावर महाराजांनीं आपलं घोडंहि घातलं त्या शेतांत. डुकराच्या पाठलागापायीं शेतांतल्या पिकाचा पार चेंदामेंदा उडाला. हा प्रकार पाहून शेतकरी धांवतच तिथें आला. कुणी तरी सरकारी स्वार शिकारी-पायीं उभ्या पिकाची नासाडी करतोय् असं समजून महाराजांच्या घोड्याच्या लगामाला त्यानं हात घातला आणि तोंडाचा पट्टा सुरू केला.

" बरा सांपडलास ! उतर खालीं. तुझ्यासारखे सरकारी शिपाई हे असे आमच्या शेतांत शिरतात अन् पिकाची नासाडी करतात. पिकाची नासाडी झाली तरी सरकारचा सारा भरावा लागतोच की आम्हां गरीब लोकांना ! पिकं बुडालीं तरी खंडेराव महाराज दयामाया

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८७८८ दि:
क्रमांक ९२/७ नों: दि:


नाहीं दाखवीत आम्हांला. थांब तुझं घोडं नेऊन बांधतों त्या पलीकडच्या झाडाला. खबरदार तिथून हाललास तर ! भाकरी खातों अन् तुला महाराजांकडेच घेऊन जातों अन् त्यांना सांगतों कीं, हे पाहा तुमचे लोक स्वतःच्या चैनीपायीं आमच्यासारख्या गरीब बापड्यांचीं पोटं कशीं तुडवतात तें ! ”

तो शेतकरी इतकं बोलत होता, पण महाराज अगदीं गप्प होते. एक अक्षरहि न बोलतां ते घोड्यावरून उतरले आणि शेतकऱ्याच्या मागोमाग चालूं लागले. एका झाडाला घोडं बांधून शेतकरी आपल्या झोपडींत भाकरी खायला निघून गेला. ज्या झाडाला घोडं बांधलं होतं त्याच झाडाजवळच्या मोकळ्या जागेवर महाराज इकडेतिकडे फेऱ्या घालीत होते.

सरकार स्वारी इतका वेळ कुठं गेली हें पाहण्याकरितां भाऊ शिंदे घोड्यावर वसून तिकडून येत होते. घोडं झाडाला बांधून महाराज इकडे तिकडे फेऱ्या कां घालीत आहेत, हें भाऊंना समजेना म्हणून भाऊ महाराजांच्या जवळ जाऊन चौकशी करूं लागले. “ भाऊ, मी कैदेंत आहें रे ! ” हें महाराजांचं उत्तर ऐकून भाऊंना कांहींच उमज पडेना आणि महाराज तर एक अक्षरहि जास्त बोलेनात.

पहिल्याच्या जोडीला आणखी एक स्वार तिथं आलेला पाहतांच शेतकरी तर जेवण टाकूनच आला. भाऊंनाहि त्याच्या तिखट जिभेचा थोडासा प्रसाद मिळालाच.

“ बरं झालं आतां. दोघांनाहि नेतों पकडून महाराजांपुढं आणि त्यांनाच आणून दाखवतों ही शेताची नासाडी ! ” असं जेव्हां तो शेतकरी बोलला तेव्हां भाऊंच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला.

“ ए ! कुणाला बोलतोस तूं हें माहीत आहे का तुला ? ” असं भाऊंनीं विचारतांच तो शेतकरी एकदम उसळून म्हणाला, “ कशाला

वटवट करतोस उगीच? माझ्याबरोबर महाराजांकडे चल म्हणजे दाखवतों गंमत!"

फसफसणारं तेल ऊतूं जाऊं नये म्हणून विस्तवावरं पाण्याचा हबका मारायला जावं अन् तो पाण्याचा हबका नेमका तापलेल्या तेलांतच पडावा, तशांतली स्थिति झाली भाऊंची! शेतकरी जरा शांत व्हावा म्हणून भाऊंनीं थोडं दटावून पाहिलं तों शेतकरी जास्तच भडकला! बोलून-चालून अडाणी माणूस तो. त्याच्या तोंडाला कुणी तोबरा घालावा

हें प्रकरण थोडक्यांत आटोपण्याकरितां म्हणून भाऊंनीं त्या शेतकऱ्याला बाजूला नेऊन सगळी हकीगत सांगितली. ज्या माणसाला आपण पकडून महाराजांकडे नेणार होतों तो दुसरा तिसरा कोणी नसून प्रत्यक्ष खंडेराव महाराज आहेत हें कळून येतांच त्या शेतकऱ्याची फारच गाळण उडाली. त्यानं एकदम महाराजांच्या पायांवर लोटांगण घातलं. महाराजांची क्षमा कोणत्या शब्दांनीं मागावी हेंच त्याला समजेना. महाराजांनीं त्याला उठवलं आणि भाऊ शिंद्यांकडे वळून गंभीरपणानं ते म्हणाले, "भाऊ, त्याला घेऊन चला आत्तांच्या आत्तां आपल्याबरोबर."

हें ऐकून तर त्या शेतकऱ्याची दामटीच वळली. कुठून आपण तोंड टाकून बोललों असं त्याला वाटूं लागलं. आतां काय होईल तें होवो, असा मनाचा धडा करून गेला तो त्यांच्या बरोबर.

तास दोन तास राजवाड्याच्या एका कोपऱ्यांत कपाळाला हात लावून स्वस्थ बसला होता तो. इतक्यांत एका शिपायानं सांगितलं, "महाराजांनीं तुला आंत बोलावलंय्."

चालतां चालतां त्याचे पाय लटपटत होते. कसंबस महाराजांसमोर जाऊन महाराजांना त्यानं वाकून मुजरा केला. "चुकलों मी मायबाप,

क्षमा करा मला. ” असं अडखळत अडखळत तो म्हणाला आणि थरथर कांपत बाजूला उभा राहिला.

त्याची ती केविलवाणी स्थिति पाहून महाराजांना हंसू आलं, पण चेहरा गंभीर ठेवून ते म्हणाले, “ पाटील, वसा. तुमचं शेत आम्हीं तुडवलं म्हणून तुम्ही आम्हांला कैद केलं. तुमच्या कैदेंतून सुटायचं म्हणजे आम्हांला खंडणी द्यायला हवी. म्हणून जें शेत आम्हीं तुडवलं तेंच शेत आम्हीं तुम्हांला इनाम देऊन टाकतों ! भिऊं नका. खुशाल घरीं जा आतां. ”

आपण स्वप्नांत आहोंत कीं जागे आहोंत हें त्या शेतकऱ्याला कळेचना. महाराजांच्या या अलौकिक औदार्यानं इतका आश्चर्यचकित झाला होता तो !

* * *

व्हिक्टोरिया राणीच्या राज्याला पाऊणशें वर्षे झालीं म्हणून एक डायमंड ज्युबिली समारंभ इतर ठिकाणांप्रमाणें वडोद्यांतहि साजरा करण्यांत आला होता. त्या वेळची गोष्ट. ज्या ठिकाणीं राणीच्या सन्मानार्थ दरबार भरवण्यांत येणार होता त्या ठिकाणीं राणीचें एक भव्य तैल-चित्र भिंतीला लावलं होतं आणि त्या चित्रासमोर एक आडवा रेशमी दोर टांगला होता. प्रत्येकानं दरबारांत येतांना त्या दोराखालून वांकून यावं असा गुप्त हेतु तो दोर बांधण्यामागं होता. सम्राज्ञीला मुजरा केल्यासारखं होईल आणि दरबाराचीहि प्रतिष्ठा राखल्यासारखं होईल. दरबाराच्या प्रवेशद्वाराजवळ महाराजांना तो दोर दिसला. तो दोर बांधण्याचा हेतु महाराजांच्या लक्षांत यायला फारसा वेळ नाहीं लागला. कंबरेची कट्यार काढून डाव्या हाताच्या एका घावानं तो रेशमी दोर तोडून महाराज थेट आपल्या सिंहासनावर जाऊन बसले ! या गोष्टीची

ब्रिटिश अधिकारीवर्गांत पुढें खूप खळबळ झाली; पण महाराज शेवट-पर्यंत अलिप्त होते !

*　　　　*　　　　*

खंडेराव महाराजांच्या दानशूरपणाची कीर्ति ऐकून पुष्कळ लोक त्यांच्याकडे येत. एकदा एक ब्राह्मण भाऊ शिंद्यांच्या वशिल्यानं त्यांच्याकडे आला. त्याला पाहिल्यावर महाराज भाऊंना म्हणाले, " भाऊ, या माणसाला एक रुपयापेक्षां कांहीं जास्त देऊं नये असं वाटायला लागतं. " " सरकार मोठ्या आशेनं तो खेपा घालतोय इथं; कांहीं तरी आपल्या लौकिकाला साजेसं द्यावं. " हें भाऊंचं बोलणं ऐकून महाराजांनीं एक तोड काढली. एका चांदीच्या ताटांत निर-निराळ्या आंकड्यांच्या कागदाच्या चिठ्ठया ठेवून त्यांतली एक चिठ्ठी ब्राह्मणानं उचलायची आणि चिठ्ठींत निघेल ती रक्कम जामदारखान्यांतून घेऊन जायची, असं ठरलं. ताटांत एक लाख रुपयांपासून एक रुपया-पर्यंत निरनिराळ्या चिठ्ठया ठेवल्या होत्या. भाऊ शिंद्यांनाहि ही युक्ति पसंत पडली. एक लाख रुपयांची व एक रुपयाची अशा दोन्हीही चिठ्ठया भाऊंना दाखवूनच महाराजांनीं ताटांत ठेवल्या होत्या.

भाऊ शिंद्यांच्या देखतच त्या ब्राह्मणाला ताटांतली कोणतीहि चिठ्ठी उचलण्यास सांगण्यांत आलं. ब्राह्मणानं एक चिठ्ठी उचलली आणि ती घेऊन तो जामदारखान्यांत गेला.

एक रुपयाची चिठ्ठी उचलली होती त्यानें !

" भाऊ, एक लाख रुपयांचीहि चिठ्ठीहि होती कीं रे ताटांत. पण त्या ब्राह्मणाचं नशीबहि त्याच्या बरोबर चाललं होतं ! तें त्याला दिसलं नाहीं इतकंच ! " महाराज म्हणाले.

*　　　　*　　　　*

महाराज जरी विक्षिप्त होते तरी त्यांच्या विक्षिप्तपणाच्या कांहीं गोष्टी खरोखर कौतुक करण्याजोग्या असत. पहाटे उठून साध्या पोषाखांत फिरायला जायचा त्यांना नाद असे. बरोबर भाऊ शिंदे असतच. असेच एकदां ते बाहेर फिरायला जात असतां धनगराचा एक लहान मुलगा रस्त्याच्या कडेला उभा असलेला त्यांच्या दृष्टीस पडला. कांठोकांठ शेणानं भरलेली एक भली थोरली टोपली रस्त्यावर होती. ती टोपली उचलून डोक्यावर ठेवण्याकरितां कोणी मदत करील तर पाहावं. या विचारांत तो मुलगा उभा होता. खंडेराव महाराज दृष्टीस पडतांच, तो कोणी तरी सामान्य मनुष्य आहे असं समजून, तो त्यांना म्हणाला, "ए भाई, ही शेणाची पाटी उचलायला मला जरा मदत करतोस?" केविलवाण्या सुरांत त्या मुलानं केलेली ती विनंति ऐकून खंडेराव-महाराजांनीं ती शेणाची पाटी उचलून त्याच्या डोक्यावर ठेविली आणि भाऊंना त्या मुलाच्या पाठोपाठ जायला सांगितलं. शक्य तितकी थोडक्यात त्याची माहिती मिळवून आणण्याचा महाराजांचा मनोदय भाऊंनीं ओळखला. थोड्या वेळानं भाऊ परत आले. तो एक गरीब धनगराचा मुलगा आपल्या म्हाताऱ्या आणि आंधळ्या आईला रस्त्यांतलं शेण वेंचून मदत करतो हे जेव्हां महाराजांना समजलं तेव्हां त्यांना त्याची फार दया आली. ते म्हणाले, "भाऊ, तो मुलगा मला 'भाई' म्हणाला रे! राजाच्या भावानं उद्यापासून रस्त्यावरचं शेण उचलतां कामा नये, अशी कांहीं तरी कायमची व्यवस्था आपल्याला केली पाहिजे."

त्या मुलाला एक लहानसं घर आणि कायमची नेमणूक करून देण्यांत आली! प्रत्यक्ष लक्ष्मीनं अक्काबाईला चांदला करण्याचा चमत्कार घडून आला!

# धन्वंतरी

## ८

बडोद्याचे सयाजीराव महाराज यांची गुण-ग्राहकता आणि योग्य जागेकरितां योग्य माणसाची निवड करण्याची पद्धत फारच वाखाणण्याजोगी होती. दादाभाई नौरोजी, सर रमेशचंद्र दत्त, सर टीं. माधवराव यांच्यासारखे थोर पुरुष बडोदे दरबारच्या प्रभावळींत चमकून गेले. डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर या प्रख्यात भिषग्वरांना सयाजीरावांनींच बडोद्यांत आणले होते.

डॉ. भालचंद्रांचे वडील कृष्णशास्त्री भाटवडेकर चांगले नाणावलेले वैद्य होते. डॉ. भालचंद्रहि आयुर्वेदिक औषधें पूर्ण खात्रीची असतील तर तीं वापरीत असत. बडोद्याला असतांना सर टी. माधवराव यांचे वेळींच श्री. आनंदराव सखाराम बर्वे या नांवाचे दिवाण होते. महसुलाचे खाते त्यांच्याकडे असे. त्यांना जलोदराचं दुखणं झालं होतं त्या वेळची गोष्ट. पुष्कळ उपचार झाले. डॉ. भालचंद्रांचे उपचार चालू होते, पण गुण म्हणून येईना. रोगाचं पाऊल पुढेंच. शेवटीं डॉ. भालचंद्रांच्या सूचनेवरून आणि रोग्याच्या संमतीनेंच आयुर्वेदिक औषधाचा उपयोग करायचं ठरलं. इतका हुकमी वैद्य कोण आणावा, हा मोठा प्रश्नच होता. पण डॉ. भालचंद्रांनींच ती अडचण दूर केली. त्यांच्या ओळखीचा मणिशंकर नांवाचा एक काठेवाडी वैद्य बडोद्यांत होता. त्याला त्यांनीं बोलाविलं आणि बर्व्यांना त्याला आणण्यासाठीं गाडी पाठविण्याबद्दल विनंती केली. घरांत घोड्याची चार चाकी

असतांनाही लांकडं आणायची गाडी त्यांच्याकरिता पाठवली! डॉ. भालचंद्रांचं नांव ऐकून तो आला. रोग्याला वैद्याबद्दल किती आस्था आहे हें डॉ. भालचंद्रहि समजले. मणिशंकरहि समजला. मनांतलं कांहींहि बाहेर न दाखवतां रोग्याची प्रकृति तपासण्याबद्दल डॉ. भालचंद्रांनीं मणिशंकरला सांगितल. रोगाचं योग्य निदान करून दुखणं सहा महिन्यांचं जुनं असल्याबद्दल त्यानं संशय प्रदर्शित केला. औषधाचं नांव काढतांच बर्व्यांचा मस्तकशूळ उठला. ते म्हणाले, " हे नेटिव वैद्य पैशाच्या आशेनें वाटेल तीं औषधं देतात आणि प्रकृति जास्त बिघडवून ठेवतात " तोंडावर अपमान म्हणतात तो हा. त्या अपमानाचे मूग गिळून दोघेहि स्वस्थ बसले. " पोटांत औषध नको असेल तर वरून लावायच्या औषधाला कांहीं हरकत आहे का ? " असं वैद्यानं डॉक्टरसाहेबांना विचारलें. " चामडी खराब झाली तर मला खपणार नाहीं. " हें त्या प्रश्नाचं उत्तर. डॉक्टरसाहेबांनीं खुणेनंच संमति दिली. " हा लेप फक्त तात्पुरतं काम करील. गेल्या तीन महिन्यांत जो मलावरोध झाला आहे तो तात्पुरता दूर करील. वीस मिनिटांत औषध आपला प्रभाव दाखवील. चामडी खराब झाली तर मी जबाबदार आहें. " डॉ. भालचंद्रांना वैद्यानं स्पष्ट शब्दांत सांगितलं आणि भालचद्रांनाहि तें सांगणं मनापासून पसंत पडलं.

औषधाचा लेप लावल्यापासून दहा मिनिटांचे आंतच त्या औषधाचा परिणाम झाला. वैद्य, कुणालाहि न सांगतां, परभारेंच घरीं गेले.

बर्व्यांना पुष्कळ दिवसांत लागली नव्हती अशी, थोडा वेळ का होईना, शांत झोंप लागली. जाग आल्यावर त्यांनीं वैद्याची चौकशी डॉ. भालचंद्रांजवळ केली. कुणालाच कांहीं माहीत नव्हतं. " वैद्यांचं औषध परिणामकारक आहे; त्यांना आत्तांच्या आत्तां घेऊन या. त्यांचं औषध घ्यावं असं वाटूं लागलं आहे मला. " आपल्याला काय वाटतं

डॉक्टरसाहेब ? " " वैद्याचं औषध घ्यायचं कीं नाहीं हा आपला वैयत्तिक प्रश्न आहे; यांत मी काय सांगणार ? " भालचंद्रांनीं निर्भीडपणें उत्तर दिलं. ज्या वैद्याला आणायला लांकडं आणायची गाडी पाठवली त्या वैद्याचं औषध घ्यायची तयारी झालेली पाहून डॉ. भालचंद्रांना आश्चर्यहि वाटलं आणि बरंहि पण वाटलं. " मी बोलावणार नाहीं त्यांना; आपली इच्छा असेल तर जरूर बोलवा. मीं बोलावलं आहे असं सांगा त्यांना वाटलं तर. "

वैद्यबुवांना आणण्यासाठीं या खेपेला घरांतली घोड्याची गाडी गेली. पहिल्यानं वैद्यबुवांनीं ' येत नाहीं ' असंच सांगितलं. पण डॉ. भालचंद्रांचं नांव आणि निरोप ऐकतांच बटवा घेऊन ते आले. दिवाणसाहेबांशीं न बोलतां डॉक्टरसाहेबांशीं ते बोलू लागले. औषध सुरू करण्याचा दिवाणसाहेबांचा विचार डॉक्टरसाहेबांच्या तोंडून ऐकून ते म्हणाले, " डॉक्टरसाहेब, केवळ तुम्हीं सांगतां म्हणून औषध देतों; रोज दहा तोळे ब्राह्मीचा पाला तीन महिने मिळेल तर यांचें आयुष्य आहे. शिवाय तीन महिन्यांनीं कांहीं दिवस यांनीं हवापालट केला पाहिजे. हें सगळं कबूल आहे का त्यांना हें विचारा अगोदर. " बर्‍यांकडून सर्व गोष्टी कबूल करवून घेतल्यावरच वैद्यबुवांनीं औषध द्यायला सुरुवात केली. सहा महिन्यांत बर्वे खडखडीत बरे झाले हें ऐकून सयाजीराव महाराजांपासून सर टी. माधवरावांपर्यंत सर्वांनाच बरं वाटलं. एक वर्षापूर्वी फारसा कुणाला माहीत नसलेला काठेवाडी वैद्य मणिशंकर प्रसिद्धीस आला. असाध्य समजलं गेलेलं दुखणं पूर्णपणें बरं केल्याबद्दल वैद्याला काय द्यावं हा प्रश्न अद्याप शिल्लक होताच. दोन हजार रुपये द्यावेत, असं डॉ. भालचंद्रांनीं सुचवलं. डॉ. भालचंद्रांच्या हातूनच पैसे द्यावेत, असं बर्‍यांचं मत पडलं. डॉ. भालचंद्रांनीं पैसे देतांच वैद्यराज म्हणाले, " पैशाच्या लोभानं मीं औषध दिलं नाहीं. आयुर्वेद काय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम.................. वि: ..................
क्रमांक .................. नों: दि: ..........



चमत्कार करून दाखवतो याची खात्री करून देण्यासाठीं आणि आपल्या शब्दाला मान देण्यासाठीं मीं औषध दिलं. मला पैसे नकोत.”

“ माझा मान राखण्यासाठीं जसं औषध दिलं तसं माझा मान राखण्यासाठीं पैसे घ्या. ‘ नाहीं ’ म्हणूं नका.”

एका दिवाणाची ‘ केस ’ बरी झाल्यावर मणिशंकरचं उखळ पांढरं झालं. एकट्या सर टी. माधवरावांनींच त्यांच्याकडून हजारों रुपयांची भारी किंमतीचीं किती तरी रसायनं तयार करवून घेतलीं.

* * *

माझ्या वडिलांचे एक स्नेही येथल्या ससून हॉस्पिटलमध्ये कारकून होते; घरची गरीबी, पदरीं तीन मुलं आणि त्यांत बायको बाळंतरोगानं आजारी ! तिला औषधाकरितां नवरा—नारायणराव जोशी—पैसे खर्च करीत असे पण कांहीं उपयोग होत नसे. माझ्या वडिलांच्या तोंडून डॉ. भालचंद्र, वैद्य मणिशंकर हीं नांवं नारायणरावांनीं ऐकलीं होतीं. त्यावरून ते म्हणाले, “ अरे देवभक्त, तुझा तो काठेवाडी धन्वंतरी इथं कधीं आला तर माझ्या बायकोची तब्बेत त्याला दाखवशील ? ” असं नारायणराव म्हणायला आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं मणिशंकर वडिलांकडे यायला एकच गांठ पडली. जव्हारच्या राणीची प्रकृति पाहण्यासाठीं तो पुण्यांत आला होता. लक्षांत ठेवून वडिलांनीं त्या ‘केस’ बद्दल मणिशंकरला विचारलं. त्यानं कबूल केल्यावर ते त्याला घेऊन गेले. त्या बाईंना तपासल्यावर माझ्या वडलांनीं वैद्याला एक रुपया ‘ फी ’ देण्याबद्दल नारायणरावांना सुचवलं. दिलेला रुपया खिशांत घालीत असतांच वडिलांनीं मणिशंकरचा हात पकडला आणि म्हटलं, “ मणिशंकर, ही ‘ केस ’ बरी होणार आहे ? ” मणिशंकरनं इतकंच सांगितलं, “ मी हरामचे पैसे घेत नाहीं कधीं. देवभक्त, ही बाई आपल्या पायांनीं दोन

महिन्यांत फिरायला लागेल." त्या बाईची स्थिति अत्यंत केविलवाणी झाली होती. पोटाचा नगारा आणि हाता-पायांच्या काड्या ! आळींतले लोक तर केव्हां बोलावणं येईल याबद्दल साशंक होते. एका फटकळ माणसानं वडिलांना वेड्यांत काढलं. " हा देवभक्त आहे अतिशहाणा. प्रेतांत जीव घालणारा एक काठेवाडी वैद्य त्यानं आणला आहे. तो या नाऱ्याच्या बायकोला उठवणार आहे म्हणे ! "

पुढें कांहीं दिवसांनीं ती बाई साफ बरी झाली. इतकंच नव्हे तर नंतर तिचीं तीन बाळंतपणं सुखरूप झालीं ! जेव्हां बिलाची रक्कम मणिशंकरला विचारली तेव्हा तो म्हणाला, " एक रुपया मीं आगाऊच घेतला आहे. शिवाय नवऱ्याला **बायको** मिळाली, मुलांना **आई** मिळाली आणि बाई पुन्हा संसाराला लागली हें समाधान पैशांनीं मिळणाऱ्या समाधानापेक्षांहि कांहीं और आहे. "

## ९

# बाणभट्टांची समस्या

अदमासें तेराशें वर्षें झालीं या गोष्टीला.

नेहमीं प्रसन्न असणारी बाणभट्टांची मुद्रा त्या दिवशीं विलक्षण गंभीर दिसत होती. कुठली तरी घोर चिंता त्यांच्या जिवाला लागून राहिली असावी, असें कुणालाहि त्यांच्या चर्येवरून स्पष्ट दिसून आलें असतें. किरकोळ काळजीच्या अभ्रांनीं मुखमंडल कोमेजून जाण्याइतकी बाणभट्टांची हळवी वृत्ति असती, तर गोष्ट निराळी. पण तसा त्यांचा स्वभावच नव्हता. रसिकवृत्तीचीं माणसें सहसा दुर्मुखलेलीं अशीं दिसत नाहींत. स्वतःच्या वांट्याला आलेल्या जीवनाच्या प्रत्येक क्षणांतून आनंद निर्माण करून स्वत बरोबर इतरांनाहि आनंदी करायचें, हें एकच ध्येय सदोदित त्यांच्या डोळ्यांपुढें असतें. बाणभट्टांच्या रसिकतेला सीमाच नव्हती. निसर्गाशीं एकरूप होऊन निसर्गाकडून वेळोवेळीं मिळालेले संदेश ग्रंथांच्या रूपानें एकत्र करून भावी पिढीकारितां आनंदाचा अमोल ठेवा निर्माण करायचा, हें एकच उद्दिष्ट मनांत ठेवून त्यांनीं आपलें लेखनकार्य चालू ठेवलें होतें. 'चंडिकाशतक', 'पार्वती-परिणय' व 'हर्षचरित' अशांसारखे ग्रंथ त्यांच्या हातून लिहून झाले होते, तरी त्यांच्या मनाचें अद्याप समाधान झालें नव्हतें.

हर्षचरितासारखा सुंदर ग्रंथ लिहिल्यावर बाणभट्टांचा बराच बोलबाला झाला होता. महाकवि म्हणून आधींच त्यांचा लौकिक होता. हर्षासारख्या गुणी राजानें योग्य पारख करूनच हें रत्न आपल्या संग्रहीं ठेवलें होतें.

हर्षांच्या दरबारांत राजकवि या नात्यानें बाणभट्टांची नेमणूक झाल्याची बातमी कांहीं लोकांना सहन होण्यासारखी नव्हती. "द्रव्याच्या लोभाला बळी पडून राजाला खूष ठेवण्याकरिता लिहिलेलं चरित्र" अशा तऱ्हेची टीका बाणभट्टांच्या कानावर मधून मधून येत होती. मत्सरी लोकांच्या तोंडाला हात लावण्यांत हंशील नसतें. स्वतःचें कार्य निष्ठापूर्वक चालू ठेवणें, हा एकच उपाय विरोधकांचे विषारी फूत्कार बंद पाडण्याकरितां उपयोगी पडत असतो.

रसिकांना भरपूर आनंद देईल अशी एखादी नितान्तरमणीय वाङ्मयकृति निर्माण करून विरोधकांचीं तोंडें बंद पाडावींत, अशी बाणभट्टांच्या मनाला एकसारखी तळमळ लागून राहिली होती. या हेतूनेंच त्यांनीं **कादंबरी** लिहायला सुरुवात केली होती. आजपर्यंत आपण लिहिलेले इतर ग्रंथ जरी लोकांच्या दृष्टीआड झाले तरी **कादंबरी** आपली कीर्ति कायम ठेवील, असा आत्मविश्वास हा ग्रंथ लिहायला सुरुवात केल्यापासूनच बाणभट्टांना वाटत होता.

अखंडपणें चालू असलेल्या ग्रंथलेखनाच्या या कामांत एकाएकींच एक विघ्न उपस्थित झालें. लिहितांना आतांशा आपला हात कांपतो, दिवसाच्या उजेडांत सुद्धां लिहिलेलीं अक्षरें नीट दिसत नाहींत आणि दिवसेंदिवस वार्धक्यामुळें आपली शक्ति क्षीण होत आहे या गोष्टीची जाणीव होतांच बाणभट्टांच्या अंतःकरणाला चांगलाच धक्का बसला! आपण आरंभलेला ग्रंथ पुरा होण्याच्या आंतच आपल्या आयुष्याचा ग्रंथ एकाएकीं आटोपला तर आपल्या मनांतली ही इच्छा अखेर अतृप्तच राहणार, असे निराशाजनक विचार त्यांच्या मनांत वारंवार डोकावूं लागले. काळाची निर्घृण झडप पडण्याच्या आंत कसेंहि करून हातीं घेतलेला हा ग्रंथ पुरा करायचाच, या निश्चयानें अंगांतल्या सर्व शक्ति एकवटून त्यांनीं आपलें काम झपाट्यानें चालवलें होतें. इतकें करूनहि

वाढत्या वार्धक्यापायीं क्षणोक्षणीं क्षीण होणाऱ्या शक्तीमुळें ही कलाकृति अखेर अपूर्णावस्थेंतच राहणार, या एकाच विचारानें ते खिन्न होऊन स्वस्थ बसले होते. थोड्या वेळानें भूषणभट्टांची स्वारी त्या ठिकाणीं आली.

आदल्या दिवशीं लिहून झालेला कादंबरीचा भाग दुसऱ्या दिवशीं भूषणभट्टाला वाचून दाखवावा, तें ऐकून भूषणभट्टांनीं आपल्या वडिलांच्या कल्पनाविलासाचें आणि भाषाप्रभुत्वाचें मनांतल्या मनांत मनमुराद कौतुक करावें, अंतःकरणापासून झालेल्या आनंदानें खुलून दिसणारी चिरंजीवांची मुद्रा पाहून वडिलांनाहि खूप हुरूप यावा आणि त्या हुरूपाच्या भरात कादंबरीचा पुढचा भाग लिहून व्हावा, असा कार्यक्रम गेले कित्येक दिवस अव्याहत चालू होता. वडिलांनीं लिहिलेला पुढचा भाग आज आपल्याला ऐकायला मिळणार, या विचारानें रोज सकाळीं उठल्याबरोबर भूषणभट्टाला मोठा उल्हास वाटत असे. पण आज वडिलांची ती विषण्ण मुद्रा पाहून भूषणभट्टांचें मन थोडें खट्टू झालें. जे आपले वडील रोज आपल्या येण्याची मोठ्या उत्सुकतेनें वाट पहात बसायचे आणि आपण आल्यावर प्रसन्न मुद्रेनें आपलें स्वागत करायचे ते आज इतके खिन्न कां दिसतात, हें भूषणभट्टाला समजेना. एखादी रम्य कल्पना सुचली तर त्या कल्पनाविलासाच्या तंद्रींत प्रहरन् प्रहर स्वस्थ बसतांना त्यानें आपल्या वडिलांना अनेकदां पाहिलें होतें. पण आजचा प्रकार जरा निराळाच आहे— कल्पनाविलासाच्या एकतानते-ऐवजीं काळजीची व्यग्रताच आपल्या वडिलांच्या चेहऱ्यावर दिसत आहे, हें भूषणभट्टाच्या तावडतोब लक्षांत आलें.

" बाबा, आज तुम्हांला बरं नाहीं वाटत ? " भूषणभट्टानें वडिलांना विचाराच्या तंद्रींतून जागें करण्याकरितां प्रश्न केला.

इतका वेळ खालीं घातलेलें डोकें हलकें हलकें वर. उचलून शून्य नजरेनें बाणभट्टांनीं भूषणभट्टाकडे पाहिलें.

" होय बाळ. कालपासून माझ्या अंगांत इतकी अशक्तता आली आहे कीं, हें काम यापुढें माझ्या हातून निभेल, असें मला वाटत नाहीं." कांपऱ्या कांपऱ्या आणि गहिंवरलेल्या आवाजांत हें वाक्य उच्चारतांना त्यांचे डोळे अश्रूंनीं तरारले होते.

" बाबा, इतकं वाईट वाटून कां घेतां ? तुम्ही मला सांगत जा रोज; मी लिहून घेत जाईन. "

" तसं झालं असतं तर मला समाधान वाटलं असतं. अलीकडे जास्त बोलण्याचे श्रमहि मला सहन होत नाहींत, हें माहीतच आहे तुला. ईश्वराच्या मनांतच नसलं तर........"

त्यांच्यानें पुढें बोलवेनाच. ग्रंथ अपुरा राहण्याची नुसती कल्पना सुद्धां त्यांना दुःसह होत होती.

" मी लिहून काढूं का पुढचा भाग ? लिहिलेलें रोज वाचून दाखवीत जाईन तुम्हांला, माझ्या हातून कांहीं चुकलें—माकलें तर आपण आहांतच. तुमचा ग्रंथ अपुरा राहील, असें तुम्ही मनांतसुद्धां आणूं नका."

भूषणभट्टाचें हें बोलणें ऐकून बाणभट्टांना मुलाच्या प्रेमळपणाचें जरी कौतुक वाटत होतें तरी त्याच्या कर्तबगारीबद्दल त्यांना विश्वास वाटत नव्हता.

" भूषण, किती वेडा आहेस तूं ! केवळ कल्पनांच्याच जोरावर जगांत कलाकृति निर्माण झाल्या असत्या, तर रचनाचातुर्याला कांहींच किंमत राहिली नसती. "

वडिलांचें हें उत्तर ऐकून भूषणभट्ट स्वस्थ बसला. आपल्या या उत्तरानें मुलाचें मन खट्टू झालेलें पाहून बाणभट्टांनाहि जरा वाईट वाटलें. थोड्या वेळानें ते म्हणाले,

" असा निराश होऊं नकोस. मी आरंभलेला ग्रंथ तुझ्या हातून पुरा झाला, तर मला त्या गोष्टीचं कौतुकच वाटेल. हें महत्त्वाचं काम तुझ्या हातून पार पडेल याबद्दल माझी खात्री होण्याकरिता तुझी मी इथल्या इथंच थोडक्यांत परीक्षा घेतों. तूं या परीक्षेंत उतरलास तर माझी कादंबरी तुझ्या हातून पुरी होईल, असा माझ्या मनांत विश्वास उत्पन्न होईल. तुला मी कवितेची एक ओळ सांगतों. त्या ओळीच्या अर्थाला धरून तूं मला दुसरी ओळ तयार करून दे. "

" कोणती ती ओळ ? "

वडिलांनीं अर्धवट संमति दिल्यामुळें झालेल्या आनंदाच्या भरांत भूषणभट्टानें मोठ्या उत्सुकतेनें विचारलें.

**" मालतीमुकुरे भाति गुञ्जन् मत्तमधुव्रनः "**

बाणभट्टांनीं सावकाश आणि स्पष्ट आवाजांत स्वतःच रचलेली एक ओळ म्हणून दाखवली.

" मधुमालतीच्या कळीवर बेभान स्थितींत गुंजारव करीत बसलेल्या भुंग्याकडे पाहून असें वाटतें कीं,...." इतकाच या ओळीचा अर्थ. काय वाटतें हें सांगून ती कविता पुरी करण्याची अट बाणभट्टांनीं घातली होती.

समस्येच्या रूपानें घातलेलें हें कोडें समाधानकारक रीतीनें सोडवायला भूषणभट्टाला कांहीं दिवसांचा अवधि लागेल, अशी बाणभट्टांची कल्पना होती. पण ही नुसती कल्पनाच ठरली. कारण फारसा वेळ न घेतां

**" प्रयाणे पञ्चबाणस्य शंखमापूरयन्निव "**

अशा रीतीनें भूषणभट्टानें ती समस्या बसल्या बैठकींतच पुरी करून टाकली !

ही ओळ ऐकतांच बाणभट्टांचा चेहरा रागानें गोरामोरा झाला. भूषणभट्टाची निर्भर्त्सना करण्याच्या हेतूनें ते म्हणाले,

" तुझ्यासारख्या अविचारी मुलाच्या हातून माझी कादंबरी पूर्ण होणें शक्य नाहीं. एका लहानशा ओळीचा पुरता विचार न करतां जो एकदम कांहीं तरी बडबडतो त्याच्या हातून असलीं कामें कधींच पार पडणार नाहींत. निसर्गाचें सूक्ष्म निरीक्षण केल्याशिवाय कांहीं कांहीं गोष्टी ध्यानांतच येणें शक्य नसतें ! "

" पण बाबा, समस्या पुरी करण्यांत माझ्या हातून अशी कोणती चूक झाली ? " भूषणभट्टानें वडिलांना विनयपूर्वक प्रश्न केला.

" कोणती चूक झाली ? विचारायलासुद्धां कांहीं वाटत नाहीं ! तुझी ही उपमा साफ चुकीची आहे. नीट विचार कर. मधुमालतीची कळी वर निमुळती असते. कळीच्या निमुळत्या भागावर बसून गुंजारव करणारा भुंगा मदनाच्या प्रयाणसमयीं शंख वाजवीत आहे, अशी कल्पना करणाऱ्या माणसालाच प्रथम शंखाची उपमा दिली पाहिजे ! शंख कोणत्या बाजूनें वाजवतात, हें माणसांनाच जिथें समजत नाहीं तिथें भुंग्याला काय समजणार ! "

भूषणभट्टाकडे दृष्टि रोखून बाणभट्ट बोलत होते. वार्धक्यामुळें त्यांची दृष्टि मंदावली होती, तरी असामान्य बुद्धिमत्तेचें तेज त्या रोखलेल्या डोळ्यांत तेवत होतें.

" ही गोष्ट लक्षांत घेऊनच मी ती उपमा मुद्दाम दिली आहे. तुम्हीं दिलेल्या ओळींत तो भुंगा मत्त आहे, असें म्हटलें आहे. ' मत्त ' या विशेषणाला जुळेल अशीच उपमा त्या भुंग्याला मीं दिली आहे. तो भुंगा झिंगलेला असल्यामुळें शंख कोणत्या टोंकाकडून वाजवतात, या गोष्टीचें त्याला भानच राहिलें नाहीं. "

भूषणभट्टानें शांतपणानें केलेला हा युक्तिवाद ऐकून बाणभट्टांच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. त्यांचा राग कुठल्या कुठेंच नाहींसा झाला. हर्षातिरेकानें भूषणभट्टाला मिठी मारून प्रेमळपणानें त्यांनीं त्याच्या पाठीवरून हात फिरवला. आपल्या नजरेंतून निसटलेली गोष्ट आपल्या मुलाच्या ध्यानांत आली, हें पाहून भूषणभट्टाच्या कुशाग्र-बुद्धीचें त्यांना मोठें कौतुक वाटलें.

" आज माझी काळजी दूर झाली. माझ्या हातून माझा हा ग्रंथ दुर्दैवानें पुरा झाला नाहीं तरी तूं तो पुरा करशील, अशी माझी आतां खात्री आहे. "

हें बोलत असतां बाणभट्टांचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... दि: ....................
क्रमांक .................... नों दि: ....................

## १०

# भोळा ब्राह्मण

पुष्कळ वर्षें झालीं त्या गोष्टीला.

एका गांवांत एक भोळसट आणि आचरट ब्राह्मण राहात होता त्याच्या हातून एकदां एक मांजर मेलें. चुकून का होईना, पण आपल्या हातून एक घोर पातक घडलें, या समजुतीनें त्याच्या जिवाला अगदीं चटका लागून राहिला.

कांहीं तरी प्रायश्चित्त घेऊन न कळत घडलेलें पाप नाहींसें करावें, म्हणून विठोबाच्या देवळांत पुराण सांगणाऱ्या पुराणिकबोवांकडे तो एके दिवशीं गेला आणि घडलेली सगळी हकीगत त्यानें त्यांना सांगितली. ती सगळी हकीगत ऐकून पुराणिकबुवांनीं चेहरा गंभीर केला आणि ते ब्राह्मणाला म्हणाले, " मांजर म्हणजे मार्जार ! मार्जारहत्येचं पातक म्हणजे जेहेत्ते ब्रह्महत्येच्या खालोखाल येणारं असं पातक ! "

तें ऐकतांच ब्राह्मण अगदीं घाबरून गेला. त्याचे हातपाय लटलटूं लागले. केविलवाण्या स्वरांत त्यानें विचारलें, " आतां त्याला उपाय ? "

" अहो, घाबरतां कां एवढं ? पाप आहे तिथं प्रायश्चित्त आहेच. ' प्रायश्चित्तेन शुद्ध्यति ' असं शास्त्रांत वचनच आहे मुळीं ! शिवाय,

**' मार्जारं यः सुवर्णस्य ब्राह्मणाय प्रयच्छति ।**
**गङ्गोदके च यः स्नाति तस्य पापं विनश्यति ॥ '**

असं स्पष्ट सांगूनच ठेवलं आहे आपल्या शास्त्रकारांनीं. तेव्हां सोन्याचं एक मांजर करून तें एखाद्या सत्पात्र ब्राह्मणाला दान करा; आणि

सर्वसंगपरित्याग करून राहिलेलं आयुष्य गंगातीरावर घालवा. म्हणजे तुमच्या पापाचा नाश झालाच म्हणून समजा ! ”

राहातें घर विकून आणि जवळ होतें नव्हतें तें किडुकमिडूक मोडून ब्राह्मणानें सोन्याचें मांजर तयार करवून घेतलं. दानाकरितां पुराणिकबुवांशिवाय दुसरा सत्पात्र ब्राह्मण त्याला कोण मिळणार ? सोन्याचें मांजर तयार करवून घेण्यापायीं ‘ सर्वसंगपरित्याग ’ करण्याची त्याची आपोआपच तयारी झाली होती !

सोन्याच्या मांजराचें यथाविधि दान करून दोन छाट्या, एक दंड आणि एक कमंडलु इतकी सामुग्री बरोबर घेऊन गंगातीर गांठण्याकरितां तो निघाला.

मजल दर मजल करीत पुष्कळ दिवसांनीं तो एका ओढ्याजवळ आला. उन्हाळ्यामुळें तो ओढा बहुतेक कोरडा ठणठणीत झाला होता. ठिकठिकाणीं डबक्यांतून सांठलेलें जें कांहीं पाणी दिसत होतें तेवढेंच ब्राह्मणाला वाटलें, गंगा गंगा म्हणतात ती हीच. म्हणून त्या ओढ्याच्या कांठावरच त्यानें आपला मुक्काम ठोकला व त्या डबक्यांतल्या पाण्यांत डुंबून त्यानें त्या ठिकाणीं पांच वर्षें काढलीं.

एके दिवशीं एक यति फिरत फिरत त्या ठिकाणीं आला. ब्राह्मणाचा हा कार्यक्रम पाहून त्यानें त्याला विचारलें, “ बेटा, ह्या वाळवंटावर राहून तूं हें काय चालवलं आहेस ? ”

“ यतिमहाराज, माझ्या हातून घडलेल्या एका घोर पातकाचं क्षालन करण्याकरितां ह्या गंगेच्या कांठावर राहून तपश्चर्या करीत असतों मी. ”

ब्राह्मणाचें हें उत्तर ऐकून तो यति खदखदां हंसला आणि म्हणाला, “ माझं इतकं वय झालं, पण आजपर्यंत असला आचरट प्रकार मीं

कानांनीं कधीं ऐकला नव्हता आणि डोळ्यांनीं कधीं पाहिलाहि नव्हता ! ह्या ओढ्याला गंगा समजणारा गंजड आजच दृष्टीस पडला माझ्या ! ”

“ म्हणजे ? ही गंगा नव्हेच तर ! मला वाटलं—”

पण त्या ब्राह्मणाचें वाक्य पुरें होण्याच्या आंतच तुच्छतादर्शक स्वरांत तो यति म्हणाला, “ चूक ! अगदीं चूक ! तुला कुणी तरी बनवलं आणि तूहि बनलास. अरे, गंगा इथून किती तरी लांब आहे. मूर्खा, असल्या ह्या ओढ्या-नाल्यांना जर गंगा नदीची योग्यता येऊं लागली, तर मुंग्यांच्या वारुळांना मेरु-मंदाराचं महत्त्व कां येऊं नये ? ”

हें ऐकून मनांत खजिल झालेला तो ब्राह्मण त्या यतीला म्हणाला, “ महाराज, माझ्या हातून होत असलेली चूक वेळींच दाखवून मला आपण सावध केलंत, ह्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. ”

असें म्हणून आणि दंड-कमंडलु घेऊन तो तेथून निघाला. जातां जातां वाटेंत त्याला एक नदी लागली. त्या नदीचें पात्र बरेंच मोठें होतें. त्याला वाटलें, हीच ती गंगा नदी. आतां आपल्या हातून पूर्वीं-सारखी चूक होणार नाहीं, असा विचार करून त्या नदीच्या तीरावर तळ देऊन तो पांच वर्षें राहिला.

त्या ठिकाणीं त्याची तपश्चर्या चालू असतां दुसरा एक यति तेथें आला. ब्राह्मणाचा हा खटाटोप पाहून तो यति त्याला म्हणाला, “ असल्या तऱ्हेचीं व्रतं गंगाकिनारीं करायचीं सोडून भलत्याच ठिकाणीं आयुष्याचे दिवस कां वायां घालवीत बसला आहेस तूं ? ”

हें ऐकून तो ब्राह्मण चकित झाला.

“ म्हणजे ! ही नदी गंगा नव्हेच तर ? ” असा उलट प्रश्न त्यानें त्या यतीला केला.

“ ह्या नदीला गंगा म्हणायचं असेल, तर जंबुकासारख्या क्षुद्र

प्राण्याला सिंह कां समजूं नये? भल्या माणसा, स्वप्नांत तर नाहींस तूं? ” असें म्हणून तो यति तेथून जाऊं लागला.

“ महाराज माझं नशीव थोर म्हणूनच माझी आणि आपली गांठ पडली. नाहीं तर रोज ह्याच नदींत रोज बुचकळ्या मारीत बसलों असतों; आणि गंगेंत स्नान केल्याचं खोटंनाटं समाधान मानून खऱ्या-खुऱ्या मोक्षाला मात्र मी कायमचा मुकलों असतों ! ”

इतकें म्हणून आणि दंड-कमंडलु घेऊन तो ब्राह्मण तेथून तावडतोब निघाला.

चालून चालून बरेंच अंतर गेल्यावर त्यानें नर्मदातीर गांठलें. नर्मदेचें तें विस्तीर्ण पात्र आणि पांढरेशुभ्र पाणी पाहून ती गंगा नदीच असावी, अशी त्याची खात्री झाली. आतां मात्र आपल्या हातून खास चूक होणार नाहीं, असें वाटून त्यानें तेथेंच मुक्काम ठोकला आणि तपश्चर्येला आरंभ केला.

इतक्या दिवसांनीं का होईना पण आपण अखेर गंगातीरीं येऊन पोहोंचलों, ह्या एकाच विचारानें त्याचा आनंद गगनांत मावेना. किती तरी यात्रेकरू त्या ठिकाणीं स्नानाकरितां येत असत. त्यामुळें ती नदी गंगा असल्याबद्दल त्याच्या मनांत तिळमात्रहि संशय राहिला नव्हता.

अशीच एक रम्य सकाळ होती. कुठली तरी पर्वणी असल्यामुळें त्या दिवशीं नर्मदेचा घाट यात्रेकरूंनीं नुसता फुलून गेला होता. नित्य नियमाप्रमाणें स्नान करण्याकरितां तो ब्राह्मण कंबरेइतक्या खोल पाण्यांत उतरला होता. त्याच्याच शेजारीं दुसराही एक यात्रेकरू पाण्यांत उभा राहून व मंत्र म्हणून नर्मदेला अर्घ्य देत होता. तो यात्रेकरू म्हणत असलेल्या मंत्रांत नर्मदेचा उल्लेख ऐकून ब्राह्मण त्याला म्हणाला, “ भटजीमहाराज, चुकतो आहे तुमचा मंत्र. मंत्रांत नदीच्या नांवाचा उच्चार करतांना काय म्हणालांत आपण ? ”

" म्हणायचं तेंच म्हणालों. नर्मदेला ' नर्मदा ' म्हणूं नको, तर काय ' गंगा ' म्हणूं ? " असें त्या यात्रेकरूनें कुत्सित उत्तर दिलें.

" माफ करा; रागावूं नका. मला वाटलं कीं, तुम्ही ' गंगा ' म्हणालांत निदान मला तरी तसं ऐकूं आलं. " असें म्हणून ब्राह्मणानें कशीबशी वेळ मारून नेली आणि त्याच दिवशीं तेथून आपला मुक्काम हालवला.

पंधरा वर्षांच्या खडतर तपश्चर्येनें ब्राह्मणाचें शरीर आतां अगदीं जर्जर झालें होतें. शिवाय वार्धक्यामुळें त्याच्या अंगांत फारसा त्राणही उरला नव्हता. अशा स्थितींत डोक्यावर ऊन्ह घेऊन पायपीट करतां करतां तो खूपच आजारी पडला. तरी पण अंगांतली सगळी शक्ति एकवटून गंगातीर गांठण्याकरितां त्याची धडपड चालूच होती. जीव मुठींत धरून आणि सावकाश पावलें टाकीत तो कांहीं दिवसांनीं एका टेकडीवर आला.

उजव्या हातांतल्या दंडावर शरीराचा भार टाकून, डाव्या हाताच्या तळव्याची डोळ्यांवर झडप करून व शरीरांतले प्राण डोळ्यांत एकवटून त्यानें एकदां सभोंवार दृष्टिक्षेप केला.

हाय ! हाय ! जिच्या दर्शनाकरितां गेलीं पंधरा वर्षें तो स्वतःच्या जीव अव्याहत पाखडीत होता, त्या गंगेच्या निर्मल पाण्याचा शुभ्र प्रवाह धो धो करीत स्वच्छंदानें नाचत–बागडत चाललेला त्याच्या दृष्टोत्पत्तीस येतांच त्याचें अन्तःकरण विस्मयानें भरून आलें. विस्मय आणि उत्सुकता या संमिश्र भावनांच्या उद्रेकानें उफाळणारें त्याचें काळीज आतां अगदीं जिभेच्या टोंकावर येऊन बसलें होतें.

" आई गंगे, तुझ्या प्रवाहांत स्वतःचा देह पुनीत करून मोक्ष मिळवण्याकरितां आजपर्यंत मीं जिवाचं रान केलं; पण तुझ्या ओझरत्या दर्शनावरच समाधान मानून रानावनांत प्राण सोडण्याचं माझ्या

कपाळीं आलं ! " असें तो म्हणत आहे तोंच डोळ्यांत एकवटलेले त्याचे प्राण खिळखिळ्या झालेल्या शरीराच्या अस्थिपंजरांतून भुर्रकन् उडून बाहेर पडले !

*　　*　　*

धर्मराज यमाच्या आसनासमोर तो ब्राह्मण उभा होता. प्रत्येकाच्या पाप-पुण्याची नोंद ठेवणारा चित्रगुप्त वहीचीं पानें चाळीत होता. सभा अगदीं शांत होती. इतक्यांत " काय म्हणते तुमची वही ? " असा प्रश्न यमानें चित्रगुप्ताला केला.

" राजाधिराज, त्या माणसाच्या हातून पृथ्वीवर प्राणिहत्येचं एकच क्षुल्लक पातक घडलं होतं; पण पंधरा वर्षं गंगेच्या काठीं कडक तपश्चर्या करून त्यानं तें पाप पार नाहींसं करून टाकलं आहे. "

हें ऐकतांच ब्राह्मणाला मोठा अचंबा वाटला. चित्रगुप्ताकडे वळून तो भीतभीत म्हणाला, " महाराज, कांहीं तरी चूक होते आहे आपली. गंगेच्या कांठावर पोहोंचण्यापूर्वींच मी ह्या ठिकाणीं येऊन दाखल झालों ! "

ब्राह्मणाच्या तोंडचे शब्द ऐकतांच यमधर्माला हसूं लोटलें. त्यामुळें ब्राह्मण जास्तच बुचकळ्यांत पडला.

पण इतक्यांत त्याला कुणी तरी सांगितलें, " बाबा रे, केवळ आचरणावरून मनुष्य मनुष्याची किंमत करीत असतो; पण अंतःकरणांतील विचारांवरून देव मनुष्यें पारखीत असतो. "

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम........................ दि: ........................
ग्रंथ........................ नों दि ........................

# ११ शेरास सव्वाशेर

एका गांवांत एक गाढव आणि एक बैल मोठ्या एकोप्यानें राहत होते. दोघांनाही धनी असा कुणीच नव्हता. वाटेल त्यानें, वाटेल तिथें आणि वाटेल तेव्हां त्यांना पकडावें, कामाला लावावें, मरेपर्यंत त्यांच्याकडून काम करून घ्यावें आणि कांहीं एक खायला न घालतां सोडून द्यावें.

किती तरी दिवस हें असेंच चाललें होतें. शेवटीं त्या दोघांनाही त्या तसल्या बेवारशी आयुष्याचा कंटाळा आला. कुठें तरी लांब—एखाद्या जंगलांत—पळून जाऊन स्वतंत्रपणानें राहून आपली उपजीविका करायची, असा त्या दोघांनींही एक दिवस निश्चय केला आणि तो तावडतोब अंमलांतही आणला.

चार-दोन दिवस रानांतल्या मोकळ्या वातावरणांत यथेच्छ हुंदडल्या-नंतर गाढवाला जरा हुषारी वाटूं लागली. खूपच हुरूप आला त्याच्या अंगांत. आनंदाच्या भरांत त्यानें खूप दुगाण्या झाडल्या. एकदा खूप मोठ्यानें खेंकाळावें आणि चैन करावी, असें त्याच्या मनांत आलें आणि त्यानें बैलाला तसें बोलूनहि दाखवलें.

पण तो बैल असला तरी थोडासा शहाणा होता. गाढवानें आपले गुण पाजळले तर काय अनर्थ ओढवेल हें बैल जाणून होता; म्हणून असला गाढवपणा न करतां जरा जपून वागण्याबद्दल त्यानें त्या गाढवाची चांगलीच कानउघाडणी केली. पण कसेंही झालें तरी गाढवच तें! बैलाचें

बोलणें गाढवाला थोडेंच पटणार ? बापसलेल्या वासरासारखी गाढवाची स्थिति झाली होती. तें बिलकूल ऐकेना. बैलानें त्याला स्पष्ट सांगितलें,

“ असला अविचार करूं नकोस. इतके दिवस आपण दोघांनींहि पाठी डुळडुळ्या होईपर्यंत ओझीं वाहिलीं आणि डोळ्यांत प्राण येईपर्यंत काबाडकष्ट केले, तरी तोंडानं हूं कीं चूं केलं नाहीं—दुःखाचा एक सुस्कारा सुद्धा आपण कधीं टाकला नाहीं. आतां कुठं नशिबानं चांगले दिवस येऊन पुरते चार दिवसही झाले नाहींत तोंच आनंदानं डुरकाळण्यांत किंवा खेंकाळण्यांत काय मोठा पुरुषार्थ आहे ! शिवाय आपण राहतों त्या जंगलांत आजूबाजूला वाघांची वस्ती आहे म्हणतात. फार जपून राहिलं पाहिजे आपल्याला; नाहीं तर येईल एखादा वाघ आणि उडवील आपला फन्ना, एका सपाट्यासरशीं ! माहीत कुठं आहे तुला ! ”

“ येऊं देरे वाघ. एकच काय, पण आजूबाजूचे सगळे वाघ आणि त्यांचा गोतावळा जरी या ठिकाणीं गोळा झाला तरी हा गबरू त्यांना यत्किंचित्‌हि भिणार नाहीं. आपल्याला झालेला आनंद वाघाच्या भीतीनं मनांतल्या मनांत दडपून टाकायचा, हा कुठला न्याय ! तें कांहीं आपण खेंकाळणार ! ” गाढवानें चोख उत्तर दिलें.

“ ठीक आहे तर मग. चालव तूं आपला हेका; आणि रहा तूं आपला एकटाच इथं. मी कुठं तरी दुसरीकडे निघून जातों.” बैलानें त्याला बजावलें आणि आपली वाट सुधारली.

बैल चार हात दूर गेला असेल नसेल तोंच भोंवतालची जमीन हादरून जाईपर्यंत तें गाढव जोराजोरानें आणि मुक्त कुंठानें खेंकाळलें. आणि अखेर व्हायचें तेंच झालें. बैलाची बत्तीशी अक्षरशः उमटली. गाढवाच्या त्या खेंकाळण्याबरोबर एक खूप मोठा वाघ, जिभल्या चाटीत, त्या ठिकाणीं आला.

"देवाची दया म्हणतात ती अशी." तो वाघ स्वतःशी म्हणाला, "अशी कडकडून भूक लागली होती मला! भूक कशी भागवावी ह्या विचारांतच होतों मी; तोंच या गाढवानं मला ह्या ठिकाणीं बोलावून आणलं."

गाढवाबरोबर त्या वाघाची नजर बैलावरही गेली. आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन, तशीच त्या वाघाची स्थिति झाली. खूपच आनंद झाला त्याला. आधीं बैलाचा फडशा उडवूं आणि नंतर गाढवाचा समाचार घेऊं, असें त्यानें मनाशीं ठरवलें आणि आपला मोर्चा बैलाकडे वळवला.

बैलाचा 'चट्टामट्टा' उडवल्यावर वाघाची वक्रदृष्टि आपल्याकडेच वळणार हें गाढवाला पुरतें माहीत होतें काय करावं ह्या विचारांत तें होतें, इतक्यांत बैलानें कळकळून फोडलेला हंबरडा त्याच्या कानांवर येऊन आदळला!

कसेंही झालें तरी बैलाची आणि आपली जुनी दोस्ती. थोड्या वेळापूर्वीं तो आपल्याला कितीही टाकून बोलला असला, तरी आपल्या गाढवपणामुळेंच त्याच्यावर हें प्राणसंकट ओढवलें आहे; कसेंही करून आपण त्याला ह्या संकटांतून सोडवलें पाहिजे. नाहींतर आपल्या सारखें गाढव आपणच. असें गाढव मनांत म्हणालें आणि एका क्षणाचाहि विचार न करतां त्यानें आपल्या अंगांतलें सगळें बळ एकवटून त्या वाघाची मान त्याने आपल्या जबड्यांत घट्ट पकडली.

ह्या अनपेक्षित संकटानें वाघाची गाळण उडाली. गाढवाचे दांत त्याच्या मानेंत इतके घट्ट रुतून बसले, कीं त्याला वेदना सहन होईनात. तो मोठ्यानें विवळूं लागला. विवळण्याकरितां त्यानें आपला जबडा उघडतांच त्याच्या तडाख्यांतून बैल साहजिकच निसटला आणि लांब

पळून गेला. गाढवानें मात्र वाघाला आपल्या जबड्यांत घट्ट पकडून ठेवलें होतें.

हा विचित्र प्रकार चालू असतांच त्या वाटेनें जाणारा एक शेतकरी तिथें आला. शेतांतलें काम आटोपून आणि खांद्यावर कुळव-कासरा टाकून तो घरीं चालला होता. त्या शेतकऱ्याचा स्वत:च्या डोळ्यांवरही विश्वास बसेना. तो देखावा होताच मोठा तसा चमत्कारिक! गाढवानें वाघ लोळवलेला ऐकला असेल कुणीं? प्रत्यक्ष पाहण्याचें तर नांवच नको!

आपली फजिती शेतकऱ्याच्या नजरेस पडली, हें लक्षांत येतांच वाघ फारच वरमला. शेतकऱ्याच्या विनवण्या करून तो काकुळतीनें म्हणाला, " पाटीलदादा, मला ह्या पिसाटाच्या तावडींतून सोडवा कीं हो ! "

तो शेतकरी कांहीं अगदींच भोळा नव्हता. त्यानें वाघाला साफ सांगितलें, " मरेनास तूं ! जग ओस पडणार आहे थोडंच तुझ्या मरणानं? तुझ्या दुष्टपणाचंच प्रायश्चित्त देव तुला भोगायला लावतो आहे. "

शेतकऱ्याच्या तोंडून देवाचें नांव निघतांच वाघाला आपल्या दुष्कृत्यांचा पश्चात्ताप झाला. त्याचे दोन्ही डोळे पाण्यानें तरारले. त्याचा कंठ अगदीं दाटून आला. " पुन्हां नाहीं मी कोणतंहि दुष्कृत्य करणार. ईश्वरसाक्ष सांगतों मी; तूं आपल्या हातानं ठार मार मला; पण गाढवाच्या हातून मला मृत्यु आला असा माझा दुर्लौकिक होऊं नये, इतकंच माझं तुझ्याजवळ शेवटचं मागणं आहे. ' नाहीं ' म्हणूं नकोस. देवाची शपथ आहे तुला ! " असें म्हणून वाघ हुंदके देऊं लागला.

तो शेतकरी जरी भोळा नव्हता, तरी देवभोळा होता हें मात्र खरें. वाघाची कींव आली त्याला. त्यांतून वाघानें, स्वत:चा प्राण वांचवण्या-

करितां देवाची शपथ घातली होती त्याला. खांद्यावरच्या कासऱ्यानें चांगले दोन-चार सपाटे त्यानें गाढवाच्या पाठीवर ओढले. पण त्याचा परिणाम मात्र अगदींच उलट झाला. पाठीवर बसत असलेले फटके सहन होईनात म्हणून गाढवानें आपले दांत जास्तच घट्ट आवळून धरले; आणि गाढवानें दांत जास्त आवळले म्हणून वाघाचे प्राण जास्तच कासावीस होऊं लागले. तेव्हां वाघानें शेतकऱ्याला विवळत विवळत सांगितलें, " पुरें कर तुझं तें मारणं. तूं जसजसं ह्या गाढवाला सपाटे लगावतो आहेस तसतसे माझे प्राण माझ्या कंठाशीं येत आहेत. कासऱ्यानं ह्याची पाठ सडकून काढण्याऐवजीं युक्ति-युक्तीनं तोच कासरा ह्याच्या दांताभोंवताळून काढून घेऊन घुसळून काढ ह्याची बत्तीशी; म्हणजे ह्याचा जबडा चांगला रंधून निघेल आणि माझी ह्याच्या तावडींतून सुटका होईल. "

शेतकऱ्यानें वाघाची सूचना ताबडतोब अंमलांत आणली. गाढवाची कवळी साफसूफ होऊन त्याच्या जबड्याचं अगदीं बोळकं झालं आणि वाघ गाढवाच्या तडाख्यांतून जिवानिशीं बाहेर पडला. प्राणावर बेतलेलें संकट टळलें, म्हणून वाघाला हायसें वाटलें. ह्या झटापटींत तो इतका दमून गेला होता, कीं शेतकऱ्याचें आभार मानण्याइतकेंही अवसान त्याच्या अंगांत उरलें नव्हतें. पाय ताणून हिरवळीवर तो स्वस्थ पडला होता. शेतकरीही, वाघाची विशेष विचारपूस न करतां, कुळव-कासरा घेऊन झपाट्यानें तेथून पसार झाला.

अंगांत थोडेंसें अवसान आल्यावर वाघ आपल्या जखमा चाटूं लागला. दांत पडून विद्रूप झालेला चेहरा, दुसऱ्याला दाखवायची गाढवाला लाज वाटूं लागल्यामुळें त्यानें तेथून केव्हां ' पोबारा ' केला होता, हें कुणाच्याच लक्षांत आलें नाहीं.

जखमा चाटतां चाटतां वाघाच्या डोक्यांत विचारांचें नुसतें काहूर

माजलें होतें. गाढवासारख्या प्राण्याकडून आपली इतकी बेअब्रू होऊन असलें अपमानकारक जिणें जगण्यापेक्षां आपण त्या शेतकऱ्याच्या हातून मेलों असतों तरी एक वेळ बरें झालें असतें. न जाणो, तो शेतकरी स्वतःची शेखी मिरवण्याकरितां म्हणून माझ्या बेअब्रूचा डांगोरा सगळ्या गांवभर पिटील आणि आमच्या जातींत ह्या गोष्टीचा जर का गवगवा झाला, तर सगळी जात मला वाळीत टाकील. शिवाय आमच्या जातींत नामुष्की होईल ती वेगळीच. तें कांहीं नाहीं, त्या शेतकऱ्याचें तोंड कायमचेंच बंद करून टाकलें पाहिजे म्हणजे त्याची जिभली कुणाच्याच कानाशीं वळवळणार नाहीं आणि आपल्या मार्गांतला कांटाहि सहजासहजीं दूर होईल.

शेवटचा विचार मनांत येतांच वाघानें शेतकऱ्याचा पाठलाग सुरू केला. थोड्याच वेळांत त्यानें शेतकऱ्याला गांठलें आणि एक जोराची डरकाळी फोडली.

शेतकरी मागें वळून पाहातो तों काय ! वाघ लाल डोळे करून टक लावून पाहात असलेला त्याला दिसला. बऱ्याचशा घाबरटपणानें पण थोड्याशा धिटाईनें तो वाघाशीं थोडें-फार बोलणार तोंच वाघ त्याच्यासमोर येऊन उभा राहिला आणि त्याला दरडावून म्हणाला, " ए नांगऱ्या, चाललास कुठं ? थांब; तुला मी मटकावणार ! "

" कां रे बाबा ? मला कां तूं खाणार ? तुझा प्राण वांचवला, म्हणून माझा प्राण घेऊन तूं माझे उपकार फेडतोस होय ? " अडखळत अडखळत शेतकऱ्यानें विचारलें.

" अलबत् ! तुला आज जिवंत ठेवला, तर तूं माझ्या फजितीचे पोवाडे गाऊन आमच्या कुळीला काळिमा आणशील आणि उद्यांपासून लोक सगळ्या वाघांना शेळपट समजतील. मेलेलीं माणसं कधींच चुगल-

खोरी करीत नाहींत, हें माहीतच आहे तुला." वाघानें, जमिनीवर शेपटी आपटीत आपटीत, उत्तर दिलें.

"काय कृतघ्न पशु आहेस रे तूं!" शेतकरी संतापानें बोलून गेला.

"चूप! वाघांना आणि मांजरांना कृतज्ञतेचे धडे शिकवणारा तूंच पहिला मनुष्य दिसतोस मला!" वाघानें तुच्छतापूर्वक उत्तर दिलें.

आपण आतां जिवंत राहात नाहीं, अशी शेतकऱ्याची बालंबाल खात्री झाली; तरी पण एक शेवटचा उपाय करून पाहावा, ह्या हेतूनें त्यानें वाघाच्या पायांना घट्ट मिठी मारली आणि तो वाघासमोर जमिनीवर सपशेल पालथा पडून म्हणाला, "माझी जीभ टाळ्याला घट्ट शिवून टाकतों पाहिजे तर, पण मला मारूं नकोस. मी ह्या गोष्टीसंबंधीं एक अक्षरहि बोलणार नाहीं कुठं. विश्वास ठेव माझ्यावर; पण असलं अघोर कृत्य करूं नकोस."

शेतकरी अगदींच ढेपाळलेला पाहून वाघालाहि त्याची कींव आली. शरणागताचा जीव घेणें त्याच्याहि जरा जिवावर आलें. जीव गमावण्याच्या भीतीमुळें त्या शेतकऱ्याची उडालेली गाळण पाहून वाघ गालांतल्या गालांत हंसला.

"ठीक आहे. सोडून देतों तुला; पण खबरदार ह्या गोष्टीची कुठं वाच्यता करशील तर! एक शब्द तर काढ तोंडांतून, कीं भरलींच तुझीं शंभर वर्षं!"

एकदांसुद्धां मागें वळून न पाहतां शेतकरी जीव घेऊन पळाला आणि त्यानें कशीबशी आपली झोपडी गांठली एकदांची. दार लावायला म्हणून त्यानें एकदांच मागें वळून पाहिलें; पण वाघहि आपल्या मागोमाग येऊन अंगणांत धापा टाकीत बसला आहे हें जेव्हां त्याला कळून आलें, तेव्हां तर त्याची पांचावर धारण बसली. कसेंबसें झोपडीचें दार बंद करून तो आंत जाऊन बसला.

नवरा इतक्या लगबगीनें घरीं परत आलेला पाहून त्याच्या बायकोला फारच आश्चर्य वाटलें. बायको कसली ! महामायाच होती ती— कडक आणि जहांबाज.

" काय वाघ-बिघ लागलाय् होय तुमच्या मागं ? इतकं धांवायला काय झालं ? अहाहा ! काय पण, दिवे ओवाळा ! " ती एकदम खेकसली आणि हातांचीं निरांजनें करून तिनें आपल्या नवऱ्याला ओवाळलेंसुद्धां ! बिचारा शेतकरी ! तो तरी काय बोलणार आपल्या कडक लक्ष्मीपुढें ! स्वस्थ बसून होता तो बिचारा. एक नाहीं कीं दोन नाही. त्यामुळें ती जास्तच चिडली आणि नवऱ्याला अद्वातद्वा बोलूं लागली.

तिच्या तोंडाची सरबत्ती थोडा वेळ तरी बंद पडावी, ह्या हेतूनें तो इतकेंच पुटपुटला. " आज एक गम्मत पाहिली रानांत…. " पण त्याचें वाक्य पुरतें होण्याच्या आंतच बाहेरून एक डरकाळी आली. त्याला एकट्यालाच ऐकूं आली ती. तो पुढें जें कांहीं बोलणार होता तें सगळें तोंडांतल्या तोंडांतच राहिलें. " पण नाहींच सांगत मी…. " असें कांहींसें तो बोलला आणि पुन्हा स्वस्थ बसला.

" सांगत नाहीं ? सांगितलंच पाहिजे मला. पाहिलं का माझ्या हातांत काय आहे तें ? " असें म्हणून त्याच्या बायकोनें हातांतली काठी हवेत नाचवली. कबुलीजबाबांसाठीं आणलेल्या एखाद्या आरोपी-सारखी त्याची स्थिति झाली. माराच्या भीतीनं त्यानें सगळी हकीगत भडाभड सांगून टाकली, पण मरणाची भीति मात्र त्यानें कायमची मागें लावून घेतली; कारण बाहेर बसलेल्या वाघानें " येच आतां तूं बाहेर ! " हे रागानें उच्चारलेले शब्द त्याला स्पष्ट ऐकूं आले. रात्रभर त्याच्या डोळ्याला डोळा लागला नाहीं.

कासराभर दिवस वर आला तरी नवरा झोपडी सोडून शेतावर

कामाला जाण्याची भाषा करीत नाहीं हें जेव्हां त्याच्या बायकोच्या लक्षांत आलें, तेव्हां तिनें त्याच्या अंगावरचें कांबळें खसकन् ओढून दूर फेकून दिलें, त्याची न्याहारी त्याच्यापुढें आणून आदळली आणि आपल्या तोंडाचा पट्टा सुरू केला.

" बाहेर पडलों, कीं मेलोंच ! तो वाघ माझी चटणी उडवील. " असें म्हणून तिची समजूत घालण्याचा त्यानें मोठ्या मिनतवारीनें प्रयत्न केला. पण व्यर्थ !

हातांतल्या आसूडानें नवऱ्याच्या पाठीवर दोन फटकारे ओढून तिनें त्याचें मानगूट पकडून त्याला झोपडीबाहेर काढलें आणि " कुठं आहे तो वाघ ? चांगलाच समाचार घेतें त्या मेल्याचा.... " असें म्हणून आणि पदर कसून ती बाहेर अंगणांत येऊन उभी राहिली.

त्या महिषासुरमर्दिनीचा तो अवतार पाहतांच शेतकऱ्यावर सूड उगवण्याचा वाघाचा विचार जागच्या जागींच थंड झाला जिवाचें रान करून तो रानांत पळाला. त्याला पळतां भुई थोडी झाली !

—आणि त्या दिवसापासून तो वाघ कधींच कुणाला दिसला नाहीं !

## १२ कर्णाची दंतकथा

कौरववीर कर्ण रणांगणावर लढतां लढतां वर्मी प्रहार झाल्यामुळें मृत्यूचे अखेरचे क्षण मोजीत स्वत:च्या शिबिरांत तळमळत पडला होता !

जमिनींत रुतलेलें स्वत:च्या रथाचें चाक काढीत असतां अर्जुनानेंच त्याच्यावर प्रहार केला होता. चाक काढण्याकरितां हातांतलें शस्त्र बाजूला ठेवलें असतां विरुद्ध बाजूच्या वीरानें वार करणें हें कृत्य युद्ध-शास्त्राच्या नियमांना अनुसरून होत नाहीं—हें धर्मयुद्ध नव्हे—असा एक मुद्दा कर्णानें उपस्थित केला होता. पण पांडवांशीं वागतांना कौरवांनीं आजपर्यंत धर्मयुद्धाचे नियम कितपत कसोशीनें पाळले ह्याबद्दलचा पूर्वेतिहास जेव्हां श्रीकृष्णानें वाचून दाखवला, तेव्हां मात्र कर्ण निरुत्तर झाला.

कर्णाची ही अशी अवस्था झाल्यामुळें कौरवसेनेंत विषण्ण वातावरण पसरलें होतें; तर कर्णासारखा पराक्रमी वीर निकामी केल्यामुळें पांडवांच्या शिबिरांत समाधानाची भाषा ऐकूं येत होती. अर्जुनासह सर्व वीर स्वत:च्या कर्तबगारीचें रसभरित वर्णन करण्यांत दंग होऊन गेले होते. श्रीकृष्णाची मुद्रा मात्र अत्यंत गंभीर झाली होती. सर्वांचें बोलणें तो शांतपणानें ऐकत होता; पण स्वत: एकहि शब्द बोलत नव्हता.

श्रीकृष्णानें अशा वेळीं उत्साहवर्धक असें कांहीं तरी बोलावें, अशी सर्वांचीच अपेक्षा होती. सभोंवार पसरलेल्या ऐन उत्साहाच्या वाता-

वरणांत एखादी प्रमुख आणि सन्माननीय व्यक्ति विमनस्क स्थितींत असली तर त्या ठिकाणीं हजर असलेल्या इतर व्यक्तींच्या उत्साहाला थोडासा पायबंद बसतो. ह्या वेळींहि असेंच झालें. आत्मकर्तृत्वाच्या वर्णनांनीं वटवटणारीं तोंडें हळूहळू बंद पडलीं आणि सर्वत्र शांततेचें साम्राज्य पसरलें.

थोड्या वेळानें श्रीकृष्णाला उद्देशून युधिष्ठिरानें बोलायला सुरुवात केली.

" श्रीकृष्णा, तूं कांहींच कसा बोलत नाहींस ? तुझ्या मनांत कसले तरी गंभीर विचार चालले असावेत, असं तुझ्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत आहे. तुझी हरकत नसेल तर ह्या वेळीं तुला काय वाटत आहे तें, मन मोकळं करून, आम्हां सर्वांना स्पष्टपणें सांग. मनांत कोंडलेल्या विचारांना तोंडावाटें मोकळीक करून दिल्याखेरीज मन हलकं होत नसतं. हें तुझ्यासारख्यांना आम्हीं सांगायला का हवं ? "

धर्माच्या ह्या भाषणानें मनांतले विचार व्यक्त करायला श्रीकृष्णाला अनायासेंच संधि मिळाली. अर्जुनाकडे वळून तो म्हणाला, " अर्जुना, कर्णावर विजय मिळविल्यामुळें तूं बराच हुरळून गेल्यासारखा दिसतोस ! निःपक्षपातीपणानं विचार केला तर, तुझ्या हातून कर्ण रणांगणावर पडण्यासारखा नव्हता हें तुलासुद्धा कबूल करावं लागेल. कर्णासारखा श्रेष्ठ प्रतीचा धुनर्धारी वीर आणि त्याहीपेक्षां श्रेष्ठ प्रतीचा दाता पुन्हा होणं शक्य नाहीं. अशा प्रकारच्या श्रेष्ठ योद्ध्यावर अखेर कपटाचा आश्रय करूनच आपल्याला मात करावी लागली, ह्या विचारानं माझं मन अस्वस्थ झालं आहे. "

" पराक्रमाच्या बाबतींत कर्ण अर्जुनापेक्षां श्रेष्ठ होता, ही गोष्ट विचारांतीं मलाहि पटते; पण दातृत्वाच्या बाबतींत तो सर्वश्रेष्ठ होता हें तुझं म्हणणं मला तितकंसं पटत नाहीं. " युधिष्ठिरानें आपलें मत दिलें.

स्वतःच्या दातृत्वामुळें युधिष्ठिरालाहि अस्मान ठेंगणें वाटूं लागलें आहे, हें श्रीकृष्णाच्या तेव्हाच ध्यानांत आलें.

" प्रत्यक्ष पडताळा आल्याशिवाय कांहीं गोष्टी पटत नसतात, हें मलाहि मान्य आहे. योग्य वेळ आली म्हणजे मी म्हणतों त्या गोष्टीचें प्रत्यंतर तुला आणून देईन." श्रीकृष्णानें युधिष्ठिराला निक्षून सांगितलें आणि तें बोलणें तितक्यावरच थांबलें.

* * *

मध्यरात्र उलटून गेल्यामुळें जिकडे तिकडे शांतता पसरली होती. दरिद्री आणि वृद्ध ब्राह्मणाचा वेश घेऊन काठी टेकीत टेकीत चाललेला श्रीकृष्ण आपल्याला कुठें आणि कशाकरितां घेऊन चालला आहे हें वेषान्तर केलेल्या युधिष्ठिरालाहि समजेना ! श्रीकृष्णाच्या सांगण्यावरूनच त्यानें स्वतःचा वेष बदलला होता. त्यानें श्रीकृष्णाला त्यासंबंधीं अनेकदां विचारलें; पण श्रीकृष्णाचें प्रत्येक प्रश्नाला एकच उत्तर, " चल तर माझ्याबरोबर. समजेल तुला आपोआप. "

बरेंचसें अंतर चालून गेल्यावर ते दोघेहि कर्णाच्या शिबिरापाशीं येऊन पोहोंचले. मरणोन्मुख होऊन पडलेल्या कर्णाचें विव्हळणें रात्रीच्या शांततेंत त्यांना स्पष्टपणें ऐकूं येत होतें.

कर्णाला आशीर्वाद देण्यासाठीं दोन ब्राह्मण शिबिरांत शिरत आहेत हें पाहून द्वारपालानें त्या उभयतांना मुळींच प्रतिकार केला नाहीं.

अंतकाळ समीप आल्यामुळें कर्णाची मुद्रा म्लान झाली होती. शुश्रूषा करीत असलेले सेवक खालीं माना घालून हताश होऊन स्वस्थ बसले होते. मिणमिणणाऱ्या मशालींच्या उजेडांत दिसणारें तें दृश्य जितकें भेसूर तितकेंच कारुण्यपूर्ण होतें.

आंत येणाऱ्या माणसांची चाहूल लागतांच अर्धवट डोळे उघडून कर्णानें विचारलें, " कोण आहे ? " त्याचा आवाज खोल गेला होता. अंगांत शक्ति तर मुळींच उरली नव्हती.

ब्राह्मणवेषधारी श्रीकृष्ण पुढें होऊन म्हणाला, " मी एक गरीब आणि वृद्ध ब्राह्मण आहे. तुला आशीर्वाद देण्यासाठीं मुद्दाम येथपर्यंत आलों. "

" द्विजराज, या, वसा. मी आपला फार आभारी आहे. आपला आशीर्वाद मला स्वर्गापर्यंत सोबत करील, अशी मला पूर्ण खात्री आहे. रणांगणावर देह ठेवण्याचं समाधान मला मिळत असलं तरी एका विचारानं माझ्या मनाला यातना होत आहेत... " मोठ्या कष्टानें कर्ण अडखळत अडखळत बोलत होता. तेवढ्या बोलण्याच्या श्रमानें सुद्धा त्याला पुन्हा ग्लानि आली. क्षणभर विसावा घेतल्यावर त्यानें पुढें बोलण्यास सुरुवात केली—

" विप्रराज, आपण मला आशीर्वाद दिलेत; पण त्या अमोल आशीर्वादांच्या मोबदल्यादाखल आपल्याला देण्यासारखं मजजवळ ह्या ठिकाणीं कांहींसुद्धां नाहीं. माझ्या अंतकाळीं आपल्यासारख्या सत्पात्र ब्राह्मणाला निराश करण्याचं दुर्दैव माझ्या वांट्याला यावं हा विचारसुद्धा मला सहन होत नाहीं. "

पण इतक्यांत त्याला कसली तरी आठवण झाली. मृत्यूच्या छायेमुळें काळवंडलेल्या त्याच्या मुद्रेवर क्षणभर आनंदाची छटा पसरली. शेवटचें बळ एकवटून तो म्हणाला, " महाराज, थांबा. निराश होऊन जाऊं नका. हे पाहा माझे सोन्यानं मढवलेले दांत. माझ्या अंगांत बळ नाहीं. ते काढून घ्या. माझ्यावर एवढी दया कराच. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत कर्णानं कोणाही याचकाला विन्मुख पाठविलं नाहीं, इतकें तरी समाधान मला लाभूं द्या; म्हणजे मी सुखानं डोळे मिटीन ! "

असें म्हणून कर्णानें आपले डोळे अखेरचे मिटले !

ब्राह्मणवेषधारी श्रीकृष्णानें युधिष्ठिराकडे पाहिलें.

युधिष्ठिराच्या डोळ्यांतून अश्रू वाहात होते !

## १३

# विदुराघरच्या कण्या

सभेंत घडलेल्या तो प्रकार पाहून विदुराचें मन फारच अस्वस्थ झालें होतें. घरीं परत आल्यापासून त्याच्या डोक्यांत एकसारखे तेच विचार चालले होते : " शिष्टाई करण्याकरितां आलेल्या श्रीकृष्णासारख्या पुरुषोत्तमाचा अपमान दुर्योधनानं करायला नको होता. निदान धृतराष्ट्रानं तरी वडीलकीच्या नात्यानं श्रीकृष्णाच्या म्हणण्याला मान द्यायला हवा होता. तसं म्हटलं तर पांडव तरी जास्त काय मागत होते ? पांच भावांकरितां पांचच गांवं ना ? पण तींसुद्धां देण्याचं कौरवांनीं कबूल करूं नये ! ' पांच गांवंच काय, पण सुईच्या टोकावर राहील इतकी मातीसुद्धा आमच्याशीं युद्ध करूनच मिळवावी लागेल ' असं उद्धटपणाचं उत्तर देणं दुर्योधनाला तरी शोभलं का ? दुर्योधनाच्या त्या बेताल जिभेला धृतराष्ट्रानं वेळींच आळा घालायला हवा होता. पांडवांच्या मागण्या फेटाळूनच लावायच्या होत्या, तर सबंध हस्तिनापूर गुढ्या-पताकांनीं शृंगारून श्रीकृष्णाच्या स्वागताचा देखावा करण्याची तरी काय जरूर होती ? वरवरच्या ह्या भपक्याला भुलून पांडवांचा पाठीराखा कौरवांचा पक्षपाती होईल असं का ह्यांना वाटलं ? "

अशा प्रकारचे विचार विदुराच्या डोक्यांत घोळत होते. जरी तो आपल्या नेहमींच्या व्यवसायांत गढून गेला होता, तरी त्याची चर्या उदास दिसत होती.

कोणत्याही गोष्टीचा निःपक्षपाती दृष्टीनें विचार करणारीं भीष्माचार्या-

सारखीं जीं कांहीं थोडीं माणसें कौरवांच्या पक्षांत होतीं, त्यांपैकीं विदुर हा एक होता. कौरवांच्या अन्नाला जागून केवळ कर्तव्य म्हणूनच तो स्वतःचें शरीर त्यांच्या सेवेंत राबवीत होता. पण त्याच्या मनाचा ओढा मात्र पांडवांकडे होता. द्यूताच्या अटींप्रमाणें पांडवांनीं बारा वर्षांचा वनवास व एक वर्षाचा अज्ञातवास पार पाडल्यावर त्यांच्या राज्याचा वांटा आपण होऊनच कौरवांनीं त्यांना देऊन टाकावा, असें विदुराचेंहि मत होतें. पण भीष्माचार्यांसारख्या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध माणसाच्या मताला ज्या कौरवसभेनें धुडकावून लावलें त्या कौरवसभेंत विदुराला कोण विचारणार ?

शक्य तितक्या गोडीगुलाबीनें पांडवांना त्यांच्या राज्याचा वांटा मिळावा असें स्वतः श्रीकृष्णालाहि वाटत होतें. म्हणूनच तो आपण होऊन कौरवांकडे शिष्टाई करण्याकरितां आला होता श्रीकृष्णासारख्या अद्वितीय वक्त्याचें कौरवसभेंत होणारें भाषण ऐकण्याच्या हेतूनें विदुर मुद्दाम त्या ठिकाणीं हजर राहिला होता. कौरवांनीं केलेल्या स्वागताच्या देखाव्याला भुलून न जातां श्रीकृष्णानें अगदीं सडेतोड भाषण केलें. पांडवांच्या बाबतींत कौरवांकडून होत असलेल्या अन्यायाचें पुरेपूर माप त्यानें जेव्हां धृतराष्ट्राच्या पदरांत घातलें, तेव्हां तर दुर्योधनाच्या अंगाचा चांगलाच भडका उडाला. निरुत्तर झालेला दुर्योधन जेव्हां दुरुत्तरें करूं लागला, तेव्हां विदुराला फारच चीड आली. गोष्टी ह्या थराला आल्यानंतर त्या ठिकाणीं जास्त वेळ थांबण्यांत अर्थ नाहीं असा विचार करून विदुर घरीं निघून गेला. कोकिळांचें मधुर कूजन ऐकल्यानंतर कावळ्यांचा कर्कश कलकलाट ऐकण्याकरितां कोण थांबेल ?

आपले शिष्टाईचे प्रयत्न अशा रीतीनें निष्फळ झालेले पाहून श्रीकृष्ण जेव्हां सभेंतून जाऊं लागला, तेव्हां धृतराष्ट्र त्याच्या मागोमाग गेला आणि मोठ्या आर्जवानें त्याला म्हणाला, " कृष्णा, माझीं मुलं माझ्या

ताब्यांत नाहींत ह्या गोष्टीला माझा इलाज नाहीं. सुयोधनाचं बोलणं मनावर घेऊन तूं रागावूं नकोस. इतक्या लांबून आल्यासारखा थोडी विश्रांति घे. तुझ्या पंक्तीचा लाभ आम्हां सर्वांना मिळावा, म्हणून तर तुझ्याकरितां आम्हीं मुद्दाम मेजवानीचा बेत केला. आमच्या विनंतीचा तूं अनादर करणार नाहींस, ही माझी पक्की खात्री आहे."

धृतराष्ट्रानें पसरलेल्या ह्या मोहजालांत श्रीकृष्ण थोडाच सांपडणार! धृतराष्ट्राच्या तोंडून जेवणाचें नांव निघतांच कौरवांच्या दुटप्पी वर्तनाचा त्याला फारच राग आला. क्षणाचाहि विचार न करतां तो म्हणाला, " राजा, तूं स्वतःला सुज्ञ म्हणवतोस, पण साध्यासुध्या गोष्टीहि तुला माहीत नसाव्यात, ह्याचं मला नवल वाटतं! एकानं दुसऱ्याच्या घरीं जाऊन अन्न भक्षण करणं ही गोष्ट तुला इतकी क्षुल्लक वाटते होय? परस्परांबद्दल वाटणारं प्रेम एकमेकांना एकमेकांच्या घरीं जेवणाच्या निमित्तानं ओढून आणतं; किंवा उपाशी पोट तरी अन्नाच्या आशेनं एकाला दुसऱ्याच्या दारीं जायला भाग पाडीत असतं. दुसऱ्याच्या घरीं जाऊन जेवण्याकरितां तिसरं कारणच संभवत नाहीं. प्रेमाखातर तुम्ही सर्वजण मला जेवणाचा आग्रह करीत असाल असं म्हणावं, तर तें तुमचं प्रेम थोड्या वेळापूर्वी मला चांगलंच दिसून आलं! केवळ अन्नाला महाग झाल्यामुळं मीं तुझ्याकडे जेवावं अशीहि आज माझी परिस्थिति नाहीं!" असें झणझणीत उत्तर देऊन श्रीकृष्ण आपल्या रथांत जाऊन बसला व त्यानें विदुराच्या घराकडे रथ नेण्याबद्दल दारुकाला सांगितलें.

वैश्वदेव आटोपून काकबलि टाकण्याकरितां विदुर घराबाहेर येतो, तोंच रथांतून उतरत असलेला श्रीकृष्ण त्याच्या दृष्टीस पडला. आश्चर्यामुळें एखाद्या पुतळ्याप्रमाणें विदुर स्तब्ध उभा राहिला. " विदुरा, काकबलि टाकण्याच्या वेळीं अतिथींची चौकशी करावी, असा रिवाज

असूनहि तूं कांहींच बोलत नाहींस? हा पाहा, तुझ्या घरीं एक अतिथि आपण होऊन आला आहे; त्याला घरांत घे आणि आपल्या पंक्तीचा लाभ दे." असें म्हणून हसत हसत श्रीकृष्ण विदुराच्या आधींच त्याच्या घरांत शिरला. श्रीकृष्ण आपली थट्टा तर करीत नाहीं ना, असेंच विदुराला वाटलें. राजवाड्यांतली पंचपक्वान्नांची मेजवानी सोडून श्रीकृष्ण आपल्या घरीं जेवायला आला हें विदुराला थोडा वेळ खरेंसुद्धा वाटेना.

श्रीकृष्णासारखा थोर पुरुष आपल्यासारख्या सामान्य माणसाकडे आपण होऊन जेवायला आला ह्या विचारानें विदुराला फारच आनंद झाला; पण आपल्या घरच्या कदन्नानेंच आज आपल्याला त्याचें आदरातिथ्य करावें लागणार, असें मनांत येतांच त्याला वाईटहि वाटलें. विदुराची बावरलेली स्थिति ओळखून श्रीकृष्ण म्हणाला, "काय असेल तें खाऊन जाण्याच्या तयारीनंच मी आलों आहें. विशेष कांहीं करण्याचे श्रम घेऊं नकोस. तावडतोब जेवून आत्तांच्या आत्तां मला इंद्रप्रस्थाला गेलं पाहिजे. सभेंत घडलेली हकीकत ऐकण्याकरितां युधिष्ठिर माझी वाट पाहात असेल."

पत्रावळीवर वाढलेल्या त्या पातळ कण्या खाण्याचा श्रीकृष्णाच्या आयुष्यांतला तो पहिलाच प्रसंग होता. आपल्या घरचें हें विचित्र पक्वान्न श्रीकृष्णाला कितपत आवडेल ह्या विचारानें विदुर मनांतल्या मनात फारच खजील झाला होता; पण श्रीकृष्णाचें जेवण अगदीं मोकळ्या मनानें चाललें होतें. ह्या जाड्याभरड्या अन्नामुळें त्याच्या नेहमींच्या वागणुकींत थोडासुद्धां फरक झालेला विदुराला दिसून आला नाहीं; इतकेंच नव्हे, तर विदुराबरोबर गप्पागोष्टी करून विदुराच्या मनावरचें दडपण त्यानें दूर करून टाकलें. त्यामुळें विदुराच्या वागणुकींतही मोकळेपणा उत्पन्न झाला. स्वतःच्या दारिद्र्याच्या विचारानें

थोडा वेळ खिन्न झालेली त्याची मुद्रा प्रसन्न झाली. मोठमोठ्या लोकांना ज्याची भेट घेण्याकरितां दारीं तिष्ठत बसावें लागतें, तो हा द्वारकाधीश आपल्यासारख्याच्या घरीं येऊन मोठ्या प्रेमानें आपल्या शेजारीं कण्या ओरपीत बसला आहे ह्या विचारानें त्याला मोठी धन्यता वाटत होती. तो ह्या विचाराच्या तंद्रींत असतांनाच त्याचें लक्ष सहज श्रीकृष्णाकडे गेलें.

पत्रावळीवरून वाहून जाणाऱ्या पातळ कण्या दोन्ही हातांनाही दाद देत नाहींत, असें दिसून येतांच श्रीकृष्णानें आपले चारहि हात उपयोगांत आणून त्या पत्रावळीचा द्रोण करून तोंडाजवळ नेला होता. विदुराचें लक्ष आपल्याकडे नेमकें ह्याच वेळीं लागलेलें पाहून श्रीकृष्णाला हसूं आलें. श्रीकृष्ण हसला म्हणून विदुरहि हसला. विदुर हसूं लागला म्हणून श्रीकृष्णहि मोठ्यानें हसूं लागला. हसतां हसतां दोघांच्याहि डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले. कांहीं वेळ दोघांच्याहि तोंडून शब्द बाहेर फुटेना.

थोड्या वेळानें जेव्हां विदुरानें श्रीकृष्णाला हसण्याचें कारण विचारलें, तेव्हां हातांतला द्रोण खालीं ठेवतां ठेवतां श्रीकृष्ण म्हणाला, "बलाढ्य शत्रूंचा समाचार घेण्याचें काम आतांपर्यंत मीं दोनच हातांनीं उरकीत असे. पण कण्याच्या रूपानं ओसंडून जाणारं तुझं हें प्रेम माझ्या चार हातांनीं सुद्धां मला आज आवरतां येत नाहीं, हें पाहून माझं मलाच हसूं आलं "

आणि असें म्हणून खालीं ठेवलेला द्रोण श्रीकृष्णानें पुन्हा एकदा तोंडाला लावला !

# १४

## गुरुदक्षिणा

द्रोणाचार्यांनीं नकार दिल्यामुळें एकलव्याचें मन फारच खट्टू झालें. मोठ्या आशेनें तो त्यांच्याकडे गेला होता. द्रोणाचार्यांसारख्या निष्णात वीराच्या हातून आपल्याला धनुर्विद्येचें शिक्षण मिळावें, असें त्याला मनापासून वाटत होतें. परतु "आर्यकुलांत उत्पन्न झालेल्या लोकांखेरीज कोणालाहि मी माझी विद्या देत नसतों" असें द्रोणाचार्यांनीं त्याला सांगितल्यावर त्याची फारच निराशा झाली.

विद्येच्या आड आपली जात आली; एखाद्या उच्च जातींत आपला जन्म झाला असता तर आपले मनोरथ खात्रीनें सिद्धीस गेले असते, असेंहि त्यानें आपल्या मनाचें समाधान करून घेतलें.

एकलव्याचा जन्म जरी निषादांच्या कुळांत झाला होता, तरी तो सामान्य आईबापांच्या पोटीं जन्माला आला नव्हता. हिरण्यधनूसारख्या पराक्रमी निषाद राजाचा तो मुलगा होता. तिरंदाजीचें शिक्षण त्याला लहानपणापासून मिळालें होतें; पण धनुर्विद्येचा शास्त्रोक्त अभ्यास करून त्या विद्येंत आपण पारंगत व्हावें, अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती.

द्रोणाचार्यांनीं जरी विद्या शिकविण्याचें नाकारलें तरी एकलव्याच्या मनांत त्यांच्याबद्दल थोडासुद्धां अनादर उत्पन्न झाला नाहीं. त्याची जात हलकी होती, तरी त्याचें मन मोठें होतें. मोठ्या मनाचीं माणसें क्षुद्र विचारांना कधींच थारा देत नसतात. निराशेचा आवेग ओसरल्यावर एकलव्य शांतपणें विचार करूं लागला. काय वाटेल तें होवो—कितीहि

कष्ट पडोत—धनुर्विद्येंत प्रावीण्य मिळविण्याची आपली मनीषा तृप्त करायचीच, असा त्यानें ठाम निश्चय केला.

राजवाड्यापासून दूर असलेल्या एका निवान्त ठिकाणीं जाऊन द्रोणाचार्यांचा एक मातीचा पुतळा तयार करायला त्यानें सुरुवात केली ! सबंध पुतळा तयार झाल्यानंतर त्या पुतळ्याकडे त्यानें एकदां डोळे भरून पाहिलें. प्रत्यक्ष द्रोणाचार्यच त्या ठिकाणीं येऊन बसले आहेत आणि त्यांच्या मुद्रेवर प्रसन्नतेचें हास्य झळकत आहे, असेंच तो पुतळा पाहून त्याला थोडा वेळ वाटलें. हात जोडून तो त्या पुतळ्यासमोर उभा राहिला आणि म्हणाला, " गुरुमहाराज, मी तुमचा शिष्य आहें. शिकवाल ना मला ती तुमची विद्या ? "

पुतळ्याचे ओठ हालल्याचा आणि त्या ओठांतून " शिकवीन बरं बाळ ! " असे प्रेमळ शब्द उमटल्याचा त्याला क्षणभर भासहि झाला ! आपल्याला वचन मिळालें अशी एकलव्याची खात्री झाली. आतां त्याचा आनंद गगनांत मावेना.

रोज त्या ठिकाणीं जाऊन व मनाची एकाग्रता करून धनुर्विद्येचा अभ्यास करण्याचा क्रम एकलव्यानें अखंडपणें चालू ठेवला. धनुष्यावर बाण चढवून ऐन पवित्र्यांत तो उभा राहिला म्हणजे द्रोणाचार्यांच्या पुतळ्याकडे वळून " गुरुजी, बरोबर आहे ना हा माझा पवित्रा ? असाच सोडूं ना हा बाण ? " असे प्रश्न मधून मधून तो विचारीत असे आणि आपण स्वतःच त्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन बाण सोडीत असे. स्वतः विचारलेल्या प्रश्नांचीं जरी तो स्वतःच उत्तरें देत असे, तरी आपल्या तोंडून आपले गुरुजीच तीं उत्तरें वदवतात, अशी एकलव्याची दृढ श्रद्धा असे. अशा विचित्र पद्धतीनें चाललेलें हें शिक्षण पाहून कोणालाहि हसूंच आलें असतें ! पण निष्ठा, चिकाटी आणि

आत्मविश्वास ह्यांच्या जोरावर कांहीं दिवसांनीं एकलव्य धनुर्विद्येंत चांगलाच तरबेज झाला.

कौरव-पांडवांना धनुर्विद्येचें शिक्षण देण्यास द्रोणाचार्यांनीं सुरुवात केल्यानंतर अर्जुनावर त्यांचें विशेष प्रेम जडलें. अर्जुन होताच तसा बुद्धिमान्. हा चुणचुणीत आणि चलाख मुलगा आपण दिलेल्या विद्येचें पुढेंमागें चांगलेंच चीज करील, अशी त्यांना अर्जुनाबद्दल उत्तरोत्तर खात्री वाटूं लागली होती. द्रुपदानें केलेल्या अपमानाचा सूड स्वतः उगवण्यापेक्षां आपण तयार केलेल्या एखाद्या शिष्याकडूनच उगवून घ्यावा असा एक विचार फार दिवस त्यांच्या मनांत घोळत होता. पांचपन्नास साधारण शिष्य तयार करण्याऐवजीं एकच उत्तम शिष्य तयार करून त्याच्याकरवीं द्रुपदाला स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव करून द्यावी, असें अर्जुनाकडे पाहून त्यांना वाटूं लागलें. अर्जुनाशिवाय आपली गुप्त विद्या कोणालाच द्यावयाची नाहीं, असें त्यांनीं स्वतःशीं ठरवून टाकलें. "मन लावून शिकशील तर तुझ्याइतकी विद्या मी दुसऱ्या कोणालाहि देणार नाहीं," असें त्यांनीं अर्जुनाला वचन दिलें होतें; म्हणूनच हलक्या जातीचें निमित्त पुढें करून एकलव्याला धनुर्विद्या शिकविण्याचें त्यांनीं नाकारलें होतें.

मृगयेच्या निमित्तानें द्रोणाचार्यांचे सर्व शिष्य एकदां अरण्यांत गेले होते. त्यांच्याबरोबर असलेल्या एका माणसानें आपला एक शिकारी-कुत्राहि बरोबर घेतला होता. शिकार शोधून काढण्याकरितां तो कुत्रा त्यांना सोडून थोडा वेळ कुठें तरी लांब गेला होता. कांहीं वेळानें जेव्हां कुत्रा परत आला तेव्हां त्याच्याकडे पाहून सर्वांनाच मोठें आश्चर्य वाटलें. त्याच्या जबड्यांत कुणी तरी अशा खुबीनें सात बाण मारले होते कीं त्याला विशेष इजा न होतां त्याच्या जबड्याची सर्व हालचाल बंद पडली होती ! त्यामुळें त्याच्या जबड्याचा भाता होऊन त्याला

भुंकतांहि येत नव्हतें आणि चावतांहि येत नव्हतें ! त्या कुत्र्याची ती चमत्कारिक अवस्था पाहून कांहीं जणांना जरी हसूं येत होतें, तरी अर्जुनाची मुद्रा मात्र गंभीर झाली होती. कुत्र्याला विशेष अपाय न करतां त्याचें तोंड अशा रीतीनें बंद करणारा कुशल धनुर्धारी कोण असावा, ह्याच विचारांत त्यांचें मन गुंतलें होतें. ज्या ठिकाणाहून तो कुत्रा परत आला होता, त्या ठिकाणाचा कुत्र्याच्या मदतीनें त्यानें ताबडतोब शोध लावला. हरिणाचें कातडें नेसलेला एक काळाकभिन्न तरुण मनाची एकाग्रता करून बाणामागून बाण सोडीत आहे, असें त्या ठिकाणीं अर्जुनाला दिसून आलें. त्याच्या मनाची संपूर्ण एकाग्रता आणि शरीराची सफाईदार हालचाल पाहून अर्जुनाला मोठें नवल वाटलें. आपल्या कुत्र्याची चमत्कारिक अवस्था ह्यानेंच केली असावी, अशी त्याची खात्री झाली. पण द्रोणाचार्यांच्या पुतळ्याचें कोडें मात्र त्याला उलगडेना. स्वतःची जिज्ञासा तृप्त करण्याच्या हेतूनें अर्जुनानें जेव्हां त्या माणसाशीं बोलायला सुरुवात केली, तेव्हां हसून आणि नम्रपणानें तो अर्जुनाला म्हणाला, “ निषादांचा राजा जो हिरण्यधनु, त्याचा मी मुलगा. माझं नांव एकलव्य. रोज ह्या ठिकाणीं येऊन मी धनुर्विद्येचा अभ्यास करीत असतों. तुमचा हा कुत्रा इथें येऊन भुंकूं लागल्यामुळें माझ्या मनाची एकाग्रता नाहींशी होऊं लागली, म्हणून त्याची मीं थोडीशी गंमत केली. क्षमा करा मला. ”

त्या तरुणाचा वेष इतका विचित्र असूनहि त्याच्या वागणुकींतली नम्रता पाहून अर्जुनाला मोठें आश्चर्य वाटलें. पण द्रोणाचार्यांच्या त्या पुतळ्याकडे बोट दाखवून, “ हेच माझे गुरुजी ह्यांच्याच कृपेनें थोडीफार विद्या मी आजपर्यंत शिकलों ” असें जेव्हां तो म्हणाला, तेव्हां मात्र अर्जुनाचें मन अस्वस्थ झालें. धनुर्विद्येंतला हा चमत्कार त्यानें कधींच पाहिला नव्हता. मनाला थक्क करून टाकणारें हें अद्‌भुत कर्म एकलव्यानें

केवळ गंमतीखातर केलें असें समजून येतांच एकलव्याचा त्याला हेवा वाटूं लागला. आपल्याला देऊं केलेल्या विद्येंत एकलव्यासारखा गुप्त भागीदार उत्पन्न करून द्रोणाचार्यांनीं आपली फसवणूक केली, असें वाटून द्रोणाचार्यांचा त्याला राग आला. घरीं जातांच द्रोणाचार्यांकडून ह्या गोष्टीचा उलगडा करून घ्यावयाचा, असें त्यानें मनाशीं ठरवून टाकलें.

आदल्या दिवसाच्या मृगयेची हकीकत द्रोणाचार्यांचे शिष्य द्रोणाचार्यांना सांगत होते. सभोंवतीं उत्साहानें फुललेलीं तोंडें पाहून द्रोणाचार्यांची मुद्रा प्रसन्न दिसत होती इतक्या तोंडांच्या किलबिलाटांत त्यांच्या पट्टशिष्याचा स्वर मात्र त्यांना बिलकूल ऐकूं येत नव्हता! त्यांचे ते पाणीदार डोळे शोधक नजरेनें इकडे तिकडे फिरूं लागले. अर्जुन एका बाजूला निमूटपणें उभा असलेला त्यांच्या दृष्टीस पडला. अर्जुनाचा स्वभाव त्यांना माहीत होता. कांहीं तरी विशेष असें घडलें असलें पाहिजे; त्याशिवाय सदोदित टवटवीत दिसणारें हें फूल एका एकीं असें कोमेजून जाणार नाहीं, अशी त्यांची खात्री होती. इतर सर्व शिष्य निघून गेल्यानंतर अर्जुनाला त्यांनीं खिन्नतेचें कारण विचारलें.

अर्जुनाच्या तोंडून एकलव्याची ती हकीकत ऐकून द्रोणाचार्यांनाहि आश्चर्य वाटलें. पण अर्जुनानें जेव्हां त्यांच्यावर वचनभंगाचा आरोप केला, तेव्हां मात्र त्यांना फार वाईट वाटलें. "तुझ्याशिवाय आजपर्यंत कोणालाच मीं माझी गुप्त विद्या शिकविली नाहीं." असें त्यांनीं अर्जुनाला परोपरीनें सांगून पाहिलें, तरी अर्जुनाच्या मनाचें समाधान होईना. अर्जुनानें सांगितल्याप्रमाणें एकलव्यानें खरोखरच असलें कौशल्य कमावलें असेल, तर अर्जुनाच्या मनांत आपल्या सत्यनिष्ठेविषयीं असा संशय येणें साहजिकच आहे, असें द्रोणाचार्यांनाहि विचारान्तीं वाटूं लागलें. प्रत्यक्ष जाऊन खात्री करून घेण्याकरितां व अर्जुनाचा गैरसमज

दूर करण्याकरितां अर्जुनाला बरोबर घेऊन द्रोणाचार्य एकलव्याकडे जाण्याकरितां निघाले.

नित्यनियमाप्रमाणें एकलव्य आपल्या अभ्यासांत गढून गेला होता. द्रोणाचार्य आणि अर्जुन त्या ठिकाणीं येऊन किती तरी वेळ उभे राहिले होते. बराच वेळ एकलव्याचें त्यांच्याकडे लक्षच गेलें नाहीं. स्वतःच्या कर्तबगारीवर कमावलेलें तें त्याचें कौशल्य पाहून द्रोणाचार्यांना तर फारच कौतुक वाटलें. आनंदाच्या भरांत त्यांच्या तोंडून " शाबास ! " असा शब्द बाहेर पडला. ह्या शाबासकीमुळें अर्जुनाच्या मनातला संशय मात्र दुणावला.

द्रोणाचार्यांचे शब्द ऐकतांच एकलव्याचें लक्ष त्यांच्याकडे गेलें. अचानकपणें येऊन गुरुजींनीं आपलें कौशल्य पाहिलें आणि त्याबद्दल शाबासकी देऊन आपला गौरव केला, ह्या विचारानें त्याला धन्यता वाटली. " गुरुवर्य, आपल्याकडून शाबासकी मिळविण्याइतकी विद्या आपल्या कृपेनं मीं संपादन केली. माझ्या मनांतली इच्छा आज सफल झाली ! " असें म्हणून त्यानें द्रोणाचार्यांच्या पायांवर डोकें ठेविलें.

" बाळ, कोणीं शिकविली तुला ही विद्या ? " द्रोणाचार्यांनीं त्याला विचारलें.

" आपण शिकविलीत मला ही विद्या. " एकलव्यानें आदरानें उत्तर दिलें. अर्जुनाची दृष्टि ह्या वेळीं द्रोणाचार्यांच्या मुद्रेवर खिळून राहिली होती.

" किती खोटं बोलतोस तूं ! केव्हां आला होतास तूं माझ्याकडे विद्या शिकायला ? " द्रोणाचार्यांचा आवाज आतां थोडा कठोर झाला होता.

" मी कधींच खोटं बोलत नसतों. आपल्याला माहीत नसेल कदाचित्, पण आपल्याजवळ मी ही विद्या शिकलों. " एकलव्यानें शांतपणानें

उत्तर दिलें आणि द्रोणाचार्यांच्या पुतळ्याकडे बोट दाखवून त्यानें झालेली सर्व हकीकत सांगून टाकली.

खरा प्रकार समजल्यावर द्रोणाचार्यांबद्दल अर्जुनाच्या मनांत आलेली शंका जरी दूर झाली होती, तरी एकलव्य विद्येनें आपल्यापेक्षां श्रेष्ठ आहे ह्या विचारानें त्याचें मन अजूनही अस्वस्थच होतें. अशा विचित्र पद्धतीनें द्रोणाचार्यांचें शिष्यत्व पत्करून विद्या संपादन केल्याची कबुली सरळ मनाच्या एकलव्यानें देऊन टाकली; पण ह्या कबुलीमुळें द्रोणाचार्यांची फारच चमत्कारिक स्थिति झाली. अर्जुनाबद्दल त्यांच्या मनांत प्रेम होतें. एकलव्याच्या चिकाटीबद्दल त्यांना कौतुकहि वाटत होतें. धनुर्विद्येंत अर्जुनापेक्षां कोणीहि वरचढ असूं नये, असें जरी त्यांना वाटत होतें तरी एकलव्यानें कांहीं अपराध केला आहे, असें त्यांना मुळींच वाटत नव्हतें. अर्जुनाच्या मनाचें समाधान होईल अशी कांहीं तरी युक्ति आतां काढली पाहिजे, हा एकच विचार त्यांच्या डोक्यांत घोळत होता. सरते शेवटीं एकलव्याला ते म्हणाले, “ बाळ, माझ्याकडून तूं माझी विद्या घेतलीस; पण मला तूं माझी दक्षिणा अद्याप दिली नाहींस. गुरुदक्षिणेशिवाय विद्या सफल होत नाहीं, हें तुला माहीत आहे ना ? ”

“ आपण मागाल ती दक्षिणा मी आपल्याला देईन. ” एकलव्यानें ताबडतोब उत्तर दिलें. द्रोणाचार्यांचा शिष्य म्हणवून घेण्यांतच त्याला धन्यता वाटत होती.

“ मी जी दक्षिणा मागणार आहें, ती तुझ्याच्यानें देववेल ना ? ” द्रोणाचार्यांनीं गंभीर आवाजांत विचारलें.

“ आपण मागाल ती दक्षिणा मी आपल्याला इथल्या इथें देईन. माझ्यासारख्या हलक्या जातींतल्या माणसाकडून दक्षिणा घ्यायला आपण तयार झालांत हेंच मी माझं भाग्य समजतों. आपण तोंडानं फक्त उच्चार

करा. दक्षिणा देण्याकरितां हा पाहा माझा उजवा हात तयार आहे." एकलव्य आवेशानें म्हणाला.

"थांब ! इतका उतावीळ होऊं नकोस. नीट विचार कर. ऐन आनंदाच्या भरांत जो उजवा हात तूं पुढें केला आहेस, त्या हाताचा आंगठा गुरुदक्षिणा म्हणून तोडून देशील मला ?" कांपऱ्या आवाजांत द्रोणाचार्यांनीं प्रश्न केला.

मनाचा मोठेपणा मापण्याच्या तराजूंत त्या एका पारड्यांत द्रोणाचार्य बसले होते आणि दुसऱ्या पारड्यांत एकलव्य बसला होता. द्रोणाचार्यांचें पारडें जितक्या प्रमाणांत हळूहळू वर जात होतें, तितक्याच प्रमाणांत एकलव्याचें पारडें खालीं येत होतें ! हाताचा आंगठाच काय, पण स्वतःचें शिरकमलसुद्धां गुरुचरणीं अर्पण करण्याची एकलव्याची तयारी होती ! उजव्या हाताच्या आंगठ्याबरोबर आजपर्यंत कष्टानें कमावलेली विद्यासुद्धां गुरुचरणीं अर्पण होणार, हें एकलव्याला माहीत होतें. द्रोणाचार्यांच्या गुरुदक्षिणेचा उच्चार होतांच क्षणाचाहि विलंब न करतां त्यानें उजव्या हाताचा आंगठा तोडून, तो द्रोणाचार्यांच्या पायांवर ठेवला.

ह्या अतुल आणि उज्ज्वल स्वार्थत्यागामुळें एकलव्यानें आपलें नांव भारतीय वीरांच्या प्रभावळींत अजरामर करून ठेवलें आहे !

... संग्रहालय, ठाणे. ...
... दि: ...
... नों. दि: ...

# १५

## प्राणाचार्य

आयुर्वेदाचा त्यानें अथांग अभ्यास केला होता म्हणून त्यानें आपल्या घरावर ' दवाखाना ' अशी ठळक अक्षरांची वावभर लांबीची पाटी लटकवून दिली होती अशांतला मुळींच भाग नव्हता. ती पाटी लावण्याचें मुख्य कारण म्हणजे असें कीं, वैद्यकीचा नुसता ' ओनामा ' सुद्धा त्याला माहीत नव्हता. साधारणतः गल्लोगल्लीं वाढत्या प्रमाणांत दिसून येणाऱ्या आंग्ल भिषग्वरांच्या पाट्यांवरील ' फिजिशियन अँड सर्जन ' ह्या दर्पोक्तींतील ' सर्जन ' हा शब्द जितका अर्थपूर्ण असतो तितकाच त्याच्या पाटीवरचा तो ' प्राणाचार्य ' शब्द अर्थपूर्ण होता.

जमिनीवर अंथरलेलें एक जाजम, त्याच जाजमावर—पण भिंतीलगत पसरलेली एक बैठकीची गादी; त्या गादीवर भिंतीला टेकून ठेवलेला व मळक्या आणि फाटक्या अभ्यानें आच्छादलेला खारव्याचा एक फाटका तक्क्या आणि त्या तक्क्याच्या वरच्या बाजूस भिंतीला टांगलेलें एक पुसटसें चित्र—असा त्याच्या बैठकीचा थाट होता. कुणी तरी एक मनुष्य खांद्यावर कसला तरी एक कुंभ घेऊन समुद्रांतून वर येत आहे असें दृश्य त्या चित्रांत दाखवलें होतें. त्या चित्राखालीं ' ॐ नमो धन्वन्तरये ' असें गिचमिड अक्षरांत लिहिलें होतें म्हणूनच तें चित्र धन्वन्तरीचें असावें, असा तर्क करणेंच प्राप्त होतें.

चित्रांत काढलेल्या त्या स्वर्गीय धन्वन्तरीच्या अध्यक्षतेखाली स्वतःची बैठक मांडून बसलेल्या ह्या ' स्वयंभू प्राणाचार्या 'नें आजपर्यंत किती

तरी प्राण्यांना स्वर्गाचीं कवाडें खुलीं करून दिलीं होतीं ! असलें महत्पुण्य त्यांच्या पदरीं बांधण्याकरितां एकापेक्षां एक अशीं किती तरी बलवत्तर आयुधें त्यानें आपल्या दवाखान्यांत सुसज्ज करून ठेवलीं होतीं.

चूर्णें आणि गुटिका, आसवें आणि अरिष्टें; शुत्यें आणि कल्क, कषाय आणि लेह असल्या माल-मसाल्यांनीं भरलेल्या बरण्या आणि वाटल्या ' एकैकमपि नाशाय किमु यत्र स ञ्चयम् ' ह्या म्हणीची साक्ष तंतोतंत पटवीत होत्या. तिथल्या त्या चूर्णांनीं, अरिष्टांनीं आसवांनीं कैक लोकांच्या देहांचें चिमूटभर चूर्ण झाल्यामुळें त्यांच्याजवळच्या आप्तेष्टांवर अरिष्टें कोसळून आंसवें ढाळण्याचे दारुण प्रसंग ओढवले होते ! पण असें असूनही ' अपि धन्वंतरिर्वैद्यः किं करोति गतायुषि ' ह्या ठराविक सुभाषिताची ऐसपैस ढाल पुढें करून लोकांच्या शिव्या-शापांचे वार तो बिनदिक्कत परतवीत असे.

बदलत्या जमान्याबरोबर स्वतःच्या पुरोगामित्वाची छाप लोकांवर पाडण्याकरितां अलीकडे अलीकडे अंगरख्याच्या खिशात तो ' श्रवण-नलिका ' ( Stethoscope ) सुद्धा बाळगीत असे. त्या ' विलायती गलोलीचा ' वक्षखंड ( Chest piece ) एकदा एका रोग्याच्या बेंबीवर ठेवून त्या रोग्याचीं फुप्फुसें पिंजलेल्या कापसासारखीं स्वच्छ असल्या-बद्दल त्यानें छातीला ( रोग्याच्या नव्हे स्वतःच्या ) हात लावून सांगितलें होतें. नसत्या उठाठेवी करण्याची जन्मजात खोड असणाऱ्या एका टारगटानें त्याला ह्या विचित्र ' श्रवणपद्धती '-( Auscultation )-संबंधीं विचारतांच ' अर्ध हरिद्राखंडानें पीतवर्णत्वाप्रत जाऊं इच्छिणाऱ्या तुमच्यासारख्या डॉक्टरी विद्येचा अभ्यास करणाऱ्यांना कधींच कळायचं नाहीं हें शास्त्र. शरीरांत खोल दडून बसलेल्या रोगाशीं संभाषण करतां यावें म्हणून सुश्रुतानें ह्या यंत्राचं प्रथम संशोधन केलं. दूरध्वनि-श्रवण-यंत्र ( Telephone ) त्या वेळीं पाश्चात्यांना नुसतं ऐकून सुद्धा माहीत

नव्हतं ! ' असें सडेतोड उत्तर देऊन त्या टारगटाला त्यानें निरुत्तर करून टाकलें होतें. ह्याशिवाय चरक, वाग्भट, निघंटु, माधवनिदान इत्यादि नांवें जिभेवर खेळवून तो स्वतःच्या अगडबंब पांडित्याचें उठल्यासुटल्या प्रदर्शन करीत असे तें निराळेंच.

दिवसाकांठीं चार दोन टोप्या तयार करून विकणाऱ्या माणसांनीं टोप्यांचे कारखानदार म्हणून लौकिक कमावल्याचीं उदाहरणें मिळूं शकतात. लहानपणीं वर्तमानपत्रें विकून कशीबशी गुजराण करणाऱ्या बालकांनीं मोठेपणीं एखाद्या प्रमुख वर्तमानपत्राचें संपादन केल्याच्या बातम्या आपल्याला वाचायला मिळतात. आयुष्याच्या पूर्वार्धात छत्र्या-कुलपें दुरुस्त करून पोट भरणारा फिरस्ता आयुष्याच्या उत्तरार्धात छत्र्या-कुलपांच्या कारखान्याचा मालक झालेलाही दृष्टोत्पत्तीस येत असेल; पण मुरावळा, गुलकंद, आलेपाक आणि कस्तुरी उदबत्ती असल्या मालाच्या दुकानाचें बेताबेतानें दवाखान्यांत रूपांतर करून आणि स्वतः ' प्राणाचार्य ' बनून दुसऱ्यांच्या प्राणाशीं मोकळ्या हातानें आणि मोकळ्या मनानें सलगी करणारा त्या गांवांतला हा पहिलाच ' प्रचंड ' कारखानदार होता. ज्या दिवशीं त्यानें स्वतःच्या नांवामागें ' प्राणाचार्य ' ही ' धोक्याची सूचना ' लावून दवाखान्याची पाटी रंगवून घेतली होती त्याच दिवसापासून पाश्चात्त्य पद्धतीच्या वैद्यकीला आणि डॉक्टर लोकांना शिव्या मोजण्याचें अखंड व्रत त्यानें स्वीकारलें होतें.

अशीच कुठली तरी एक सकाळ. एक इसम त्याच्या दवाखान्यांत येऊन आणि गयावया करून त्याला कोणा एका रोग्याची करुण कहाणी सांगत होता : " आज आठ दिवस झाले, ताप म्हणून हटत नाहीं. डॉक्टरांचीं औषधं झालीं, इंजेक्शनं झालीं, पण उतार म्हणून नाहींच. रोगाचं पाऊल पुढेंच."

डॉक्टराचें नांव काढतांच त्याच्या तळव्याची आग मस्तकाला जाऊन

भिडली. ‘ पाश्चात्त्य वैद्यकाचा फोलपणा ’ ह्या त्याच्या ऐच्छिक विषयावर मनसोक्तपणें बोलण्याची संधि त्या गृहस्थानें त्याला आयतीच आणून दिल्यामुळें पाश्चात्त्य वैद्यक आणि डॉक्टरलोक ह्यांच्यावर त्यानें भरपूर तोंडसुख घेतलें. “ काय चमत्कार आहे पाहा ! जो उठतो तो टोचतो अन् फाडतो. देवानें दिलेल्या तोंडाचा उपयोग रे काय मग ? रोग्याची दांतखीळ बसली तरी औषधं तोंडांतून घालतां आलीं पाहिजेत महाराजा ! अहो, हे डॉक्टरलोक असेच. आधीं रोग्याला टोंचून टोंचून ठार मारतील आणि ठार मारल्याबद्दल बिलं उकळतील. बाकी त्यांच्यावर शिरा ताणून काय उपयोग ! तुमच्यासारखे लोक भेटतातच ना त्यांना. जा— त्या डॉक्टराकडेच जा पुन्हा आणि सांगा त्यालाच सगळी कर्मकथा. ” असें बेपर्वाईचें उत्तर देऊन त्यानें त्या गृहस्थाकडे आपली पाठ वळवली.

“ वैद्यराज, चूक झाली आमची. तसं म्हटलं तर माझा ह्या डॉक्टरलोकांवर काडीचाहि विश्वास नाहीं. पण ‘ अडला नारायण गाढवाचे पाय धरी ’ तशांतली गत होते ना माणसाची. तापाबरोबर बडबडही सुरू आहे. म्हणून म्हणतों, कसंहि करा पण त्याला बरा करा. बरा झाला बिचारा तर आम्हांला देव भेटला असं समजूं आम्ही. ” असें म्हणून त्या गृहस्थानें वैद्यबुवांचे पाय धरले. त्याचा हा प्रयोग चांगलाच यशस्वी झाला. पायाला हात लागतांच त्याचें डोकें ताळ्यावर आलें आणि तो जरा व्यवस्थितपणें बोलूं लागला.

“ ह्या तीन पुड्या घेऊन जा. पहिल्या पुडीला बडबड थांबेल, दुसऱ्या पुडीनं ताप उतरेल. तिसरी पुडी बहुधा द्यावीच लागणार नाहीं, पण असूं द्या आपली जवळ. इतकं हुकमी औषध आहे हें ! ”

दुसरी पुडी पोटांत जातांच तापानें फणफणलेलें रोग्याचें शरीर थंडगार पडायला लागलें म्हणून भोंवतालचे लोक घाबरले. कसेंहि

करून एकदा येऊन रोग्याला पाहून जाण्याबद्दल सकाळच्या माणसाच्या हातीं त्यांनीं दवाखान्यांत निरोप पाठवला.

"इतकं घाबरायला काय झालं? ताप कमी होऊं लागला कीं, अंग जरा गार पडणारच." अनुभविक धंदेवाइकाच्या बेफिकीरपणानें त्यानें त्या निरोप घेऊन येणाऱ्या गृहस्थाला उत्तर दिलें.

"अहो, जरा कां! अंग चांगलंच गार पडूं लागलंय्! म्हणून म्हणतों कीं तिसरी पुडी घालण्यापूर्वीं तुम्ही येऊन एकदा पाहून जाल तर बरं होईल."

"बडबड चालूच आहे का अजून?"

"बडबड दुसऱ्या पुडीनंतर थांबली; पण पहिली पुडी पोटांत गेल्याबरोबर अंग एकदम गारच पडायला लागलं. म्हणून धांवतच तुमच्याकडे आलों."

"वाटलंच मला तुम्ही कांहीं तरी घोटाळा करणार म्हणून! नंबर तीनची—म्हणजे शेवटची पुडी पहिल्याप्रथम दिलीत वाटतं? पुड्यांचा क्रम चुकवून सगळा घोटाळा करून टाकलांत. पाहूं तर खरं काय आहे तें." असें म्हणून तो त्या गृहस्थाबरोबर रोग्याच्या घरीं जाण्यास बाहेर पडला.

रोगी राहात असलेल्या घराबाहेरच्या ओट्यावर निर्विकार चेहरे करून आणि डोक्याभोंवतीं उपरणीं लपेटून बसलेले एक-दोन लोक, घरांतून बाहेर स्पष्ट ऐकूं येणारा कोलाहल आणि त्या कोलाहलामुळें रस्त्यावर थोडा वेळ थबकून त्या घराकडे कुतूहलात्मक दृष्टिक्षेप करून रेंगाळत चालणारे कांहीं जिज्ञासू, अशा तऱ्हेचें तें चमत्कारिक दृश्य दुरून दृष्टीला पडतांच आपल्या प्रभावी पुड्यांनीं काय पराक्रम गाजवला आहे हें त्याच्या लक्षांत यायला फारसा वेळ लागला नाहीं.

इतक्यांत ओट्यावर बसलेल्या इसमांपैकीं एकजण सामोरा आला; आणि त्यानें इत्थंभूत हकीकत सांगायला सुरुवात केली :

" दुसरी पुडी पोटांत जाऊन पंधरा-वीस मिनिटं झालीं असतील किंवा नसतील तोंच वाचा बसली. पहिल्या पुडीनंच अंग गार पडूं लागायला सुरुवात झाली. होतां होतां तें जास्तच गार पडूं लागलं; म्हणून मीं ह्यांना आपल्याकडे धाडलं. हे निम्म्या वाटेवर गेले असतील नसतील तोंच नाकाचा शेंडा गार पडला, डोळे थिजले, मानेचा कांटा ढिला झाला, एक आचका आला आणि सारा ग्रंथच आटोपला ! आपण आलांत हें एका अर्थीं वरं झालं. मी विचारांतच होतों. बोलवायचं तरी कुणाला अशा वेळीं ? कारण आम्ही पडलों तिघेच. झालं तें होऊन गेलं. आतां पुढचा विचार केला पाहिजे. " असें म्हणून त्या गृहस्थानें एक दीर्घ सुस्कारा सोडला.

' अलिया भोगासी सादर ' होण्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हतें. त्यानें एकट्यानें स्वत:च्या हिंमतीवर गाजवलेल्या पराक्रमाची तीन-चतुर्थांश जबाबदारी तिघांनीं खांद्यावर वाहून नेण्याचें आपण होऊन कबूल केल्यावर बाकीच्या पाव हिस्स्याकरितां अंगचुकारपणा करून बगल देण्यापेक्षां अंग मोडून खांदाच देणें इष्ट—उपरणें झाडून मोकळें होण्यापेक्षां त्याच उपरण्याची टापशी करून प्रसंग निभावून नेणें श्रेयस्कर—असें त्यानें ठरवलें.

त्या दिवसापासून मात्र त्यानें कानाला अगदीं कायमचा खडा लावून घेतला. त्याच्याकडे आतां कोणीहि आणि केव्हांहि औषध मागायला जावो; तो सगळ्यांना स्पष्ट शब्दांत आरंभींच बजावतो — " औषध देईन; पण खांदा द्यायला मात्र येणार नाहीं ! "

# १६ घड्याळ

वयाची पन्नाशी उलटेपर्यंत बिनतक्रार चाललेले तें मोठें घड्याळ त्या रात्रीं एकाएकीच बंद पडलें !

या आकस्मिक घटनेमुळें तबकडीचा चेहरा पांढरा—फटफटीत पडला. दोन्ही काट्यांच्या अंगावर कांटा उभा राहिला आणि चाकांना तर चक्करच आली ! हळूहळू आपआपसांत कुरबूर सुरू झाली. झाल्या गोष्टीला जबाबदार कोण ? प्रत्येकजण ' आपल्या कानीं सात बाळ्या ' असें म्हणून आपल्या शेजाऱ्याकडेच संशयी नजरेनें पाहूं लागला.

या प्रकरणाचा तपास लावण्याकरितां सरतेशेवटीं तबकडीनें आपलें तोंड उघडलें. पण तिच्या प्रश्नांना कुणी उत्तर देईल तर शपथ ! जिकडे तिकडे अगदीं सामसूम, अखेर लंबकानें शांतताभंग केला. ' घडल्या गोष्टीचा दोष सर्वस्वीं माझ्या एकट्याकडेच आहे, हें मी प्रांजळपणें कबूल करतों; पण ही गोष्ट मी विनाकारण मात्र बिलकुल केलेली नाहीं. खरं सांगायचं म्हणजे मला या टिकटिकीचा पुरता वीट आला आहे. '

लंबकाच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच त्या घड्याळाच्या अंगाचा इतका संताप झाला कीं, त्या आवेशाच्या भरांत तें एक टोला लगावण्याच्या बेतांत होतें. तबकडीलासुद्धां खूप राग आला. ' पक्का आळसट आहे हा लंब्या ' असें ती अगदीं चिडून म्हणाली

' तबकडीताई. आमच्या डोक्यावर बसला आहांत म्हणूनच

ह्मणवतां आहांत वाटतं इतकं ? दुसऱ्यांवर आळशीपणाचा आरोप करणारांनीं स्वत: उद्योगाचे काय दिवे लावले आहेत ते तरी दाखवावेत एकदां. येणाऱ्या–जाणाऱ्याकडे सारखी टक लावून बघायचं आणि टिवल्याबावल्या करून वेळ घालवायाचा. ' ना भीड ना मुर्वत. ' हा तर तुमचा उद्योग. माझ्यासारखं काळ्या कोठडीत बसून जन्मभर इकडून तिकडे अन् तिकडून इकडे करायचा प्रसंग तुमच्यावर ओढवला असता म्हणजे समजलं असतं सुख ! ' लंबकानेंहि जरा चिडूनच उत्तर दिलें.

' तुला बाहेर डोकावून पाहतां यावं म्हणून तुझ्या खोलीला चकचकीत कांचेची खिडकीसुद्धां बिसवली आहे. ' खवचटपणानें तबकडी म्हणाली.

' अहाहा ! काय पण खिडकी ! असून–नसून सारखीच. थोडा वेळ बाहेर डोकावून पाहीन म्हटलं, तर क्षणाचीसुद्धां उसंत मिळत नाहीं मला. मोटेला जुंपलेल्या बैलासारखीच माझी स्थिति. माझं म्हणणं ऐकून घ्यायला तयार असलीस तर सांगतों, मी कां इतका कंटाळून गेलों आहे तें. '

लंबकाच्या या बोलण्याला तबकडीनें संमतिदर्शक मान हालवतांच त्यानें सांगायला सुरुवात केली :

' उभ्या चोवीस तासांत इकडून तिकडे अन् तिकडून इकडे मला किती हेलपाटे घालावे लागतात, याचा मी मनांतल्या मनांत हिशेब करीत होतों. तुमच्यापैकीं कुणाला जमत असेल तर पहा कां एकदां विचार करून. म्हणजे—'

' त्याला विचार तरी कशाला करायला पाहिजे ? एकदम सांगतां येईल कीं, ८६४०० खेपा. ' आंकडेमोडीत तरबेज असलेल्या त्या मिनिटकाट्यानें तावडतोब उत्तर दिलें.

लंबक म्हणाला, “ शाबास ! अगदीं बरोबर ! आतां तुम्हींच सारेजण विचार करा. ही झाली अवघ्या चोवीस तासांची कथा दिवसांवरून महिने आणि महिन्यांवरून वर्षे, या हिशेबानें गुणाकाराची जी संख्या येईल तिच्या नुसत्या विचारानेंच एखाद्याला भोंवळ येईल. माझी तर कंबरच खचली. माझ्या डोक्यांत विचारांचं नुसतं काहूर उठलं. हो ना करतां करतां मी ताबडतोब निश्चय केला कीं, तें कांहीं नाहीं; आपण एकदम स्वस्थ बसायचं. ’

आंकडेमोडीच्या या बावटळीनें तबकडीचा खूपच गोंधळ उडाला. तरी पण यत्किंचितहि न डगमगतां लंबकाची समजूत घालण्याच्या हेतूनें ती म्हणाली.

‘ लंबूनाना, तुमच्यासारख्या कट्टर कर्मयोग्याला कल्पनांच्या भुतांनीं भेडसावावं, हें जरा चमत्कारिकच नाहीं का दिसत ? तुमच्या ऐन उमेदींत तुम्हीं दाखवलेली कर्तबगारी आमच्यापैकीं कुणीहि कधींच विसरणं शक्य नाहीं. तुमच्या उत्साहावर भिस्त ठेवून तुमच्याबरोबर काम करण्यांत आम्हां सर्वांनाच आजपर्यंत उमेद वाटत होती. यापुढें सुद्धां ती कमी होईल असं मात्र मुळींच समजूं नका. थोडा विचार करून पाहा तुम्ही. शारीरिक थकव्यापेक्षां मानासिक थकव्यानंच आपण जास्त नाउमेद होत असतों, असं नाहीं वाटत तुम्हांला ? दुसऱ्या कुणाकरतां नाहीं तरी केवळ माझ्याकरतां म्हणून पूर्वीसारख्या पांचसहा फेऱ्या तुम्हीं एकदां घालून पहा, म्हणजे माझ्या बोलण्याची सत्यता मी पटवून देईन तुम्हांला ? ’

‘ दादा—बाबा ’ केल्यामुळें लंबकाचा सूर एकदम पालटला. तबकडीच्या म्हणण्याप्रमाणें त्यानें पूर्वीसारख्या सहा फेऱ्या घालून दाखविल्या.

तें पाहून तबकडी हंसून म्हणाली, ‘ कसा शहाणा आहे बरं माझा लंबूनाना ! येवढ्यानं तुला थकल्यासारखं तरी वाटतं ? ’

‘ मुळींच नाहीं. पण पांचसहा फेऱ्या घालण्याबद्दल माझी तक्रार नव्हतीच मुळीं. सहाच काय, साठसुद्धां फेऱ्या घालून दाखवीन. पण कोट्यवधि फेऱ्यांचा प्रश्न आहे हा ? ’ लंबक अगदीं गोडीगुलाबीनें बोलला.

आपण लावलेल्या हरभऱ्याच्या झाडाचा प्रयोग बराच यशस्वी झालेला पाहून तबकडीला आतां चांगलाच हुरूप आला होता. स्वतःचा कार्यभाग साधण्याकरितां ती म्हणाली,

‘ कबूल आहे तुझं म्हणणं मला; पण तूं असं लक्षांत घे कीं, कोट्यवधि फेऱ्या घालण्याचा विचार जरी आपल्या मनांत एका क्षणार्धांत चमकून जातो तरी तेवढ्या थोडक्या वेळांत प्रत्यक्ष एकच फेरी पार पडते. म्हणून म्हणतें, नुसत्या विचारांनींच जेरीला येण्यांत काय बरं पुरुषार्थ आहे ? ’

या युक्तिवादानें लंबकाची समजूत पटली असावी असें दिसलें.

‘ खरं आहे तुझं म्हणणं. नुसत्या विचारांनींच बेजार होऊन माझ्या हातून अविचार होत होता. ’ अशी त्यानें स्पष्ट कबुली दिली.

लंबकाच्या तोंडून ही कबुली मिळतांच तबकडीच्या चेहऱ्यावर समाधान झळकूं लागलें. लागलींच ती म्हणाली,

‘ चला आटपा. आपण सगळेजण एकदम कामाला लागूं या. आपणच असा चेंगटपणा चालवला तर आपल्यावर विसंबून बसणारीं घरांतलीं मुलंमाणसं कासराभर दिवस वर आला तरी बिनदिक्कत अंथरुणांतच लोळत राहतील. ’

तबकडीच्या या बोलण्याचा सगळ्यांच्याच मनावर परिणाम

झाल्यासारखा दिसला. आपण सर्वांनींच एकजुटीनें काम करायला सुरुवात केली.

लंबकानें ताल धरला, लंबकाच्या तालावर चाकें फिरूं लागली आणि चाकांचें अनुकरण करून काटेहि पिंगा घालूं लागले.

काळाच्या धाग्यांचा गोफ गुंफण्याचा खेळ पूर्वीसारखा पुन्हा एकदां सुखासमाधानानें सुरू झाला.

उदयाचलावर येत असलेल्या सूर्याचा एक चिमुकला किरण हें दृश्य खिडकीच्या फटींतून चोरून पाहात होता. पण ही गोष्ट लक्षांत येतांच तें घड्याळ खुदकन् हंसलें.

नुकताच झोंपेंतून उठून आलेला घरधनी डोळे चोळून चोळून भिंतीवरच्या त्या मोठ्या घड्याळाकडे आणि स्वतःच्या मनगटावरच्या लहान घड्याळाकडे आलटून-पालटून आश्चर्यानें पाहात होता.

मनगटावरचें घड्याळ एका रात्रींत अर्धा तास पुढें कसें गेलें, हा एकच विचार त्याच्या डोक्यांत घोळत होता !

## १७ राजाची निवड

सिंह नुकताच स्वर्गवासी झाला होता. वैधव्यानें विव्हळणाऱ्या सिंहिणीच्या दुःखाला तर पारावारच नव्हता. भोंवतालचीं सारीं दऱ्याखोरीं तिच्या आक्रोशानें दररोज दणदणत होतीं. काय करणार बिचारी! आकाशाची कुऱ्हाड कोसळली होती तिच्यावर. तिला सहानुभूति दाखवून तिच्या दुःखाचा भार हलका करण्याकरितां जंगलांतील सारीं जनावरें तिच्या राहत्या गुहेसमोर जमा झालीं होतीं.

त्या ठिकाणीं जमाव करून जाण्यांत त्या सर्वांचा एक अंतःस्थ हेतु होताच.

रिकाम्या झालेल्या सिंहासनावर यापुढें कोणी बसावें, या महत्त्वाच्या प्रश्नाचाही त्यांना निकाल लावावयाचा होता.

खरें पाहिलें तर बापामागून मुलगाच गादीवर यावयाचा. पण दिवंगत सिंहाचा छावा फारच लहान होता. असल्या या लहान वयांत तसल्या त्या श्वापदांवर जरब बसविणें, हें त्यांच्या आंवाक्याबाहेरचेंच काम होतें. पण त्या सर्वांना आर्जवून तो म्हणाला:—

'मी वयांत येईपर्यंत मला अवसर द्या. माझ्या पित्याच्या पावलावर पाऊल ठेवून राज्यकारभार चालवण्याची धमक मी मोठा झाल्यावर माझ्या अंगांत आपोआपच येईल. तोंपर्यंत माझ्या वाडवडिलांच्या चरित्रांचीं पानें चाळून त्यांच्या अंगचे गुण माझ्या अंगांत उतरविण्याचा मी शक्य तितका प्रयत्न करून पहातों!'

पण हा त्याचा युक्तिवाद कुणाला पटणार? ' नुसतीं चरित्रें वाचूनच वडिलांचे गुण चिरंजिवांच्या अंगांत उतरूं लागले. तर जगाच्या इतिहासांत आजपर्यंत सगळेच बेटे बापसे सवाई होऊन बसले असते. ' कोपऱ्यातला कोल्हा हळूच पुटपुटला.

तितक्यांत तावातावानें चित्ता पुढें सरसावला आणि म्हणाला :

' तुम्हां सर्वांपेक्षां सिंहाशीं माझेंच जास्त साम्य आहे; आणि म्हणूनच सिंहाची गादी चालवायला मीच जास्त लायक आहें. '

पण अस्वल म्हणालें, ' मला बाजूला ठेवून तुम्ही चित्त्याला निवडाल तर फारच मोठा अन्याय होणार आहे. मी चित्त्याइतकाच बलवान् आहें, धीरवान आहे आणि उग्रही आहें. इतकेंच काय, पण एका बाबतींत मी चित्त्यापेक्षांही श्रेष्ठ आहें. एखाद्या झाडावर चढायला सांगा मला, त्या झाडाचा थेट शेंडाच गाठीन एकदम. शिवाय माझ्या अंगांत जो एक अद्वितीय गुण आहे तो तर तुमच्यांपैकीं कुणाच्याच अंगांत नाहीं. पशूंपेक्षां स्वतःला जास्त श्रेष्ठ समजणाऱ्या माणसांच्याही अंगांत तो गुण सांपडणार नाहीं. हंसतां हंसतां दुसऱ्यांचे दांत घशांत घालण्याची कला माणसांना अवगत असेल; पण हंसवतां हंसवतां माणसांचे प्राण घेण्याची कला मी एकट्यानेंच हस्तगत केली आहे. '

अस्वलाचें बोलणें संपतांच स्वतःच्या सोंडेचें वेटोळें करून हत्तीनें आपलें भाषण सुरू केलें :

' ज्या झाडाचा शेंडा गांठायला अस्वलाला झाडावर चढून जाण्याचे श्रम घ्यावे लागतात तें झाड जमीनदोस्त करण्याची ताकद या माझ्या सोंडेंत आहे. यावरून माझ्या मोठेपणाची, शक्तीची आणि शौर्याची शंका तुमच्यांपैकीं कुणी घेईल असें मला वाटत नाहीं. समोरासमोर येऊन माझ्याशीं सामना देण्याची ताकद दिवंगत झालेल्या सिंहाच्याहि

अंगांत नव्हती. कोणत्याहि गोष्टीचा मी किती सूक्ष्म विचार करीत असतों, हें माझ्या डोळ्यांवरूनच तुमच्या लक्षांत येईल. देवेन्द्राच्या दाराशीं सदैव झुलत राहणाऱ्या ऐरावताचें आणि माझें अगदीं जवळचें नातें आहे. '

हत्तीचें भाषण संपतांच घोड्यानें आपलें घोडें पुढें दामटलें.

' माझ्याइतका उमदा, इमानी आणि देखणा प्राणी तुम्हांला इतरत्र क्वचितच आढळेल. सर्व जगाला प्रकाशमान आणि चैतन्ययुक्त करणाऱ्या सूर्याचा रथ माझ्या आप्तबांधवांच्या मदतीखेरीज एक बोटभर पुढें जात नाहीं, ही गोष्ट तुमच्यापैकीं प्रत्येकाला माहीतच असेल ! '

यानंतर माकड पुढें आलें माकडाचे अंगविक्षेप पाहून सभेचें गंभीर वातावरण एकदम नाहींसें झालें.

' बंधूंनो, ' माकडाच्या तोंडून हे शब्द बाहेर पडतांच सभेंत एकच हंशा पिकला. त्यामुळें माकडाच्या अंगांत जास्तच हुरूप आला.

' बंधूंनो आणि भगिनींनो, माझ्याइतका विद्वान् आणि गमत्या प्राणीच तुमचा राजा होण्यास लायक आहे. राजा झाल्यावर नव्या नव्या नकला करून रोजच्या रोज मी तुमची भरपूर करमणूक करीन. हंसतां हंसतां तुमच्या मुरकुंड्याच वळतील. सर्व सृष्टींत श्रेष्ठत्वाची शेखी मिरवणाऱ्या मनुष्यप्राण्याशीं माझें किती तरी साम्य आहे. मनुष्या-बरहुकूम सर्व गोष्टी करून दाखविण्याची माझ्या अंगांत हिंमत आहे. मला राजा निवडण्यानें तुमच्याहि गुणग्राहकतेचें कौतुक होईल. '

माणसांच्या अनुकरणाचा प्रश्न निघतांच पोपट थोडाच स्वस्थ बसणार ! पंख फडफडावून तो पुढें आला आणि म्हणाला :

' विदूषक आणि विद्वान् यांत जितका फरक आहे, तितकाच फरक माकडांत आणि माणसांत असतो, हें आपण ध्यानांत धरलें

पाहिजे. राज्य चालवण्यासारखें गंभीर जबाबदारीचें काम असल्या अविचारी विदूषकांवर सोंपवण्याऐवजीं विचारी विद्वानांवर सोंपवावें, इतकेंच मला सांगायचें आहे. मनुष्याचें नुसतें विडंबन करण्यानेंच अंगांत शहाणपण येतें, ही समजूतच चुकीची आहे. मनुष्यप्राण्याशीं तुलना करून स्वतःचा मोठेपणा सिद्ध करावयाचा असेल तर एका बाबतींत माकडापेक्षां मीच जास्त श्रेष्ठ आहें. मनुष्यासारखी वाणी माझ्याजवळ आहे, म्हणून मला तरी सिंहासनावर कां हक्क सांगतां येऊं नये ? '

' अहो विठूमिया, पुरे करा ही पोपटपंची. ' पोपटाचें भाषण चालू असतांच माकड चिडून म्हणालें. ' नुसतें बोलायला येऊन काय उपयोग ! आपण जें बोलतां त्याचा अर्थ तरी आपणाला समजतो का ? '

पोपटाची आणि माकडाची चांगलीच खडाजंगी उडाली. माकडाचे आविर्भाव पाहून सभेंत पुन्हा हंशा पिकला. त्यामुळें माकडाची अशी समजूत झाली कीं, सभा आपण जिंकणार आणि राज्यवैभव आपल्या वांट्याला खास येणार. परंतु सभेंतील हंशा गौरवात्मक नसून उपहासात्मक होता, हें माकडाच्या ताबडतोब प्रत्ययास आलें. कारण, सिंहाचा छावा वयांत येईपर्यंत हत्तीला तात्पुरतें राज्यपद देऊन कोल्ह्याला प्रधानकीचीं वस्त्रें द्यावीं असें त्या सभेंत बहुमतानें ठरलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३८७८८ दि. ९२७९
१०८१४